# शब्द रुची

४४

मार्च २०१९

मूल्य १० रुपये

महिलादिन विशेषांक

पृष्ठे ६८



# अधिक ठेवी
# अधिक कमाई

मुदत ठेव

७.६०%* द.सा.

(१५ महिन्यांकरिता)

ज्येष्ठ नागरिकांसाठी ०.२५% अधिक

सारस्वत बँक | 100 Years Young

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

*अटी लागू

www.saraswatbank.com

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**महिलादिन विशेषांक**

**मार्च २०१९, वर्ष सहावे**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**


---


**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**


---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

---


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com


---

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ एप्रिलपासून १२ ते ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**
**वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

---


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


**स्मरणस्वर**
- अखेरपर्यंत लढाऊ / **श्याम मोकाशी** / ६
- एक संपूर्ण मित्र / **दीपक करंजीकर** / ८

**निमित्त**
- स्त्री असण्याचा अर्थ / **डॉ. अनुजा जोशी** / ११
- मला काही सांगायचंय / **उषा पुरोहित** / १५
- मासिक पाळीचा टॅबू
  आणि बरंच काही... / **श्रद्धा पेडणेकर**/ २०

**ललित**
- सायकल, एक गंमत?
  की मुक्तिदायी संचाराचे साधन? / **छाया दातार** / २२

**तिची कविता**
- संगीता अरबुने, अनिता त्रिपाठी, सलमा / २८-२९

**सृजनरंग**
- कलाक्षेत्र समृद्ध करण्यात महिला चित्रकारांचे योगदान
  **प्रा. डॉ. सुभाष पवार** / ३०
- चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रातील भारतीय महिला
  **संतोष पाठारे** / ३४

**अविस्मरणीय**
- घायाळ हरिणी / **सुहास सोनावणे** / ३६
- बंडखोर वादळी व्यक्तिमत्त्व : कृष्णा सोबती
  **संजीवनी खेर** / ३९

**नवं-कोरं**
- माणसाच्या अस्सलपणाचा शोध हीच प्रेरणा...
  **डॉ. प्रज्ञा दया पवार** / ४२

**मी का लिहिते?**
- मी नाही जगू शकत कवितेशिवाय...
  **छाया कोरेगावकर** / ४४
- कविता माझा श्वास आहे...
  **योगिनी सातारकर-पांडे** / ४६
- मला जगण्यासाठी लेखनकला मिळालीय...
  **सुजाता महाजन** / ४८

- सारस्वत सहकारी बँक / **राजीव जोशी** / ५०
- मराठी भाषा गौरव दिन वृत्तांत / **साधना गोरे** / ५३
- पुस्तक आणि पुरस्कार वृत्तांत / ५५
- ग्रंथपान - **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ६२
- ग्रंथाली ग्रंथपाने - **चांगदेव काळे** / ६३

## संपादकीय

महाविद्यालयातील मुलींशी बोलताना सध्या अस्वस्थता वाढत चाललीय. माझ्या अवतीभवती असणाऱ्या मुली सामान्य-तळागाळातल्या वर्गातल्या आहेत. (मराठी हा विषयच सध्या उच्चभ्रू वर्गाला नकोसा असल्याने सामान्य घरातील मुलीच बहुधा मराठी विषयाची निवड करतात.) या मुलींची स्वप्नं मोठी आहेत पण ती पाहताना त्यांना प्रत्यक्षातल्या प्रतिकूल वास्तवाशी दोन हात करावे लागतात.

एखाद्या घरात मुली नकोशा झालेल्या तर एखाद्या घरात पैशाकरता मुलींची अडवणूक, छोटी-मोठी नोकरी शोधायची नि तीही टिकत नाही, एखादा कोर्स करायचा तर दोन-तीन हजारही सहजगत्या उपलब्ध होत नाहीत. लग्न जमवायचेही प्रश्न आहेत. 'बाबांचा संसार माझा कसा होणार?' हा प्रश्न विचारणारी विभावरी शिरुरकरांच्या कथेची नायिका अनेकदा वर्गात मला सापडतेच. अजूनही या घरांमधली मानसिकता गतानुगतिक! बदल झालाय समाजात तर त्याचे वारे अजून मोकळे का नाहीत? एखादी मुलगी आर्थिक ताणात अडकलेल्या आईबाबांकरता झुरते, एखादीवर छोट्या भावंडांची जबाबदारी तर एखादी व्यसनी बापाला सावरायचे कसे याची विवंचना करते. या मुलींच्या स्वप्नांच्या फरफटीची मला नेहमीच भीती वाटते.

उच्चवर्णीय-उच्चवर्गीय मुलींचे ग्रुप्स आणि साध्यासुध्या घरातल्या मुलींचे गट यातलं अंतर मला तीव्रतेने जाणवतं. या दोन्ही गटांच्या भाषेतही खूप फरक असतो नि स्वत:ला श्रेष्ठ समजणारा गट दुसऱ्या गटाच्या भाषेला कमी लेखतो.

महाविद्यालयांमध्ये महिला विकास कक्ष (WDC Cell) असतात. या कक्षांतर्गत कामाचा भर प्रामुख्याने लैंगिक छळणुकीच्या मुद्यावर असतो. या सेलच्या कामाची व्याप्ती वाढवणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे या मुलींची मने मोकळी होऊ शकतील अशी जागा या वयात त्यांना मिळणं गरजेचं आहे. यातूनच त्यांची जडणघडण एक स्त्री म्हणून आणि एक माणूस म्हणून होऊ शकते.

मध्य रेल्वेचा सेकंड क्लासचा डब्बा आणि सासू-सूनेचे किस्से हा जुनाच विषय! मात्र पिढी बदललेली. दोन तरुण मैत्रिणींच्या गप्पा. त्यातल्या एकीचं लग्न ठरलेलं. तेही आंतरजातीय नि प्रेमविवाह! पण गप्पांमधून उभं राहणारं चक्र जुनंच!

''माझी सासू ढीगभर उपवासांची अपेक्षा ठेवते आत्तापासून माझ्याकडून! आठवडाभर ती गेली होती. तिच्या माहेरी नि मला सांगून गेली, ''पुढे तुलाच सांभाळायचं आहे सगळं तर आताच घे जबाबदारी. अग, मी नोकरी करून थेट तिकडे जात होते. कपडे-भांडी-जेवणापासून सगळं करून मग माझं घर गाठायचे.'' - म्हणजे घरकामाचे आपल्या डोक्यावरचे ओझे सुनेच्या डोक्यावर टाकायचे ही स्त्रीमुक्ती!

दुसऱ्या बाईला जखडून-अडकवून टाकण्यात बाईला आनंद वाटतो का? किंवा दुसऱ्या बाईवर सत्ता गाजवण्यात बाईला जिंकण्याचं समाधान मिळतं का?

० ० ०

मिलिंद बोकील यांची 'साथिन' नावाची कथा आहे. गावातलं एक स्त्रियांचं शिबिर, त्यांचं नेतृत्व करणारी हिराबाई, काळाबाजार करून लुटणाऱ्या दुकानदाराला अद्दल घडवणारी आणि नंतर त्याचा अत्याचार सोसावा लागलेली मनकी, हे सगळे कथेतले धागे... एखाद्या बाईवर झालेला क्रूर बलात्कार आणि त्या बलात्कारापेक्षाही किळसवाणी आणि क्रूर अशी त्या बाईकडे बघण्याची समाजाची दृष्टी...

या सगळ्या पडझडीत, बाई बाईची 'साथिन' होते का? पुरुषी सत्तेच्या खेळाविरोधात ती किती ठामपणे उभी राहते? या कथेवर वर्गात अतिशय मोकळेपणाने चर्चा झाली. अशा कथा, एखादे नाटक वा एखादी कविताही मुलींच्या गटचर्चेसाठी खूप मदत करू शकते.

० ० ०

'मी टू' मोहिमेदरम्यान एक चित्र पहाण्यात आले होते. एक तराजू, त्याची दोन पारडी. एका पारड्यात आकर्षक गॉगल घातलेल्या दोन एलिट स्त्रिया आणि दुसऱ्या पारड्यात हजारो गोरगरिब ग्रामीण स्त्रिया!

आज कित्येक वंचित स्त्रिया पुरुषी अत्याचार, बलात्कार सोसत जगताहेत. अनेक घरांमधून सासऱ्याचा, दिराचा बलात्कार सहन करणारी स्त्री दिसते. विशेषत: विधवा स्त्रीच्या वाट्याला हा छळ आलेला अनेक ठिकाणी दिसतो. 'इंधन' या हमीद दलवाईंच्या कादंबरीत अनेक वर्ष एक विधवा सून सासऱ्याचा अत्याचार सोसते. रात्ररात्रभर गावात तिच्या किंकाळ्या घुमतात पण तिच्या मदतीला कुणीही धावून येत नाही. 'मी टू'ने एलिट-उच्चभ्रू स्त्रियांना आवाज दिला पण आवाज उठवण्याआधी ज्यांच्या चिंध्या-

चिंध्या केल्या जातात अशा स्त्रिया असंख्य आहेत.

घरकाम करण्याकरता म्हणून नोकरीचं आमीष दाखवून कितीतरी स्त्रियांची निर्यात केली जाते. निर्यात करून त्यांना वेश्याव्यवसायाला जुंपले जाते. अशा स्त्रियांची संख्या आज जगभरात कोट्यवधी आहे. पर्यटन व्यवसायात असंख्य स्त्रियांच्या देहाचा व्यापार चालतो. या व्यवसायाकरता अक्षरश: स्त्रीदेहाचं प्रदर्शन मांडलं जातं. बाईचं शरीर हे सगळ्याच क्षेत्रातलं चलनी नाणं असतं.

० ० ०

कवी साहिरच्या ओळी आठवतात...

*औरतने जन्म दिया मर्दोको*
*मर्दोने उसे बाजार दिया*

बाई वेश्या असो वा नसो, तिला या नावाने किती सहज लेबलिंग केले जाते. 'मी टू' मोहिमेतून पुरुष बदनाम झाला तेव्हा पुरुषाला 'बेनकाब' करणाऱ्या बाईला 'रंडी' म्हणणे अनेकांना किती सोपे वाटले. वेश्या म्हणून तिची संभावना करत सोशल मीडियावर ट्रोलिंग करणे आता नवे राहिलेले नाही.

० ० ०

एकूणच स्त्रीला मोडीत काढणे खूप सोपे असते. ती कधी बावळट असते, कधी मूर्ख, कधी पतिता असते, कधी चेटकीण!

तिचं श्रेय नाकारणं सोपं असतं, तिच्यावर फुली मारणं सोपं असतं, तिच्या हळवेपणाची खिल्ली उडवणं पुरुषाला सहज जमतं. तिचं भावनाशील असणं त्याला हास्यास्पद वाटतं. तिच्या बौद्धिक तेजाचा सहज स्वीकार त्याला जमत नाही. तिने कसं असावं नि कसं नसावं हे पुरुष ठरवू इच्छितो. भले-भले पुरुषही याला अपवाद नाहीत. तिने काय करावं-काय करू नये, त्याच्यासोबतचं नातं तिने कसं जगावं-कसं जगू नये याची सगळी गणितं तो मांडणार. त्याची उत्तरं त्यानेच आधी शोधलेली, मग ती उत्तरं तिला देता येताहेत की नाही, याची परीक्षाही तोच घेणार! पण या सगळ्यात तोच पुन्हा-पुन्हा उघडा पडत जातो नि ती म्हणत राहते,

*स्वत:ला सिद्ध करण्यासाठी*
*तू रचलेस ग्रंथ-महाग्रंथ*
*मी मात्र हाच विचार करते आहे.*
*कधीतरी होईल तुझ्या बालिशपणाचा अंत...*

(हिंदी कवयित्री ममता कालिया यांच्या ओळी)


**- डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

ऐंशी आणि नव्वदच्या दशकात महिला चळवळीला गती देण्याचे मोठे काम 'स्त्री उवाच' या प्रकाशन गटाने केले. १९९४ मधील महिलादिनी 'स्त्री उवाच'चा शेवटचा छापील स्वरूपातील अंक प्रकाशित झाला. या घटनेला २५ वर्ष पूर्ण होत असल्याने तत्कालीन स्त्रीवादी चळवळीची आठवण पुनरुज्जीवित करण्याकरता 'पुन्हा स्त्री उवाच' हा डिजिटल उपक्रम हाती घेण्यात आला आहे. मराठीतील पहिली स्त्रीवादी वेबसाइट यानिमित्ताने आपल्यासमोर येते आहे. punhastreeuvach.com

ज्येष्ठ स्त्रीवादी अभ्यासकांचे काम-विचार, त्यांच्या मुलाखतींसोबतच नव्या स्त्रीवादी कार्यकर्त्यांचे कामही या वेबसाईटच्या माध्यमातून समजून घेता येणार आहे. हा प्रकल्प संशोधकांना आणि अभ्यासकांना उपयुक्त ठरणार आहे.

# अखेरपर्यंत लढाऊ

श्याम मोकाशी



**लढाऊ बाण्याचे कामगार नेते, पत्रकार आणि संसदपटू असलेले जॉर्ज फर्नांडिस यांनी २९ जानेवारी २०१९ जगाचा निरोप घेतला. 'शब्द रुची'च्या वाचकांसाठी त्यांच्या आठवणी जागवल्या आहेत, पत्रकार श्याम मोकाशी यांनी.**

**मी** तेव्हा कॉलेजमध्ये होतो आणि मुंबई पालथी घालण्याचे कर्तव्य इमानेइतबारे पार पाडत होतो. एका संध्याकाळी मी आणि माझे मित्र भटकत असताना एका मैदानाजवळून गेलो. बरीच गर्दी दिसली? भाषण चालू होते, ''हा कामगार जागा झाला आहे. तो आता फसणार नाही.''

''आता हा कितीही वेळ बोलत राहील'' माझा जाणकार मित्र म्हणाला.

''पण छान बोलतोय.''

''हा 'जॉर्ज फर्नांडिस'. मित्राने माहिती पुरवली. नंतर तो मनात भरला १९६७ मध्ये लोकसभा निवडणुकीत, स.का. पाटील या वजनदार काँग्रेस उमेदवाराला धूळ चारून. काँग्रेसवाले बेफिकीर होते. त्यांचा उमेदवार अजिंक्य होता. मतदार देखील तसे मानत होते, पण एक पोस्टर... आणि चित्र पालटले! पब्लिककडे बोट केलेली मूठ आणि एकच वाक्य - 'यू कॅन किल द जायंट.' मतदार खडबडून जागे आणि जॉर्ज फर्नांडिस निवडून आला. पुढे मी पत्रकार झालो. जॉर्ज निमित्तानिमित्ताने मनात घोळत राहिला आणि केव्हातरी 'तो'चे 'ते' झाले.

एक लढाऊ कामगार नेता म्हणून जॉर्ज फर्नांडिस प्रसिद्ध होते. उत्तम वक्ता म्हणूनही ते प्रसिद्ध होते. त्यांच्या संघटनांचे बळ वादातीत होते. तरीही जॉर्जचे डोके ठिकाणावर होते. कामगार संघटनांच्या क्षेत्रातील बदलती समीकरणे त्यांना बरोबर माहीत होती. जातीयवादी, प्रतिगामी भारतीय जनता पक्षाबरोबर त्यांनी केलेली दोस्ती मुंबईतील त्यांच्या समाजवादी सहकाऱ्यांना पसंत नव्हती. त्यांच्या नाराजीची दखल घेत जॉर्ज ह्यांनी आपले खजिनदार रणजित भानू यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. आपल्या कार्यकर्त्यांचे विचार त्यांनी समजून घेतले आणि आपली भूमिका सविस्तर मांडली. देशातला सर्वात प्रबळ कामगार नेता जॉर्ज फर्नांडिस नाही, तर संघ परिवारातील ज्येष्ठ नेते दत्तोपंत ठेंगडी हे आहेत, हे सत्य त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या गळी उतरवले.

त्यांचा लढाऊ बाणा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करतानाही कायम राहिला.

केंद्रीय मंत्री असताना जॉर्ज एकदा अमेरिकेला गेले. त्यावेळी अमेरिकन सरकारतर्फे त्यांना खाना देण्यात आला. त्यावेळी अमेरिकन मंत्रीमहोदयांनी 'कोकाकोला' आणि 'आयबीएम' ह्या कंपन्यांना भारतात परत प्रवेश घेऊ द्यावा असे टुमणे जॉर्ज ह्यांच्या मागे लावले. सुरुवातीला काही वेळ तो प्रकार जॉर्ज ह्यांनी गंमतीत घेतला, पण अमेरिकन मंत्री महोदय परत-परत तो विषय काढू लागले तेव्हा जॉर्ज ताड्‌कन उठून म्हणाले, ''तुम्ही हा हट्ट गंमतीनंच करत असणार कारण उद्योगमंत्री असताना ह्या दोन कंपन्यांची हकालपट्टी मीच करवली होती'' आणि तसेच उठून ते विमानतळाकडे निघून गेले! आज त्या हकालपट्टीच्या प्रकरणाकडे पाहताना अशी शंका येते की त्या तडफदारीमुळे देशाची आयटी क्षेत्रातील प्रगती दहा-पंधरा वर्षे खुंटली तर नाही ना? वादाचा मुद्दा! (आणि जॉर्जना वादाची खुमखुमी नेहमीचीच!)

एप्रिल १९९९. आधीच उन्हाळा, त्यात तापलेले राजकीय वातावरण. भाजपप्रणित सत्ताधारी आघाडीची कसोटी. अविश्वास ठराव! जयललिता यांनी पाठिंबा काढून घेतलेला आणि वाजपेयी सरकार विरुद्ध अविश्वास ठराव एका मताने संमत झाला. काँग्रेसलाही २७२ हा आकडा जेमतेम गाठता आलेला. तरीपण सोनिया पंतप्रधान पदाची शर्यत जिंकल्याच्या आनंदात. मुलायमसिंगांनी सोनिया गांधींना पाठिंबा जाहीर केला होता. समाजवादी कंपू अत्यंत निराश आणि अस्वस्थ. जॉर्ज ह्यांना सहकाऱ्यांनी मध्यस्थीचा आग्रह केला

पण त्या दोघांमध्ये त्यावेळी दुरावा निर्माण झाला होता– ब्लशिंग आणली, सरकारी विमान खाजगी कामासाठी वापरली म्हणून जॉर्ज यांनी त्यांच्यावर थकबाकी वसुलीची नोटीस काढली होती. बराच वाद झाला आणि जॉर्ज मुलायमसिंगांना भेटायला तयार झाले. एवढ्या रात्री आपल्या दरवाज्याशी जॉर्जना पाहून मुलायम ह्यांना आश्चर्याचा धक्काच बसला आणि आनंदही झाला! दुसऱ्या दिवशी पंतप्रधानपदासाठी सोनियांना पाठिंबा न देण्याचे त्यांनी कबूल केले. अशा रीतीने दोन दिवसात दोन अपेक्षाभंग भारतीय राजकारणात झाले.

देशहितासाठी प्रसंगी आपले वैयक्तिक मानापमान बाजूला ठेवण्यात जॉर्ज कसूर करत नसत!

चीन हा नेहमीच जॉर्जच्या चिंतेचा विषय झाला होता. अर्थात त्यांना जी कागदपत्रे आणि माहिती उपलब्ध होती त्यातूनच ती चिंता निर्माण झाली होती. ती माहिती ते सर्व सामान्य जनांना सांगू शकत नव्हते, पण चीनपासून जो धोका भविष्यकाळात होऊ शकतो, त्याची जाणीव नोकरशहा, राज्यकर्ते, विरोधी पक्ष, प्रसारमाध्यमे वगैरे जाणकार मंडळी ह्यांना नाही ह्याबद्दल ते नेहमी असमाधान व्यक्त करीत, पण त्या विषयावर जास्त खोलात जात नसत. देशाच्या कारभारावर खासगी क्षेत्राचा नको तेवढा पगडा आहे, हे मात्र जाहीरपणे ठासून सांगत असत! अगदी नाव घेऊन! उदाहरणार्थ, भारत सरकार ही रिलायन्स समूहाच्या मालकीची कंपनी झाली आहे, असे स्पष्ट उद्‌गार त्यांनी मुंबईतील त्याच्या अखेरच्या जाहीर सभेत काढले.

काळा घोडा परिसरात ही सभा झाली. भर पावसात छत्री न घेता जॉर्जचे भाषण चालले होते. सभा संपल्यावर सरकारी मालकीच्या एसी कारमध्ये ते बसले आणि विमानतळाकडे गेले. वातानुकूलित प्रतीक्षागृहात बसले. तिथून वातानुकूलित विमानात. अंगावर ओले कपडे तसेच कारण एका दिवसाकरता कुठे जायचे असेल तर ते दुसरा ड्रेस घेत नसत. त्या दिवशीच्या पाऊस–वारा–एसी – प्रवासाचा संकलित परिणाम म्हणजे सर्दी झाली. त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. मग ते बाथरूममध्ये पडले. डोक्याला इजा झाली. तिकडे दुर्लक्ष केले. हट्टाने नेहमीची कामे करीत राहिले. सकाळी पाच वाजता उठणे, स्वत:चे कपडे धुणे, अधूनमधून कुत्र्यांना आंघोळ घालणे इत्यादी, इत्यादी.

डोक्याची इजा त्रासदायक ठरली. दोन शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. नंतर अल्झायमरचे आक्रमण. जॉर्जची प्रकृती खालावतच गेली.

त्या काळात त्यांच्या आठवणींचा संग्रह काढण्याचा जोरदार प्रयत्न त्यांच्या मुंबईतील सहकाऱ्यांनी केला. अशाच एका रात्री भोजनानंतर चर्चा चालली होती. जॉर्ज इयरफोन लावून बिथोवनचे संगीत ऐकत पडले होते. काही लोक वाजपेयी सरकारच्या कामगिरीची प्रशंसा शब्दबद्ध करण्यात गुंतले होते. त्या विषयावर जॉर्जचे काय म्हणणे आहे ते जाणून घेण्याची स्फूर्ती तिथे उपस्थित असलेल्या एका पत्रकाराला झाली आणि त्याने संगीत बंद केले. जॉर्ज खडबडून भानावर आले. त्याने तात्काळ त्यांना विचारले, वाजपेयी राजवटीत पंतप्रधान कोण होते? जॉर्जचे अविलंब नि स्पष्ट उत्तर होते, ब्रजेश मिश्रा. ऐकणारे अवाक् झाले! जॉर्ज परत संगीत ऐकण्यात मग्न झाले.

जॉर्ज फर्नांडिस ह्यांच्या आवडत्या गोष्टी म्हणजे सीताफळ, मच्छी कढी आणि भात, केवीअर (मोठ्या माशांची खारवलेली अंडी), गंभीर ग्रंथ, मोरारजी कोला, बिथोवनचे संगीत, बुद्धिमान स्त्रियांची संगत ह्या गोष्टींचा ते मनसोक्त आस्वाद घेत! आणि ह्याच धर्तीवर एखाद्या गोष्टीबद्दलची त्यांची नावडही पराकोटीची असे. उदाहरणार्थ सोनिया गांधी ह्यांच्याबद्दलची चीड त्यांनी कधीच लपवून ठेवली नाही. तिचा अनुभव माझ्या एक पत्रकार मित्राला. असा आला...

२००९–१० ची घटना आहे. जॉर्ज ह्यांचे राजकारणातील स्थान डळमळीत झाले होते. ते निवडणूक हरले होते. प्रकृती ढासळली होती. अल्झायमरचे हेलकावे बसत होते. नेहमी लोकांच्या गराड्यात असणारे जॉर्ज आता एकटे पडले होते. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये माझ्या मित्राची कुटुंबीय दिल्लीला आले होते. मुक्कामाचे ठिकाण होते, ३ कृष्णमेनन मार्ग. माजी संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस ह्यांचे निवासस्थान! गेट नसलेले त्या वसाहतीतील एकमेव ठिकाण! पाहुण्यांचा घोळका त्या वास्तूमध्ये बेधडक घुसला. घराच्या मागील प्रशस्त हिरवळ आणि तिथे बागडणारी तीन–चार कुत्री बच्चेकंपनीला एकदम पसंत पडली. त्यांना तिकडे सोडून जॉर्जना शोधायला माझा दोस्त निघाला. हे घर त्यांच्या खूपच परिचयाचे आहे. त्यामुळे त्यांना शोधून काढणे काही कठीण नव्हते. एका कोचामध्ये रेलून अत्यंत एकाग्र चित्ताने आणि गंभीरपणे ते इंडियन एक्स्प्रेस वाचत होते. तो त्यांच्यापुढे उभा राहिला. त्यांना त्याची चाहूल लागली, आणि त्याच क्षणी त्यांनी हल्ल्याचाच पवित्रा घेतला! त्याच्या दिशेने झेप घेत ते तारस्वरात ओरडले, ''कोण रे तू? गोळी घालतो तुला!'' त्यांनी त्यावेळी त्याला इजाही केली असती, पण सुदैवाने तीन वर्षांचा नातू आणि त्याच्या मागे तिथलाच एक कुत्रा अशी दुक्कल प्रवेश करती झाली आणि चमत्कार घडला! आतापर्यंत कधीही न पाहिलेले एक बालक जॉर्जच्या दृष्टीस पडताच त्यांचा मुळातला प्रेमळ स्वभाव उसळून वर आला! त्यांनी त्या बालकाला उचलून घेतले आणि त्याच्या गालांवर मुक्यांचा वर्षाव केला! मग पूर्णपणे शांत होऊन विचारतात, ''कधी आलास?''

नंतर वातावरण पुरेसे निवळल्यावर माझ्या मित्राने त्या इंडियन एक्स्प्रेसच्या अंकावर नजर टाकली. सोनिया गांधींवरचा एक मिळमिळीत लेख जॉर्ज वाचत होते! त्यातील सौम्य भाषेने त्यांचा उद्वेग वाढला असावा.

...कारण पहिल्या उद्रेकानंतर शांत झालेले जॉर्ज काही वेळाने परत त्या लेखाकडे वळले आणि त्यावेळी तिथे उपस्थित नसलेल्या लेखकाची तासंपट्टी करायला लागले!

**– श्याम मोकाशी**
भ्रमणध्वनी : ९२२६२२१४६८
shyamokashi@gmail.com

# एक संपूर्ण मित्र



दीपक करंजीकर

**एक निष्पाप, निरागस माणूस, लोकप्रिय कलावंत आणि मैत्र जपणारी व्यक्ती. ह्या तीनही गोष्टी ज्या एकेकट्या पण दुर्मीळ असतात, त्या एकाच माणसात एकत्र येणे हे किती दुरापास्त, याची आठवण जागी करणारा हा लेख...**

एखादी सातत्याने वाहणारी नदी असते ना तसे असते आपले आयुष्य. नदीच्या हातात कुठे असते वहाणे, थांबणे, वळणे असे काही. ते सारे तर परिसरच ठरवत असतो ना तिच्यासाठी. नदी आपली निमूटपणे वहात राहते. काठांवर लोक येतात, वस्ती करून राहतात, निघून जातात. नदी आपली वहात राहते. वाऱ्याने तिच्यावर तरंग उमटतात, उन्हाने ती क्षीण होत जाते, थंडीत आक्रसते क्वचित पण वाहणे मात्र सोडत नाही. कारण ते तिचे भागधेय आहे. तिच्यात पाणी आहे तोपर्यंत ती नदी आहे तिच्यातले पाणी संपले की ती केवळ कोरडे पात्र आहे. म्हणजे एखादे नुसतेच पात्र असले की आपण नदी होती असे म्हणतो म्हणजे नदी हा पात्राचा भूतकाळ आहे. नदीची रेंज बोटभर उसळणारा झरा ते आकाठ कोरडेठाक पात्र इतकी असते. अगदी असेच आपले आयुष्य असते. त्याचे वाहात राहणे आप्तांच्या, मित्रांच्या काठांवरून इतकेच काय ते खरे. मित्र आजूबाजूला असले की पूर येतो आयुष्याला आणि एखादा मित्र निघून गेला की कोरडे होते ते पात्रासारखे. हे एकदा कळले की मग आपल्याच अस्तित्वाचे अट्टाहास टोकदार रहात नाहीत. ते आपण स्वीकारतो मग आहे तसे. हेच असते शहाणपण. एखाद्याशीच मैत्री का होते, सगळ्यांशी का नाही असले प्रश्न विचारू नयेत. कितीही पडले तरी. कारण इथे तर्क पांगळा असतो. ज्याच्या आयुष्यात सतत तर्क पांगळा असतो तो खरे आयुष्य जगतो. तर्कदुष्ट आयुष्य जगणे म्हणजे जगण्याचा आभास निर्माण करणे. प्रत्येक गोष्टीत तर्क शोधणे म्हणजे आपल्या कवडीच्याही हातात नसणाऱ्या जगण्याचे कारण शोधणे. तसे करणे म्हणजेच न जगणे.

मला आठवते मी दिल्ली विमानतळावर बसलो होतो कॅनबेराला जाण्यासाठी. अचानक अशोक शिंदेचा फोन आला. रमेश भाटकर गेल्याचा. बातमी अनपेक्षित नव्हती पण गोंधळ वेळेचा आहे. मी चाचपडलो. अबोल झालो. एकदम काहीतरी राहून गेले असे सतत प्रवासभर वाटत राहिले. माझे मुंबईतल्या काही मित्रांशी असे गणगोत आहे. आमचे सगळे मिळून एकत्रित नसेल पण एकमेकांत एक हेतुशून्य नाते आहे. म्हणजे एक अशी सलग माळ आहे जी कधी ओढत बसत नाही आम्ही.

*मिल गयी तो मंझिले ही मंझिले है ।*
*एक कोई रस्ता चलनेको नही ।।*

मित्र असेच असतात. हे लिहिणाऱ्या सुफी फकिराने अगदी अचूक वर्णन केलेय.. सातत्याने भेटणे हे त्याचे कारण नाही. म्हणजे केवळ वहात राहणे. कोणत्याही अपेक्षा नाही, खंत नाही, भेटले तेव्हा पूर्णपणे. नसू बरोबर तेव्हा कढ नाही, असू तेव्हा उमाळे नाही. आहोत तितकेच क्षण महत्त्वाचे. सरकत राहतो आम्ही कदाचित त्या नदीसारखे. रमेश तर नक्कीच तसा होता. आपल्या प्रवाहात मग्न पण एखादा मित्र आलाच मध्ये तर रेंगाळणारा, भोवरा होऊन त्या भोवती गुंतून पडणारा. वरवर स्थिर असणारा काहीही फरक पडत नाही असा, एखाद्या संथ प्रवाहासारखा. पण आत अनेक वर्षांचा गाळ वाहून नेणारा. अनेक एकत्रित क्षणांची वाळू जपणारा. रमेश भाटकर. खरे तर एक सेलेब्रिटी, उमदा देखणा नट. अनेकांना फाट्यावर मारून जगलेला. पण तोरा आणि उन्मत्तपणा यांची नेमकी फारकत करणारा, खोटा हळवेपणा आणि आपलेपणा यातला फरक सांभाळणारा. एक मनस्वी माणूस. अनेक चित्रपट, नाटके, मालिका यात आपला खोलवर ठसा उमटवलेला अभिनेता. क्रिकेट, संगीत आणि मैफिलीतला रसिला बेदरकार, बेफिकीर कलावंत. प्रवासातल्या मित्रांचे गुण नेमके हेरून त्यांच्यावर

बेहिशेबी प्रेम करणारा माणूस. कचकचीत भांडून पुन्हा बोलणारा, न पटल्याने उसळणारा आणि पटले तिथे लागलीच नतमस्तक होणारा, स्वत:चा अभिमान न झाकणारा पण त्यामुळे कोणी दुखावू नये असे मन असलेला. अशा अनेक शेड्स असणारा मित्र. मी विमानात बसून, त्याच्या निघून जाण्याचे चटका असलेले भान जपताना, स्वतःला विचारत राहिलो. आपले काय नाते होते याच्याशी? आपली ओळख अशी किती जुनी? आपले सह-कलाकार म्हणून असणारे बंध किती रुंद? आपली बरोबरी तरी कशी अशी की मी त्याला अरेतुरे करावे आणि त्याने एकदाही त्यावर प्रश्न करू नये?

मी उजळणी करत गेलो, एकेका घोटाबरोबर आणि लक्षात आले हे काही तर्क मांडणीचे नाते नाही. हे एकूणच पसरट अनाकलनीय आणि अचानक आभाळ आल्यासारखे काहीतरी आहे, ज्याचे उत्तर त्याच्या केवळ असण्यात आहे. त्यामुळे माळ ओढायची नाही. खरे तर केवळ एकाच नाटकात आम्ही सोबत काम केले. वसंत कानेटकरांच्या 'प्रेमाच्या गावा जावे' या. झाले असतील ४०-५० प्रयोग. दुसऱ्या प्रयोगानंतर बसलो तेव्हा मला रमेश म्हणाला, ''तू जरा रोल समजून घे. यातला विनोद वेगळा आहे.'' खरे तर त्याआधी केलेल्या माझ्या सगळ्या नाटकांना तो आठवणीने आला होता. माझे कौतुक ही केले होते.. मला आठवते.. मी काहीच बोललो नाही. थोडा खट्टू झालो असेन. मग विचार केला. आपण आपल्याला पटले तसे करायचे. आमचा दहावा की अकरावा प्रयोग पार्ल्याला होता . प्रयोग झाल्यावर आम्ही जेवायला गेलो. रमेश मला अचानक म्हणाला. ''अरे, तू करेक्ट बेअरिंग पकडले आहेस. मला आधी वाटायचे तू वेगळे करतोयस, मी विजयला बोललोही, पण तुझे करेक्ट आहे रे. तू टिपिकल, फार्सिकल न करता जास्त लाफ्टर काढतोस. सॉरी यार, मी तुला उगाचच बोललो त्या दिवशी. मला त्याचे हे मोकळे असणे फार भावून गेले.'' वाटले हा लोकप्रिय नटापेक्षा मोठा माणूस आहे. मी इतकेच म्हणालो 'हॅलो इन्स्पेक्टर'मधले तुझे मानेचा तुरा काढून चालणे नाटकी वाटले असेलच की एखाद्या वास्तववादी दिग्दर्शकाला, पण तेच तर त्याचे मर्म होते आणि तू ते किती सहज घेऊन वावरलास. सगळेच काही तर्कात बसवता येत नाही आयुष्यात काय आणि भूमिकेत काय! रमेश माझ्याकडे एकटक बघत इतका छान हसला. इथे आमचे जे मैत्र झाले ते कायमचे.

रमेशने आपल्या उण्यापुऱ्या सत्तर वर्षांच्या आयुष्यात तब्बल ४० वर्षे रसिकांच्या मनावर राज्य केलं. स्नेहल भाटकरांसारख्या अत्यंत साध्या, निरलस आणि प्रखर सर्जनशील अशा संगीतकारांच्या पोटी जन्माला येऊनही, रमेश कधीच वारसाहक्काच्या मस्तीत वावरला नाही. उलटपक्षी त्या दुनियेपासून दूर अशा पुण्यात टेल्को सारख्या कंपनीत नोकरी करून त्याने आपल्या अभिनय आवडीला जोपासले. एका वळणावर ती नोकरी आतल्या आवाजाला दाद देत भिरकावली आणि त्यानंतर त्याच्या देखणेपणासकट त्याने मराठी चित्रपटसृष्टीवर आपल्या पाउलखुणा उमटवल्या. त्याच्या अभिनय कारकिर्दीचा आलेख अत्यंत गाजलेले असे तब्बल ९०च्या वर चित्रपट ३०च्या वर मालिका आणि ५०च्यापेक्षा जास्त मराठी नाटके असा भरजरी आहे. चाळीस वर्षांची कारकिर्द. रमेश पट्टीचा पोहोणारा, दादरच्या विजय क्लबमधून खो खो खेळणारा खेळाडू. त्याचे खेळ सुटले पण खिलाडूपण संपले नाही. तो तसा होता म्हणूनच कर्करोगासारख्या एरवी माणसाच्या रंगरुपाला अवकळा आणणाऱ्या रोगाचाही त्याच्यावर फारसा परिणाम झाला नाही. तब्बल २८ वर्षे चाललेल्या, 'अश्रूंची झाली फुले' या नाटकात त्याने डॉ. काशिनाथ घाणेकरांची रिप्लेसमेंट केली. डॉ. काशिनाथ घाणेकरांनी केलेला रोल करणे हे सोपे नव्हते पण त्याने तो समर्थपणे निभावलाच. त्याच्या कमांडरचा रुबाब आणि हवाहवासा वाटणारा दरारा हे त्याचे संचित होते पण त्याच्या त्या तळपत्या प्रवासाचा वेध घ्यावा आणि त्याची माहिती द्यावी असा या लेखाचा मुळात उद्देशच नाही तर एक निष्पाप, निरागस माणूस, लोकप्रिय कलावंत आणि मैत्र जपणारी व्यक्ती. ह्या तीनही गोष्टी ज्या एकेकट्यापण दुर्मीळ असतात, त्या एकाच माणसात एकत्र येणे हे किती दुरापास्त याची आठवण जागी करण्याचा आहे.

रमेशचे वाचन विविध विषयांवर होते आणि त्याबद्दल त्याला सतत प्रश्न असत. ज्याला प्रश्न पडतात तो बनचुका होत नाही. माझे पहिले पुस्तक वाचल्यावर, त्यातले अनेक संदर्भ आंतरराष्ट्रीय असल्याने त्याचे अनेक प्रश्न असत आणि तो ते निरागसपणे विचारात असे. त्यांची समर्पक आणि विस्तृत उत्तरे दिल्यावर तो खूश होत असे आणि तो आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्वच्छ दिसे.

रमेशबरोबरच्या गप्पा या तर बालपणाच्या एखाद्या मधुर आठवणीसारख्या सतत आठवत राहणार. आम्ही एकाच नाटकात बरोबर काम केले, पण आमच्या एकूण गप्पांचा पसारा एखाद्या दीर्घकालीन मित्राइतकाच इतका गच्च आणि विस्तृत आहे.

त्याचे ते मलबार हिलचे घर, तिथून दिसणारा, तो अंतर्मुख करणारा रोजचा सूर्यास्त, तिथला भणाणलेला वारा, त्याबरोबर सळसळणारी झाडे आणि हळूहळू हृदयात उतरत जाणारी संध्याकाळ. हे दृश्य मी अनेक वेळा साठवून ठेवले आहे. अगदी आत्ता म्हणजे तो जाण्याच्या आदल्या महिन्यात त्याच्याकडे गेलो होतो मी. एखाद्या स्टोरी-टेलरच्या तटस्थपणे, त्याने मला स्वतःच्या अजिबात बऱ्या न होणाऱ्या दुखण्याची सुरुवात कशी झाली ते सांगितले. हे सगळे अगदी तपशीलात सांगताना त्याचा स्वर कुठेही कापला नाही. गळा भरून आला नाही की हताश शब्दांचे बुडबुडे उमटले नाहीत. मध्येच अगदी एकदाच, ''दीपक, लोक काहीही म्हणोत आता माझे काही खरे नाही.'' असेही अस्फुटसे म्हणून गेला. मला आठवते किमान तासभर तरी बोलत होता तो. मध्येमध्ये विनोद करत होता. मलाच भरून येत होते. मला आठवते मृदुला घरी येणार होती आणि त्यांना कुठेतरी बाहेर जायचे असावे. त्या प्रकाशाने भरलेल्या घरात अंधार दाटला, तसे उठलो आम्ही. मला म्हणाला, ''जा तुला लांब जायचे आहे. बरे झाले आलास. चल तुला खाली सोडतो. मी म्हणालो कशाला उगाच? तर म्हणाला मला चालता येते. आम्ही त्याच्या घराचा तो भक्कम रुंद लाकडी जिना उतरलो. चालत चालत आणखी

अनेक विषयांवर गप्पा मारत निघालो आम्ही. मधेच कोणाचा विषय निघाला की त्यांची बोलण्याची, हातवाऱ्यांची अप्रतिम लकब करत होता तो. रमेश अनेक नटांच्या/दिग्दर्शकांच्या नकला फार उत्तम करायचा. त्याने काशिनाथ घाणेकरांचा रोल केल्यावर एकदा डॉ. काशिनाथ घाणेकर त्याने केलेल्या प्रयोगाला आले असताना काय घडले याची एक मर्मस्पर्शी आठवण सांगितली. त्याचे डोळे डॉ. घाणेकरांच्या आठवणीने बहुधा भरून आले असावेत. मला त्या प्रकाशात दिसले नाही पण त्याचा स्वर भूतकाळात गेल्यासारखा अस्पष्ट झाला होता. एकदोन नाटकांचे असे झाले होते आमच्यात, की त्याने नाही सांगितल्याने ते रोल माझ्याकडे आले होते एक त्यातले शन्नांचे आणि दुसरे अर्धसत्य. 'तू वेगळेच केलेस काहीतरी. त्या रोलमध्ये काही करण्यासारखे होते असे मला वाटले नव्हते. बरे झाले, तू उशिरा आलास इथे.'

एका भरलेल्या स्तब्धतेने मी त्याचे गेले दीड तास सगळे ऐकत होतो. कितीतरी विषयांवर, माणसांवर मोकळा बिनधास्त बोलला तो. रमेश असाच होता निरागस जे मनाला वाटेल ते बोलून टाकणारा. त्याने आपली मते व्यक्त करतांना कधीही भंपकपणा केला नाही. खोटे वागला नाही की बोलला नाही. लोकांच्या वागण्यातल्या विसंगती दाखवून दिल्या पण टवाळी केली नाही. तो भांडला तेही कडकडून आणि अनेक लोकांना आपलेसे केले तेही आतून, अनेक नवोदित कलाकारांना त्याने मदत केली. अमेरिकेतल्या आमच्या दौऱ्यातल्या आठवणी तर अत्यंत हृदयंगम अशाच आहेत.

आम्ही त्यादिवशी बोलत-बोलत पार त्याच्या कंपाऊंडच्या बाहेर पडत तिथल्या मंत्र्यांच्या बंगल्यापर्यंत गेलो. मी त्याला म्हणालो, ''चल खूप लांब आलो आपण. तुला परत सोडतो.'' त्याने मृदुलाला फोन लावला म्हणाला, ''कधी येणारेस? लवकर ये नाहीतर मी आणि दीपक एकमेकांना रात्रभर, रस्ता आणि घरी सोडत राहू असेच.'' मग मला म्हणाला, ''तुझे प्रवास खूप असतात माहीत आहे मला. पण असा येत जा रे दुपारचा. आज कितीतरी दिवसांनी इतके बोललो मी. आज छान झोप लागेल.'' मला खरे तर काही बोलताच आले नाही, त्याचा हात मी हातात घेतला म्हणालो. नक्की येतो. ज्याच्याकडे इतका आत्मविश्वास आहे, मृत्यूचे स्वर ऐकू येत असतानाही जो इतका ठाम आहे, त्याला मी काय सांगणार ?

मी त्या कोपऱ्यावर वळलो तेव्हा मी पाहिले, तो तिथेच त्या रस्त्यावर उभा राहून बघत होता. माझ्या नजरेत त्याचे हे अखेरचे चित्र आता कोरले गेलेय. पांढराशुभ्र इन केलेला सदरा, ताठ उभे राहणे आणि. त्या काळकठोर दिवसातही त्याला सोडून न गेलेले, ते त्याच्या चेहऱ्यावरचे निरागस हसू. एक संपूर्ण मित्र.

रमेश तू निघून गेलास एखाद्या प्रवाहासारखा आपल्या हातात कुठे असते रे थांबणे? निघून जाणे हेच तर भागधेय आपले. पण तरी सांगू, ज्या ज्या वेळी जगताना हेतुशून्य, निर्विष असे अल्पसे का होईना पण क्षण येतील तेव्हा तुझा आठव नक्की येणार. आणि म्हणून तू अवती भवती रेंगाळणार हे ही नक्की!

**- दीपक करंजीकर**

भ्रमणध्वनी : ९८८१५४६५७८
deepak.karanjikar@gmail.com

ग्रंथाली

# घातसूत्र

**दीपक करंजीकर**




**मूल्य ८०० रुपये,**
**सवलतीत ५०० रुपये**
**टपालखर्च ५० रुपये**

दीपक करंजीकर यांनी या सर्वांच्या पलीकडे नेणारा, म्हटले तर चित्तथरारक, सर्वंकष आणि त्याचवेळेस व्यासंगी उद्बोधन-प्रबोधन करणारा, पण एक उत्कंठापूर्ण, अर्वाचीन इतिहासाने सजलेला, समकालीन जागतिक शोधग्रंथ लिहिला आहे. सध्याच्या विलक्षण गुंतागुंतीच्या, आर्थिक अरिष्टाच्या, संभाव्य प्रलयसमान भासणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रवाहांचा घेतलेला हा वेधक शोध आहे.

**- कुमार केतकर**



# स्त्री असण्याचा अर्थ

अनुजा जोशी

**स्त्री ही साक्षात सर्जनाची भूमी आहे. रुजवणं, जगवणं हा स्त्री असल्याचा एक मूलभूत अर्थ आहे. तुफानी वादळात, संकटात, प्रतिकूलतेत टिकून राहाणं, तग धरणं, जगण्याची शर्थ करणं ही जीवनेच्छा म्हणजे तिची जिजिविषा!**

पुन्हा जागतिक महिलादिन!

पुन्हा एकवार स्त्रीच्या अस्तित्वाचा, जाणिवांचा उद्घोष!

तिचं स्वातंत्र्य, मुक्ती आणि शक्तीचा जयघोष.

स्त्रीचे हक्क, न्याय, अन्याय, अत्याचारांचा बोलबाला.

तिची कर्तव्ये, कर्तृत्व व आकांक्षांचा गलबला....

समस्त स्त्री-जातीचा वाढदिवस असावा अशा उत्साहाने ८ मार्च सर्वत्र साजरा होतो.

पुरुषप्रधान संस्कृतीशी जमेल तेवढं जुळवून घेत व जमेल तेवढा संघर्ष करत स्त्रीने आजवर केलेली वाटचाल आपल्या डोळ्यांसमोरच आहे. प्राचीन काळातली चार भिंतीत कोंडलेली स्त्री आज स्वतःच्या मुक्त आभाळाखाली वावरते आहे, हे आजवरच्या स्त्री-मुक्ती चळवळीचं फलितही आपण 'याचि डोळा याचि देही' अनुभवतो आहोत, पण असं असलं तरी प्रश्न काही संपत नाहीत. आणि अर्थातच उत्तरांच्या शक्यताही वाढत गेलेल्या दिसताहेत. जुनेच प्रश्न नवनवी रूपं घेऊन समोर उभे ठाकलेले दिसताहेत. स्त्री आपल्या परीने प्रत्येक नव्या प्रश्नाला नवं उत्तर शोधते आहे. अशी कोणती ताकद 'स्त्रीत्वा'मध्ये आहे, जी संघर्ष घुसळून सकारात्मक नवनीत काढू शकते, दुःखांची घुसळण करून सुखाचं सार काढू शकते, वेदनांचं मंथन करून संवेदनांचं सत्त्व काढू शकते.

स्त्रियांचं आयुष्य, त्यांचे प्रश्न, त्यांचे हक्क, कर्तव्ये, स्वातंत्र्य, मुक्ती, त्यासाठी संघर्ष नि चळवळी या सर्वांच्या मुळाशी एक विलक्षण प्रश्नकुतूहल आहे, ते म्हणजे 'स्त्रीचं असणं म्हणजे नेमकं काय?' गुंत्याचं एक विशिष्ट नेमकं टोक असतं, व ते ओढलं की सगळा गुंता सुटतो. तसंच आपण 'स्त्री' आहोत म्हणजे नेमकं काय काय आहोत? या प्रश्नाची उकल स्त्रीला स्वतःची स्वतःला जेवढी मुळातून होत जाईल, तेवढा तिच्याभोवती असणारा प्रश्नांचा गुंता सुटत जाईल, असं मला अनेकदा अनेक स्त्रियांच्या समस्यांचा विचार करताना जाणवत राहिलं आहे.


आज महिलादिनाच्या निमित्ताने स्त्री-पुरुष समानता, स्त्री-पुरुष संबंध, अशा प्रकारे स्त्री व पुरुषाचा वेगवेगळा विचार न करता, आपण इथे एकाच व्यक्तीमधे असणाऱ्या 'स्त्रीत्व' व 'पुरुषत्व' अशा दोन वृत्तींचा विचार करायचा आहे.

एकाच व्यक्तीमध्ये एकाचवेळी स्त्रीत्वही असतं व पुरुषत्वही असतं. पुरुष व्यक्तीमध्ये त्यांच्या पुरुषत्वाबरोबर स्त्रीत्व असतं व स्त्री व्यक्तीमध्ये तिच्या स्त्रीत्वाबरोबर पुरुषत्वही असतं. निसर्गाने स्त्री-पुरुषाला वेगवेगळी शरीरं दिली, पण गुणकर्मांमध्ये त्याने असमतोल केला नाही. निसर्गाच्या हातातला तराजू नेहमीच संतुलित राहिला आहे. तो कुणावर कधी अन्याय करत नाही. देताना हात आखडता घेत नाही, तशी उगीचच अवाजवी उधळमाधळही करत नाही. एक बाजू सरस असेल तर दुसरी थोडी दुबळी असतेच असते. तांबड्या पिवळ्या गडद आकर्षक रंगाच्या फुलांना गंध असत नाही व मोहक वासाच्या बारीक-बारीक फुलांना आकर्षक रंग असत नाही. (चाफा, सुरंगीसारखे अपवाद वगळता.) रंगाची उधळण केली तर गंध माफक व गंधाची उधळण केली तर रंग माफक असा एकूण संतुलित मामला असतो.

त्याचप्रमाणे स्त्रीचं शरीर व मन दुबळं-कमकुवत, नाजूक असलं तरी तिच्या धारणा, क्षमता, जिद्द मात्र प्रचंड कणखर असते. आणि पुरुषाच्या कणखर देह-मनामध्ये चिकाटीची, भावभावनांच्या ओलाव्याची कमी असते. सृजनाच्या व नवनिर्मितीच्या साक्षात हळव्या भूमीची उणीव असते! असा संतुलित हिशेब ढोबळमानाने आपण लिहू शकतो.

जेव्हा एखादी स्त्री घरसंसार सांभाळत नोकरी, कामधंदा अर्थार्जनही करते, तेव्हा ती स्वतःमधलं 'स्त्रीत्व' सांभाळत स्वतःमधलं 'पुरुषत्व' किंवा 'पुरुषार्थ'ही चांगल्या प्रकारे सिद्ध करते. एक व्यक्ती म्हणून तिच्यामध्ये असणारं स्त्रीत्व व पुरुषत्व दोन्ही जबाबदाऱ्या ती यशस्वीपणे निभावते. आपल्याकडे स्त्रीने असा पुरुषार्थ निभावण्याला आता हळूहळू समाजमान्यता मिळाली आहे. किंबहुना या धावत्या यंत्रयुगात स्त्रीनेही पुरुषाबरोबर अर्थार्जन करावं,

जबाबदाऱ्या पार पाडाव्या ही परिस्थितीची गरजच ठरली आहे. स्त्रीच्या अंगी असणारी विविध कला–कौशल्ये, गुण–प्रयत्न–परिश्रम यांच्या जोरावर घरात आणि घराबाहेर दोन्ही ठिकाणी ती समर्थपणे वावरते आहे. आणि नेमकी हीच गोष्ट पुरुषाच्या बाबतीत घडताना दिसत नाही. पुरुषामध्ये असणारं 'स्त्रीत्व' चांगल्याप्रकारे विकसित झालेलं दिसून येत नाही. घरातली कामं करणं, भाजी चिरणं, जेवण करणं, रांगोळी घालणं, कलाकुसर करणं, सजावट करणं, सणवार साजरे करणं, परंपरा पाळणं, पाहुणचार करणं अशासारख्या गोष्टी स्त्रियाच मन:पूर्वक करताना दिसतात. स्त्रीमधे उपजतच हे सारं कलाकौशल्य, कसब अधिक असल्याने ती एकटीच हे सारं करीत राहते. पुरुष या 'घरगुती' गोष्टी शिकून घेण्याच्या फंदात तर पडत नाहीच, उलट ही सगळी कामं 'बायकी' म्हणून हिणवली जातात. कमी प्रतीची ठरवली जातात.




पुरुष हा पुरुष म्हणून जन्माला येत नसून त्याला 'पुरुष' म्हणून आधी घराकडून, नंतर समाजाकडून व नंतर व्यवस्थेकडूनच घडवलं जातं! मुलगा झाल्यावर 'पेढा' आणि मुलगी झाली तर 'बर्फी' इथंपासून भेद सुरू होतो, असं गंमतीने म्हटलं जातं. हे गंमतीने असलं तरी त्यात बरंच तथ्य आहे. पुढे मुलाच्या हातात 'बॉल' आणि मुलीच्या हातात 'बाहुली' दिली जाते. त्यापुढे जाऊन 'मुलगी आहेस तू... नीट बस' आणि 'पुरुषासारखा पुरुष तू... रडतोस काय?' असं म्हणून लहानपणापासूनच मुलाचा अहंकार जागवला जातो. मुलीची कोंडी केली जाते. 'तो बघ कोण 'बागुलबुवा' आला' असं म्हणून ज्याच्याविषयी दहशत, भीती वाटावी असा कुणीतरी 'तो' मुलामुलींच्या नजरेसमोर उभा केला जातो. आणि घाबरून रडू लागणाऱ्याला मुळूमुळू रडणारी 'भित्री भागुबाई' म्हटलं जातं. जिद्द, ईर्षा, महत्त्वाकांक्षेचं प्रदर्शन 'चल, दाखवच आता जिंकून... तू काय बांगड्या भरल्यायस की काय?' अशा प्रकारे केलं जातं. म्हणजे अर्थातच बांगड्या भरणारी मुलगी किंवा स्त्री ही बुळचटच असते, असं मुला–मुलींच्या अबोध मनावर बिंबवलं जातं. 'तू मुलगी आहेस, तुला जेवण करता यायला हवं' असं मुलींना ठासून सांगितलं जातं. 'त्यांनी घरकामात आतापासूनच लक्ष घालायला हवं, मुलींवर चांगले संस्कार व्हायला हवेत' अशा उपदेशांचे डोस मुलींना पाजले जातात.

एक माणूस म्हणून स्वतःचं अन्न मुलालाही स्वतःला शिजवता यायला पाहिजे. स्त्री व पुरुष दोघंही 'माणूस' आहेत. माणूस आहोत म्हणून आपण फारच तोकडे आहोत. आपल्याला वनस्पतींसारखी हिरवी पानं आणि पानांमधे हरितद्रव्य नाही की जेणेकरून सूर्यप्रकाशाच्या सहाय्याने आपण आपले अन्न तयार करू शकू! आपण धारदार नखं, सुळे, पंजे असणारे प्राणी नाही की भुकेच्या वेळी एखादा जीव झडप घालून पकडून फाडून खाऊ शकू. आपण टोकदार चोची असणारी पाखरं नव्हेत की झाडापेडात लपलेल्या अळ्या नि कच्चीबच्ची फळं खाऊन पोट भरू शकू! माणूस सगळ्याच बाजूंनी अपंग आहे. पराधीन आहे. फक्त हुशार मेंदू हीच त्याची जमेची बाजू. त्यावरच तो सर्व सृष्टीवर मालकी असल्याच्या थाटात वावरतो आहे. या मेंदूचा वापर करून स्वत:चं पोट भरायला माणसाने जो मार्ग शोधून काढला आहे त्याला 'स्वयंपाक' असं म्हणतात. 'स्वयं' व 'पाक' म्हणजे स्वयंपाक, म्हणजेच स्वत:चं जेवण स्वत: तयार करणं! मग ती स्त्री असो किंवा पुरुष, त्याला स्वत:चं अन्न स्वत: शिजवून खाता येईल एवढं किमान कौशल्य असणं गरजेचंच आहे. 'स्वयंपाका'चा हा अर्थ पाहिल्यास आधी आई, बहीण, काकू, आत्या, मावशी, आजी व नंतर बायको 'माझा स्वयंपाक' करते हे किती हास्यास्पद आहे!

पुरुषालाही एक माणूस म्हणून जेवण करता यायला हवं! त्यालाही माणूस म्हणून सगळं घरकाम जमायला हवं.

या गोष्टी मुलामुलींना अशाप्रकारे समजून सांगायला हव्यात, ज्या आपल्या व्यवस्थेत सोयीस्करपणे नजरेआड केल्या जातात. स्त्रियांचे गुण, स्त्रियांची कामं, स्त्रियांची राहाणं आणि स्त्रियांचं जगणंच पुरुषापेक्षा कसं हलकं आहे, निकृष्ट दर्जाचं आहे, दुय्यम आहे हे विविध प्रकारे इतकं खोलवर मुलामुलींच्या मनावर ठसवलं जातं, रुजवलं जातं, वाढवलं जातं. याच समजुतींची मुळं खोलवर रुतत जातात. धारणांची खोडं मजबूत होत जातात. मुलगी 'बाई' बनत जाते आणि मुलगा 'पुरुष' होत जातो!

स्त्री–पुरुष समानता ही फक्त कपडेलत्ते, बोलण्या–फिरण्यातली नसून वैचारिक पातळीवरची असणे अपेक्षित आहे. स्त्रीच्या हक्कांचा, न्यायाचा बराच बोलबाला व फलश्रुतीही झाल्यानंतर स्त्रीवादी चळवळींनी आता अशा प्रकारचं मुळातलं काम करायच्या दिशेने, वैचारिक भेदभावाचं उच्चाटन करण्याच्या दिशेने पावलं टाकलेली दिसताहेत, ही खूप समाधानाची गोष्ट आहे.

आजवरच्या स्त्रीवादी चळवळीने स्त्रीमधलं 'पुरुषत्व' जागवून तिला समर्थपणे उभं केलं. आज पुरुषामधलं 'स्त्रीत्व' जागवून त्याला समंजस सहकार्याचा हात पुढे करत उभं करणं, ही परिस्थितीची गरज ठरली आहे. आणि यासाठी आवश्यक बनलं आहे ते 'स्त्रीत्व' समजून घेणं. 'स्त्री असण्याचा अर्थ' जाणून घेणं!

*स्त्रीचा जन्म मिळाला म्हणून*
*फक्त तिनंच का पेलावं स्त्रीत्व?*
*कळायला हवा*
*पुरुषी होत चाललेल्या समाजाला*
*स्त्री असण्याचा अर्थ!*
*निभवायला हवं प्रत्येकानंच*
*आपापल्या परीने स्त्रीत्व.*

*स्त्रीचा देह असणं*
*म्हणजे स्त्री असणं नाही*
*स्त्री असणं म्हणजे*
*सर्जक आनंदाचा शोध घेत*
*जगणं, जगवणं*
*अखंड तेवती ठेवणं जिजीविषा*
*टिकून राहाणं तुफानी वादळातही*

*स्त्री असणं म्हणजे*
*जतन करणं अस्तित्वाचे अक्षांश-रेखांश*
*रोखून धरणं महायुद्धांच्या शक्यता*
*सर्व मूल्यांचा आधार शाबूत ठेवणं*
*स्त्री असणं म्हणजे*
*सहवेदना... प्रेम... तितिक्षा!*

*पुरुषही पेलू शकतो असं स्त्रीपण*
*जशी स्त्री निभावतेय सहज पुरुषपण!!*

आसावरी काकडे यांनी स्त्री असण्याचा हर एक अर्थ या कवितेमध्ये उलगडून सांगितला आहे.

फक्त स्त्रीचा देह म्हणजे स्त्रीत्व नव्हे. स्त्रीच्या तनामनाच्या सर्व क्षमता व शक्यता म्हणजे स्त्रीत्व. आपण आधुनिक विज्ञानाच्या भाषेतही स्त्रीत्व समजून घ्यायला हवं. 'XX' अशी गुणसूत्रांची रचना व इस्ट्रोजेन-प्रोजेस्टेरॉन हार्मोन्स अशा शास्त्रीय भाषेत स्त्रीत्व समजून घेता येतं. पुरुषामध्ये असणारी 'XY' अशी गुणसूत्र रचना व टेस्टोस्टेरॉन हार्मोन्समुळे निर्माण झालेलं 'पुरुषत्व'सुद्धा याबरोबरच समजून घ्यावं लागतं. जेव्हा मुलगा होत नाही म्हणून सासरच्या माणसांकडून सुनेचा छळ मांडला जातो अशा परिस्थितीत या गुणसूत्रांच्या खेळामुळे होणारा गुंता त्यांना पटवून द्यावा लागतो. पुरुषामध्ये 'XY' अशी गुणसूत्ररचना असते, तर स्त्रीमध्ये 'XX'

अशी गुणसूत्रांची जोडी असते. यातल्या प्रत्येकी एकेकाचा दुसऱ्यातल्या एकेकाशी संयोग होऊन त्यानुसार गर्भाचं लिंग ठरतं. स्त्रीकडे दोन्ही 'द' असल्यामुळे कोणत्याही वेळी किंवा प्रत्येकवेळी 'X'चाच संयोग घडून येतो. स्त्रीच्या या 'X'ला पुरुषातील 'X' मिळतो, तेव्हा 'XX' गुणसूत्र रचना असणारी मुलगी जन्माला येते. व जेव्हा स्त्रीच्या X ला पुरुषातील Y मिळतो, तेव्हा XY गुणसूत्ररचना असणारा मुलगा जन्माला येतो. म्हणजे मुलगा होणे, न होणे हे स्त्रीवर अवलबूंन नसून पुरुषावरच अवलंबून असतं. पण मुलगा होत नाही म्हणून सुनेला छळणाऱ्या सासूला मात्र तिचा मुलगाच याला 'जबाबदार' आहे, हे पटवणं खूप कठीण गोष्ट असते, हेही तेवढंच खरं!

अर्थात या गोष्टी निसर्गनियमानुसार घडत असतात. त्यात कुणाच्या इच्छे-अनिच्छेचा प्रश्नच असत नाही. इथे स्त्रीत्व व पुरुषत्वाचा वैज्ञानिक अर्थ स्पष्ट केला आहे एवढंच!

स्त्रीभ्रूणहत्या व त्यामुळे घटलेलं मुलींचं प्रमाण या भीषण समस्येची चर्चा, उपाय सर्वश्रुत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा तो एक मोठा दुरुपयोग आहे. प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने स्त्रीभ्रूणहत्येच्याही आधी गुणसूत्रांच्या पातळीवरच स्त्रीला मारलं जाण्याचं षड्यंत्र छुपेपणाने खेळलं जातं, ही खूप धक्कादायक भीषण गोष्ट आहे. पुरुषाच्या वीर्यामधील 'X' गुणसूत्र असलेले शुक्राणू वेगळे करून 'Y' गुणसूत्राचे शुक्राणू तेवढे स्त्रीमध्ये प्रविष्ट करून 'XY' गुणसूत्ररचना असलेला 'मुलगा'च जन्माला घातला जातो. हे छुपं दारुण वास्तव आहे.

स्त्रीभ्रूणहत्येच्याही आधी स्त्रीगुणसूत्रहत्या करणाऱ्या या भयावह काळात आपण पुरुषामधलं 'स्त्रीत्व' जपण्याच्या गोष्टी करत आहोत! जे बीज अजून अकुंरातही नाही त्या बीजाला लागणारी कीड आणि वृक्ष झाल्यानंतर त्याच्या फळाला लागणारी कीड या दोन्ही पातळ्यांवर स्त्रीच्या अस्तित्वाचा संघर्ष चालूच आहे. ही स्त्रीच्या इतक्या मुक्तीनंतरची वस्तुस्थिती आहे.

स्त्रीकडे पूर्वापार एक भोग्यवस्तू, एक करमणूक, कर्तव्ये करणारं यंत्र, अशा दृष्टीने बघितलं गेलं. अर्धांगी, वामांगी ठरवून ठरवून दुय्यम स्थान दिलं गेलं. इथून संघर्षाला सुरुवात झाली. स्त्री ही एक 'माणूस' आहे हे ओरडून सांगण्याची वेळ आली. म्हणून स्त्रीचं हे 'माणूसपण' शास्त्रीयदृष्ट्याही पटवून देण्याची गरज भासत आहे. शरीर, मन व बुद्धी अशा त्रिकोणात आयुष्याचा विचार केला तर हे सोपं पडतं. शरीराच्या बाबतीत स्त्री-पुरुष दोघांमध्ये वेगळेपण आहे. मनही स्त्रीचं हळवं व पुरुषाचं कणखर असं भिन्न आहे. पण बुद्धी किंवा मेंदू मात्र दोघांचाही सारखाच- म्हणजे 'माणसाचाच' असल्यामुळे 'बाईलबुद्धी' वगैरे काही अस्तित्वातच नसतं. तो फक्त पुरुषी वर्चस्वाने स्त्रीला हिणवण्याचा भाग असतो. यावरून स्त्रीचं माणूस असणं नीट समजून घेतलं तर स्त्री असण्याचे विपरित अर्थ लावले जाणार नाहीत.

स्त्री ही साक्षात सर्जनाची भूमी आहे. रुजवणं, जगवणं हा स्त्री असल्याचा एक मूलभूत अर्थ आहे. तुफानी वादळात, संकटात, प्रतिकूलतेत टिकून राहाणं, तग धरणं, जगण्याची शर्थ करणं ही जीवनेच्छा म्हणजे तिची जिजीविषा! एका वैद्यकीय निरीक्षणावरूनही ही गोष्ट सिद्ध झाली आहे. साधारणपणे ४-५ महिन्यांच्या नैसर्गिक गर्भपातामध्ये ॲबॉर्ट झालेला गर्भ हा बऱ्याचवेळा 'पुरुषगर्भ' असतो. स्त्रीगर्भाचे ॲबॉर्शन सहजासहजी होत नाही किंवा पुरुषगर्भापेक्षा कमी प्रमाणात होते. गर्भात असतानापासूनच ती शर्थीने सव्हाईव्ह होत असते. तिची चिकाटी, सहनशक्ती, टक्कर देण्याची वृत्ती- तितिक्षा ही अशी तिच्या रक्तातच असते. 'X' गुणसूत्र मुळातच 'Y' गुणसूत्रापेक्षा लांब असतं व 'क्रोमोझोमल मटेरियलसुद्धा त्यामुळे अर्थातच त्यात जास्त असतं. असं मुळातल्या रचनेतही सरसपण असणारी स्त्री पुरुषापेक्षा दुय्यम मानली गेली हा केवळ दैवदुर्विलासच आहे.

अस्तित्वाचे अक्षांश-रेखांश जतन करणे, विश्वाच्या अफाट पसाऱ्यातलं आपलं बिंदूएवढं स्थान बळकट करत राहाणं, प्रयत्नांची पराकाष्ठा करणं हेही वरील कवितेत म्हटल्याप्रमाणे तिच्या 'स्त्री'

असल्याचेच विभ्रम आहेत. तिच्या अगदी बाल्यावस्थेपासूनच तिची ही धडपड सुरू होते. बाळाचं पालथं पडणं, रांगणं, बसणं, उभं राहणं, चालू लागणं, धावणं हे सगळे प्रगतीचे टप्पे मुलापेक्षा मुलगी लवकर पार करू लागते. 'मुलाला कसली घाई नसते' असं गंमतीने जाणत्या बायका म्हणताना दिसतातच ना? पुढेही अडीअडचणीत घर सांभाळणारी मुलगी, कौटुंबिक आपत्तीत भावंडांचा सांभाळ करणारी मातेसमान बहीण, प्रतिकूलतेत संसार करणारी विधवा आई, प्रसंगी नातवंडांना धीराने वाढवणारी आजी अशा अनेक रूपांत स्त्रीच पडझडत्या आयुष्यांना सावरून राहिल्याचं जिथ-तिथं दिसून येतं.

अशा विविधांगी भूमिका निभावणारी स्त्री 'रजोप्रवृत्ती' किंवा 'ऋतूकाल' नावाच्या विविधरंगी ऋतूंमधून वाटचाल करत असते. 'रजःस्राव' हे निसर्गात माणसाच्या मादीमधेच दिसणारं एकमेव आश्चर्य आहे. हा ऋतू सुप्तावस्थेत असणारं तिचं बाल्य, ऋतूच्या आगमनानंतरचं रसरशीत तारुण्य व त्याभोवती फिरणारं मानवी भावजीवन- कामजीवन- वैवाहिक जीवन- कुटुंबव्यवस्था- समाज व्यवस्था अशा अनेक साखळ्या आणि ऋतूंच्या निवृत्तीनंतरचा काळ, वार्धक्य, अशा अनेक स्थित्यंतरामधूनही 'स्त्री' नावाच्या ऊर्जेचा प्रवास निरंतर राहिला आहे.

वादळात फडफडणारी ज्योत होऊन जगत व जगवत असताना या वादळाला रोखण्याचं अजब कसब आणि वरील कवितेत म्हटल्याप्रमाणे महायुद्धांच्या शक्यता रोखून धरणारं दया-क्षमा-शांती व प्रेमाचं मूर्तस्वरूप हा या स्त्रीत्वाचाच एक अलौकिक विभ्रम आहे. सर्व जीवनमूल्ये शाबूत ठेवणारा तो आधार आहे.

महिलादिनाच्या निमित्ताने असं वैचारिक मंथनही व्हायला हवं. स्त्रीत्व व पुरुषत्व यांचा मेळ साधला जायला हवा. पुरुषाच्या आत लपलेल्या प्रेम, माया, वात्सल्य, समंजसपणा, हळवेपणा, जिद्द, चिकाटी, सहनशक्ती या 'स्त्री' असण्याच्या अर्थाने त्याच्या दंभ, अहंकार वर्चस्वी वृत्तीवर मात करायला हवी. आणि हळव्या स्त्रीत्वाला तिच्यातल्या कणखर पौरुषाने साथ द्यायला हवी... आयुष्याचं आभाळ अशा द्विगुणी 'सार्थका'ने भरून जायला हवं...!

**- डॉ. अनुजा जोशी**
भ्रमणध्वनी : ९४२३३०८७५०
dr.anupamj@gmail.com

ग्रंथाली

# चार सख्य चोवीस

**संपदा जोगळेकर-कुळकर्णी**
**हर्षदा बोरकर**
**सोनाली लोहार**
**निर्मोही फडके**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

संपदा जोगळेकर-कुळकर्णी, हर्षदा बोरकर, निर्मोही फडके आणि सोनाली लोहार या रंगभूमी, साहित्य, नृत्य, सामाजिक चळवळ अशा चौपदरी क्षेत्रातील चार कर्तबगार स्त्रिया. त्या ठरवून एकाच वेळी २४ लघुकथा लिहिण्याचा घाट घालतात ही संकल्पनाच लक्षवेधी आहे. या 'चारचौघी'च्या विशेष प्रकल्पाची काही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात. सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात उपक्रमशील असलेल्या 'ठाणे' शहरातील समवयीन, समविचारी, सहसंवेदना जपणाऱ्या या चार 'सख्या...!' परस्पर संवादातून अभिव्यक्तीचा हा वेगळा आकृतीबंध त्यांनी ठरवून स्वीकारलाय. संपादन, संकलन, विशेषांक अशा अंगानं 'मिळून साऱ्याजणीं'चा असा समान स्वर आपण बऱ्याचदा ऐकला आहे पण अशी अभिनव संकल्पना आकाराला आणल्याबद्दल या चौघींचं विशेष अभिनंदन!

**- चंद्रकांत कुलकर्णी**



# मला... काही सांगायचंय!

उषा पुरोहित

**मी जेव्हा स्वत्व, स्वाभिमान आणि आत्मसन्मान अशा त्रिगुणांच्या आधारे स्त्रीने जगावे असे म्हणते तेव्हा त्या त्रिगुणांचे मूल्य आणि त्यांचे तेज यत्किंचितही कमी होऊ नये अशी तिची वर्तणूक असली पाहिजे. निवड केली तर ठामपणे स्वीकारावी आणि ताठ मानेने वाटचाल करावी.**

**हो,** मला काही सांगायचय्. मला सांगणे महत्त्वाचे वाटते. अनेक वर्षे आपले स्त्री म्हणून जगणे याचा स्वतःशी जोडलेला, समाजाशी जोडलेला, विविध नात्यांशी जोडलेला अर्थ काय याचा विचार करायला मला वेळ झाला नाही. पूर्ण आयुष्यालाच एक अर्थ मला द्यावयाचा होता आणि हा अर्थ केवळ स्वतःपुरता मर्यादित नव्हता. माझ्या अस्तित्वाची आणि त्याच्याशी निरंतर आणि अक्षय जोडलेल्या अर्थाची दखल इतरांनी घ्यायलाच हवी अशी जिद्द होती आणि ह्या जिद्दीचा खुराक मी माझ्या विचाराला सतत देत आले.

आता परिस्थिती वेगळी आहे. आता मी हे भावार्थ निरुपण करु शकते!! वय, बुद्धी आणि संवेदना ज्येष्ठतेनुसार परिपक्व आहेत म्हणून माझे सांगणे मांडण्याचा विचार माझ्या मनात आला.

मी कुंडीतील रोप नाही. मी तप केले आहे आणि आयुष्याशी सतत खडा संघर्ष केला आहे. त्यामुळे स्त्रीच्या मानसिकतेचे आधार काय असू शकतात, ते तसे का बनतात आणि स्त्रीची मानसिकता कशी व्यक्त होते ह्याचा अविरत अनुभव मला आलेला आहे. त्या अनुभवांच्या खळबळीतून पृष्ठभागावर आलेले विचार मांडते आहे.

स्त्रीच्या आयुष्यात काही प्रमेये असावीत आणि काही कधीच नसावीत. जी प्रमेये असून नयेत ती अशी :-

१) पुरुष स्त्रीपेक्षा सरस असतो. निसर्गानेच त्याला तसा बनवला आहे.

२) पुरुष कोणत्याही परिस्थितीत खंबीरपणे उभा राहू शकतो.

३) पुरुषाच्या इच्छेप्रमाणे स्त्रीला वागणे भाग आहे.

४) तसे न केल्यास आयुष्याचा समतोल बिघडू शकतो आणि स्त्री पुरुषाचे कोणत्याही व्यवस्थेमध्ये एकत्र राहणे अशक्य होते.

५) आयुष्यात आणि समाजात स्थिर राहावयाचे असेल, तर पुरुषाच्या आधाराची गरज आहे. त्याकरिता कमीपणा स्वीकारणे, निम्न स्तरावरचे स्थान पत्करणे आणि असेच करत सतत हसतमुख राहणे ही सुखी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. जी प्रमेये असावीत ती अशी :-

१) स्त्री निसर्गतः फक्त हळवी आहे. दुबळी नाही.

२) स्त्री पुरुषापेक्षा कमी प्रतीची नाही. किंबहुना स्त्री आणि पुरुषामध्ये प्रतवारी लावणे हे मूढतेचे लक्षण आहे.

३) स्त्री आणि पुरुष एकमेकांशी सामंजस्याने वागले नाहीत तरच आयुष्याचा समतोल बिघडतो. सामंजस्य आत्मपरीक्षणातून येते. केवळ स्त्रीनेच त्याचा भार उचलावा असे नाही.

४) स्त्री-पुरुषाचे सुखाने एकत्र राहणे हे त्यांच्यामधील बंध किती पक्का आहे ह्यावर अवलंबून राहील. तोल बिघडला तर एकमेकांचा हात धरूनच तो पूर्ववत करावा लागेल. स्त्रीनेच हे प्रयत्न करावेत असे नाही कारण तसे केल्यास ते प्रयत्न यशस्वी होतील आणि सहजीवनाला साफल्याचे कोरे वस्त्र मिळवून देतील असे नाही.

५) आयुष्यात स्थिर राहण्यासाठी पुरुषाची आवश्यकता आहेच असे नाही. एक विचारी आणि भावनाशील जोडीदार लाभला तर उत्तम! नाहीतर व्यक्ती म्हणून निसर्गाने दिलेल्या प्रत्येक क्षमतेचा यथार्थ उपयोग करून, स्थिरता स्त्री नक्कीच मिळवून शकते.


दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की सर्वसामान्यपणे स्त्री प्रमेयांचा पहिला गट स्वीकारत आणि आयुष्यातील प्रत्येक घटना, प्रत्येक समस्या, प्रत्येक समस्येवरील तोडगा हा त्या प्रमेयांशी पडताळून पाहते.

स्त्रीवर अशी वेळ का आली? वर्षानुवर्षे पहिल्या गटातील प्रमेयांनी स्त्रीवर गाजवलेली दिसते. सर्वसामान्यपणे अगदी सनातन काळापासून शेतीप्रधान संस्कृतीचा परिणाम म्हणून पुरुषप्रधान संस्कृती उदयाला आली असे म्हणतात. शेतीच्या कामासाठी लागणारे शारीरिक बळ पुरुषात होते म्हणून हळूहळू तो बलवान घटक झाला आणि स्त्रीला दुय्यम भूमिका स्वीकारणे भाग पडले. शारीरिक बळाबरोबर साहजिकपणे येणारे द्रव्यार्जनही पुरुषाकडून

होऊ लागले आणि स्त्री सर्वार्थाने पुरुषाची अंकित झाली.

द्रव्य आणि त्याबरोबर येणारी सत्ता, निर्णय घेण्याचे अधिकार आणि त्यातून उपजणारी वर्चस्वाची भावना ही प्रक्रिया समजून घेणे म हत्त्वाचे आहे. प्रत्येक संबंध आणि संघर्ष हा द्रव्य, धन इणि ऐश्वर्य ह्यांच्या भोवतीच घुटमळताना दिसतो. 'जिसकी लाठी उसकी भैंस.' त्यामुळे द्रव्यार्जनाची लाठी हातात येताच पुरुष उन्मत झाला आणि वर्चस्व गाजवण्यासाठी लागणाऱ्या सगळया नाड्या त्याने आपणाकडे खेचल्या.

आजपर्यंत ही परिस्थिती फारशी बदलेली नाही आणि ह्याचे कारण म्हणजे द्रव्यार्जन हातातून जाताच स्त्रियांनी स्वीकारलेली पहिल्या गटातील प्रमेये गेल्या काही दशकांमध्ये स्त्रीचे स्वतंत्र द्रव्यार्जन सुरू झाले आणि वाढीस लागले परंतु तरीही स्त्रीने स्वतःवर पहिल्या गटातील प्रमेयेच लादून घेतलेली आहेत असेच चित्र आहे.




म्हणजेच स्त्रीची मानसिकता लक्षणीय रीत्या बदलेली नाही. आर्थिक स्वातंत्र्य लाभल्यामुळे आर्थिक दृष्ट्या सक्षम झालेल्या स्त्रिया थोड्या अधिक सहजपणे घटस्फोटाचा विचार करतात आणि त्या दृष्टीने पावलेही उचलतात, परंतु माझे निरीक्षण असे आहे की यापैकी बहुसंख्य स्त्रिया गोंधळलेल्या आणि म्हणून अस्वस्थ मानसिकतेत गुंतून पडतात. मुले असल्यास त्यांचेही प्रश्न कसे सोडवावे ह्या बाबतीत निर्णय घेताना त्यांची तारांबळच उडालेली दिसते आणि यातूनच मूळ मानसिकतेला, पानफुटी या वेलेसारखी पानांतून पाने फुटतच राहतात आणि पुरुषावर सूड उगवणे, त्याच्याकडून जास्तीत जास्त पोटगी किंवा भरपाई उकळणे, मुलांच्या भेटीपासून त्याला वंचित ठेवणे अशी अत्यंत नकारात्मक आणि माझ्या मते विषारी पानफुट होताना दिसते.

पहिल्या गटातील प्रमेये अनेक वर्षे स्वीकारल्यामुळे त्यांच्याशी बंडखोरी करणे स्त्रीला कठीण जाते आणि त्यात स्त्री स्वत्व, आत्मसन्मान आणि अस्मिता हरवून बसते.

पुरुष आपल्यापेक्षा सरस मानला खरा! पण आता दाखवतेच त्याला! अशा सूडभावनेच्या छत्री डोक्यावर धरून स्त्री प्रत्येक पाऊल उचलते आणि स्वतःच्याच आयुष्यावर नकारात्मकतेचे आणि नैराश्याचे सावट पसरवते.

आयुष्य सुंदरच असते. जगातील एक पुरुष आणि त्याने केलेल्या अप्रिय गोष्टी आयुष्यातील सौंदर्याला डागाळू कशा शकतील!

जे काही करावयाचे ते स्त्रीने स्वतःसाठी करायला हवे. त्यासाठी संदर्भकेंद्रे (reference point) शोधायची गरज नाही आणि इतरांच्या सल्ल्याने अगदी वकिलाच्या सुद्धा कितपत वागायचे हे स्वतः ठरवा नकारात्मकतेच्या सावटाखाली स्वतःच्या आणि कुटुंबाच्या आयुष्याची किती वर्षे वाया घालवायची याचे तारतम्य बाळगायला हवे. नाहीतर ह्या नकारात्मकतेमध्ये स्त्रिया आणि तुमच्या मुलांचा बळी जाईल.

या सगळ्या गोष्टींसाठी मोठे धैर्य लागते, पण ते आपल्याजवळ नाहीच असे रडगाणे गात बसण्यापेक्षा, जगातील एका पुरुषावर आपल्या भावनांचा ठेवा वाया घालवायचा नाही ही गाठ तिने बांधायला हवी. तरच आत्मसन्मान, स्वत्व आणि स्वाभिमान ह्यांची शिदोरी घेऊन जगण्यातील गोडवा अनुभवता येईल आणि आयुष्य सतेज होईल.

'माझ्या नवऱ्याची बायको'सारखे आयुष्य जगायचे आहे का? निःसत्व, हीन, अचरट आणि निर्बुद्ध? पण टी. व्ही.ची एखादी वाहिनी जर इतके महिने अशी मालिका दाखवते आहे तर ती बघणारा स्त्रीवर्गच त्याला जबाबदार आहे असे म्हणावे लागेल.

स्त्रीच्या मानसिकतेबद्दल काय बोलावे? मला कधीकधी अशी शंका येते की ही मालिका स्त्रीवर्गापेक्षा पुरुषवर्गच अधिक बघत असावा! आणि आपली बायकोही अशीच असावी अशी मनोमन प्रार्थना करीत असावा!

स्त्रीच्या मानिसिकतेला आणखी रोडावणारे कारण म्हणजे इतर स्त्रियांची एक वेगळीच मानसिकता, वैयक्तिक पातळीवर त्रस्त, गांजलेल्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि दुसऱ्या पातळीवर वेगवेगळ्या स्त्रीसमर्थक संस्थाचे स्त्रीला सहाय्य करणारे उपक्रम! दोघांमध्येही संतुलन नाही. आज चाळीस-बेचाळीस वर्षे वकिली केल्यानंतर हे असेच म्हणण्याशिवाय मला गत्यंतर नाही.

मला असे म्हणायचे आहे की स्त्रीने स्वतःमधील शक्ती आणि क्षमता शोधून काढावी आणि त्यासाठी दुसऱ्या गटातील प्रमेयांवर विचारधारणांची भिस्त ठेवावी.

स्त्री पुरुषापेक्षा अधिक हळवी असते ही शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालेली बाब आहे. पण ह्या शास्त्रीय वस्तुस्थितीची परिणती दुबळेपणात व्हावी आणि तो स्त्रीच्या आयुष्याचा पायाभूत घटक असावा असे विज्ञान सांगत नाही. ते पुरुषांचा समाज सांगतो. परंतु स्त्री निर्बुद्ध नाही असे विज्ञान सांगत असेल तर स्त्री बुद्धिमत्तेचा उपयोग का करीत नाही? पुरुषांच्या पहिल्याच अप्रिय कृतीनंतर त्याला खीळ का घालत नाही? 'असू दे. पहिलीच वेळ आहे', असे म्हणून अशीच कृती पुन्हा-पुन्हा करण्याचा धीटपणा ती पुरुषामध्ये का रुजवते? अप्रियतेला आपल्या संसारामध्ये मुळे रोवूच का देते? कारण तिला एकटे राहण्याची आणि एकटे पडण्याची भीती वाटते. अगदी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या स्त्रीला सुद्धा आणि मग संसारातील सगळी अप्रियता ती सहन करू लागते. मुलांचे लटके कारण पुढे करते. मुलांवर होणारा परिणाम हा त्या अप्रिय

वातावरणात राहून अधिक भयावह होतो हे त्या स्त्रीला का समजत नाही? संसारातील अप्रियता अनेक पातळ्यांवर असते. घरात शक्य असतानाही पुरेसे पैसे न देणे, लहान-सहान गोष्टीत दोष दाखवत पाणउतारा करणे, इतर स्त्रियांशी तुलना करणे, व्यभिचार करणे, दारु आणि इतर व्यसनांना बळी पडणे एक ना अनेक गोष्टी! ह्यातून मुलांवर होणार संस्कार केवळ नाकर्तेपणाचा असू शकतो. यापेक्षा स्वाभिमानाने वेगळे होऊन मुलांवरचा संस्कार असा होईल की स्वाभिमानाची जपणूक हेच अप्रियतेला तोंड देण्याचे शस्त्र आहे. आपल्या स्वाभिमानाला आणि आत्मसन्मानाला धक्का लावणारी आणि इजा पोहोचवणारी प्रत्येक गोष्ट जागच्या जागी खंडित केली पाहिजे, ठेचली पाहिजे. हे घडू शकते असे पुरुषाला कळले तर त्याची पावले वेगळ्या दिशेने पडतील. त्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. 'मला जमणार नाही' हे शब्द आपल्या शब्दकोशातून हद्दपार केले पाहिजेत.

कोर्टात येणाऱ्या अनेक स्त्रियांच्या चेहऱ्यावर मी ह्या तीन शब्दांचे गोंदण बघितले आहे. ते पुसून 'मी हे करणारच' ह्या तीन शब्दांचे गोंदण उमटवले पाहिजे.

स्त्रियांचा एक वर्ग, (विशेषतः खेडेगावे किंवा लहान शहरांमधला) असहाय्य आहे ह्याची जाणीव मला आहे. वैधव्य आले म्हणून सासऱ्याशी पाट लावून देण्याची प्रथा आपल्याकडे काही जमातीत आहे. हे कसे घडते? कारण अशा प्रथांना समाज नाके मुरडत नाही. पुरुष एका वेगळ्याच लैंगिक मानसिकतेचा बळी असतो. तारुण्याचा भोग घेण्याची इच्छा प्रबळ असते. पण घरातील एकही स्त्री किंवा जमातीतील स्त्री ह्या प्रथेविरुद्ध परिणामाकारक रित्या आवाज उठवत नाही, निषेध करत नाही. ह्याचे कारण एकच स्त्रीने आर्थिक स्थैर्य किंवा आर्थिक सुबत्ता ह्यासाठी ही स्वतःच मोजलेली किंमत आहे आणि शेवटी सगळ्या गोष्टी द्रव्य आणि धन याच बलदंड खलनायकांशी पोहोचतात.

खेडेगावामध्ये शिक्षणाचा अभाव, समर्थन आणि आधाराचा अभाव स्त्रीला स्वत्व आणि आत्मबल शोधायला वावच देत नाहीत. कुठे कुटुंबातीलच जुनाट आणि टाकाऊ कल्पनांच्या संस्कारांचा रेटा! सरपंच, मंत्री, आमदार, खासदार यांच्या वासनेचा रेटा! अशा स्त्रियांची संख्या लहान नाही. मात्र याही परिस्थितीमागील एकमेव मोठे कारण म्हणजे धन!

स्त्रीची लग्नाआधी कौमार्य चाचणी करण्याची प्रथा ज्या समाजात रुजली आहे त्याला काय म्हणावे? गेल्या वर्षी एका धाडसी मुलीने ही चाचणी करण्यास नकार दिला, पण तिने ह्या नकाराचे सगळे परिणाम भोगण्याची तयारीही दाखवली. मात्र इतक्या वर्षात अशी बंडखोरी करणारी ती एकटीच होती. मात्र 'मग आम्ही पुरुषाचीही चाचणी घेऊ', हे त्यावरील उत्तर नाही. 'मी चाचणी करू देणार नाही. माझ्या मनावर आणि शरीरावर माझा आणि फक्त माझा ताबा आहे. आणि तो मी सोडणार नाही आणि दुसऱ्याला तो मी ओरबाडू देणार नाही.' हा त्या स्त्रीने दाखवलेला खंबीर विचार हे त्याचे उत्तर आहे.

हे सगळे सूत्र लक्षात घेतले, तर ध्यानात येईल की स्त्री कुठेही असो आणि बाह्य परिस्थिती कशीही असो, ती शेतकऱ्यांची बायको असो, मजुराची असो, श्रीमंत घराण्यातील असो, मध्यमवर्गीय असो तिची मानसिकता सरतेशेवटी धनद्रव्याशी निगडित असते आणि त्या अर्थाने प्रत्येक स्त्री धनद्रव्याचाच बळी असते. सनातन काळापासून प्रत्येक राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेला घडवणारे हे सूत्र चिवट आहे. अमेरिकत उपजलेल्या 'मी टू'च्या प्रत्येक घटनेचा उपाय केवळ आणि केवळ डॉलर्समध्ये होता!

जे स्त्रीच्या वैयक्तिक किंवा वैवाहिक आयुष्यात घडू शकते, तेच तिच्या सामाजिक किंवा व्यावसायिक आयुष्यातही घडू शकते. पण सूत्र बदलत नाही आणि स्त्रीची मानसिकताही बदलत नाही. ती बदलायलाच हवी आणि त्यासाठी तिने लेखाच्या प्रारंभी मांडलेल्या दुसऱ्या गटातील प्रमेयांच्या अंगीकार करून, विचारात आणि कृतीत त्यांचा आविष्कार घडवायला हवा.

दुसऱ्या गटातील प्रमेयांचे आचरण सोपे नाही. ते अनेक वेळा निखाऱ्यांवर चालण्यासारखे असते. पण आपल्या आयुष्याचा निकष हा धनद्रव्य असावा की निखालस आणि तेजस्वी प्रतीचे जगणे असावा हे स्त्रीनेच ठरवायचे आहे. हे करीत असताना सगळे पुरुष अनीतीमान संवेदनाहीन आणि अप्पलपोटे आहेत असे सरसकट मानण्याची गरज नाही कारण ते खरेही नाही.

तरीही अपवाद सोडता पुरुष हा वर्चस्वांचा आणि मारक चढाओढीमध्ये वरचढपणाचा हव्यास बाळगणारा आहे आणि ह्या प्रवृत्तीला खतपाणी स्त्रियांनीच घातलेले आहे हेही विसरता कामा नये.

स्त्रियांनी पुरुषांशी आणि समाजाशी केलेला संघर्ष हा प्रत्येक वेळेस तलवारीच्या खणखणाटाने यशस्वी होत नाही, पण कधीही, कोणत्याही प्रसंगी तो स्वतःचे शिक्षण, शहाणपण, धैर्य आणि लढाऊ बाणा ह्याने यशस्वी होतो. त्यासाठी विसंवाद निर्माण करण्याची गरज नाही. पण पाय रोवून राहण्याची गरज आहे. त्यासाठी केवळ आक्रमक वाणीची गरज नाही, गरज आहे ती स्वतःचे कर्तृत्व खंबीरपणे सिद्ध करण्याची! गरज तक्रारखोरी आणि केवळ बंडखोरीची नाही. गरज आहे ती आपल्या प्रत्येक कृतीला झळाळून टाकणाऱ्या उपलब्धीची! शिक्षण, अभ्यास, संशोधन आणि आत्मविकासाच्या दृष्टीची! अन्यायकारक कृती केल्यास पुरुषाला आपल्या डोळ्याला डोळा भिडवताना भय आणि संकोच वाटेल अशा व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची कथित घटनेच्या दहा आणि पंधरा वर्षांनी पुरुषी अन्यायाचा आगडोंब उठवणारी स्त्री ही दुसऱ्या गटातील एकही प्रमेय आचरणात आणत नाही. आणि आत्मसन्मान आणि स्वत्व तळाशी नेऊन ठेवते.

स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा अस्सलपणा विजेसारखा लख्ख असायला हवा. एखादे विधान केले तर त्यावर शेकडो प्रश्नांचे भस्मासुर आक्रमक होता कामा नयेत.

सई परांजपेसारखी डोंगरा एवढ्या कर्तृत्वाची स्त्रीही त्याला अपवाद ठरली नाही ह्याचे विलक्षण दुःख मला आहे. एका केंद्रीय

मंत्र्यांने तिच्या सोबतीने रात्र घालवायची इच्छा व्यक्त केली हे किती वर्षांनी कोण जाणे पण आता सांगण्याची गरज होती? ह्याला 'मी टू' म्हणायचं का? त्या प्रसंगी 'मंत्री महोदयांनी ही गोष्ट कुणाशी बोलू नका', अशा आशयाची चिठ्ठीही हातात ठेवली म्हणे! मग त्या चिठ्ठीचा आदर त्या वेळी केला. तर त्याचा उच्चार आज करण्याची काय गरज होती? (हा प्रसंग त्यांनी 'मुंबई मिरर'ला सांगितलेला आहे.)

याउलट कंगना रानौतचे कौतुक करावसे वाटते. शंभर टक्के पुरुषप्रधान क्षेत्राला टक्कर देत आज तिने जे स्थान मिळवले आहे ते प्रशंसेस पात्र आहे. पुरुषप्रधानतेचा बाऊ तिने केला नाही. जे म्हणायचे हाते ते कृतीतून दाखवले.

जिथे दोघांना लाभदायक देवघेव असते (Quid pro quo) अशा नियोजनपूर्वक केलेल्या कृतींचे भांडवल स्त्रियांनी करता कामा नये. सध्याच्या संस्कृतीमध्ये अशा संबंधांचा स्वीकार हा दुसऱ्याच्या आयुष्याकडे निरिच्छेने पाहिल्यामुळे होतोच, पण एक भेसूर कृती असे तिचे कित्येक वर्षानंतर नामकरण करणे म्हणजे स्वतःचीच किंमत कमी करून घेण्यासारखे आहे.

तीच गोष्ट 'लग्नाचे वचन दिले म्हणून शरीरसंबंध ठेवले' असे म्हणणाऱ्या स्त्रियांची आहे. ह्या स्त्रियांची कीव करावी की त्यांचा धिक्कार करावा हे मला कळत नाही. शरीरसंबंध कुणाशी ठेवावे, ठेवावेत की नाही, कोणत्या प्रसंगी ठेवावेत हे ज्याचे त्याने ठरवावे. परंतु 'लग्नाचे वचन दिले म्हणून शरीरसंबंध केला' असे म्हणणे यासारखे ढोंग नाही. शरीरसंबंधाचे पावित्र्य जर विधिवत विवाहाशी जोडले जाते तर विवाह होईपर्यंत थांबण्याचे शहाणपण स्त्रीला का सुचत नाही? शारीरिक आकर्षण नैसर्गिक आहे आणि हा आयुष्याचा सर्वमान्य घटक आहे, पण शारीरिक आकर्षणाला शरण जाऊन शरीरसंबंध ठेवणे आणि त्याची सबब पुरुषाने दिलेल्या लग्नाच्या वचनाशी जोडणे ही स्त्रीला कमीपणा आणणारी बाब आहे. लग्नाच्या वचनात फसवणूक होणे हे नवे नाही, परंतु पुरुषाचा इरादाच न समजण्याइतकी स्त्री बाळबोध असते ह्यावर विश्वास कसा ठेवायचा? विशेषतः शरीरसंबंधाच्या मागणीला बिनविरोध मान्यता देण्याइतकी तिची सूज्ञता लोप पावत असेल, तर परिणाम भोगले पाहिजेत.

स्त्री हेच करत नाही. मी जेव्हा स्वत्व, स्वाभिमान आणि आत्मसन्मान अशा त्रिगुणांच्या आधारे स्त्रीने जगावे असे म्हणते तेव्हा त्या त्रिगुणांचे मूल्य आणि त्यांचे तेज यत्किंचितही कमी होऊ नये अशी तिची वर्तणूक असली पाहिजे. निवड केली तर ठामपणे स्वीकारावी आणि ताठ मानेने वाटचाल करावी.

आपले चरित्र आणि पुरुषाचे भाग्य हे एकाच पारड्यात तोलणे उचित नाही.

आपले चरित्र आपण घडवायचे. लहान-सहान कृतीतून ठरवायचे. स्त्रीने आपल्या चरित्रात पुरुषाला भाग्य शोधू देऊ नये कारण स्त्रीशिवाय ते त्याला सापडणार नाही. स्त्रीचा आदर करणे, तिच्या आयुष्याचा आणि अस्मितेचा आदर करणे हे त्याने शिकायलाच हवे.

लैंगिक संबंधातून जन्माला आलेल्या आणि रक्ताच्या आईबापांनी टाकून दिलेल्या मुलाचे अस्तित्व प्रातिनिधिक आहे कारण त्या असहाय्य मुलाचा जन्म परस्परसंमत लैंगिक संबंधातून, परस्परसंमत स्वीकारलेल्या शारीरिक आकर्षणातून आणि परस्परासंमत बेजबाबदारपणातून झालेला असतो. स्त्री अशा संबंधाला होकार का देते? तिला निसर्गाने दिलेल्या मातृत्वाच्या असाधारण प्रसादाला बेजबाबदारपणे अपमानित का करते? सध्याची एकूण स्त्रियांचीही प्रवृत्ती-झालं ते झालं, आता गर्भपाताचा व्यवहार्य मार्ग स्वीकारा आणि गप्प बसा, अशीच होताना दिसते.

पुरुष आणि पुरुषप्रधान संस्कृतीचा सामना करायचा असेल तर पुरुषाच्या बेजबाबदारपणाला आणि शेवटी द्रव्यानेच प्रश्न सोडवल्याच्या वृत्तीला विरोध केला पाहिजे. स्त्रीचा सहभाग त्यात असता कामा नये.

आज स्त्रियांसाठी न्यायाचे अनेक मार्ग मोकळे आहेत. अनेक कायदे शासनाने पारित केलेले आहेत. त्यांचा लाभ स्त्रीने घ्यावा. लैंगिक शोषणाविरोधांत वेश्याव्यवसाय करायला प्रवृत्त करण्याच्या किंवा त्यासाठी बळाचा वापर करण्याच्या विरोधात, हुंड्यांच्या विरोधात, घरी होणाऱ्या छाळाच्या आणि हिंसेच्या विरोधात, गर्भनिदानाच्या विरोधात, स्त्रीभ्रूणहत्येच्या विरोधात अनेक कायदे शासनाने केले आणि इतक्यातच तीन तलाक विरोधी कायदा आणण्याचा प्रयत्न केला.

काय झाले? यापैकी कोणत्या कायद्याचा आधार किती स्त्रियांनी घेतला? 'तीन तलाक' विरुद्ध कायदाच आम्हाला मान्य नाही असे मुस्लीम स्त्रिया म्हणू लागल्या. 'हुंडा देतो, पण मुलगी घ्या' असे म्हणणरे वडील शेवटी कोण? मुलीचा जन्म घरात नको असे म्हणणारे वडील कोण? बारमध्ये नृत्य करण्यास हरकत नाही असे म्हणणारे नवरे किंवा घरातील इतर कोण?

तर निर्णय घेण्याचा एकांगी आणि अनिर्बंध अधिकार असलेला पुरुष! धनद्रव्याच्या दोऱ्या खेचून स्त्रीची कठपुतली बनवणारा पुरुष! हे वर्षानुवर्षांचे जोखड आहे. ते फेकून द्यायचे धैर्य स्त्रीकडे असले पाहिजे.

मी तुम्हाला माहीत असलेल्या असामान्य विदुषींची उदाहरणे देणार नाही. पण माझ्याकडे घरकामाला मदत करणाऱ्या बाईंच्या मुलीचे उदाहरण देते. ह्या मुलीच्या बहिणीला वयाने बऱ्याच मोठ्या नवऱ्याने अज्ञान असतानाच, 'माझे तुझ्यावर प्रेम आहे' असे म्हणून पळवून नेले आणि तिच्याशी लग्न लावले. मुलगी केवळ पंधरा-सोळा वर्षांची होती. आईवडिलांना तिचा पत्ता लागेपर्यंत तिला गर्भ राहिला. मुलगा झाला. बाळंतपण आईवडिलांकडे नाईलाज म्हणून झाले. एक दिवस दारुच्या नशेत झालेल्या भांडणात नवऱ्याने तिचा गळा चिरून खून केला पण तिची बहीण खंबीरपणे उभी राहिली. तिचे वय ह्या सगळ्या प्रसंगी चौदा वर्षांचे होते, पण तिने घरी ठणकावून सांगितले. हा मुलगा बापाकडे जाणार नाही.

आज गेली तीन वर्षे मुलगा आजीआजोबांकडे आहे. त्यांचा जावई तुरुंगात आहे आणि आता मुलाकडच्यांनी मुलाच्या कस्टडीसाठी कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला आहे. त्याला उत्तर देण्याकरिता लागणारी कागदपत्रे माझ्या बाईंकडे नव्हती, पण त्या सतरा-अठरा वयाच्या मुलीने एकटीने माझ्या सल्यानुसार पाठपुरावा केला. अनेक खेटे पोलीस स्टेशनला घातले आणि एक दिवस घरी कागदपत्रे घेऊन आली. मी अचंब्याने तिला विचारले, ''कशी काय मिळवलीस? पैसे दिलेस?'' ती तिच्या आजच्या पिढीच्या भाषेत म्हणाली, ''नाही मॅडम मी पिडलं त्यांना. राडा केला. तेव्हा दिली.''

माझ्या डोळ्यांत पाणी आले. पण ती खरी स्त्री शोभली. आता ती खटल्याला तयार आहे. शिक्षण चालू आहे. कॉलेजचे शेवटचे वर्ष आहे, पण या दरम्यान तिने मंत्रालयात नोकरी मिळवली आहे. त्यासाठी आधी येत असलेल्या टंकलेखनावर हात फिरवावा म्हणून तीही क्लासेसना जाते.

वडिलांच्या घरातच तिने स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची घडण केली. घरकाम करणारी आई आणि छापखान्यात काम करणारे वडील अशी आर्थिक पार्श्वभूमी असून, तिने स्वतःचे पाय डळमळू दिले नाहीत. आत ती ज्या घरात जाईल. तिथे ती आपल्या अस्मितेला धक्का पोहोचू देणार नाही.

माझ्या दृष्टीने ही आदर्श स्त्री आहे. तिने लहान भाच्याचा सांभाळ करण्याची आर्थिक जबाबदारी स्वीकारली आहे आणि आता त्याच्या आयुष्याचे आणि स्वतःच्या आयुष्याचे निर्णय ती स्वतः घेईल.

मी स्त्रीच्या मानसिकतेचे एक सर्वसाधारण चित्र तुमच्यापुढे ठेवले आहे.

माझे नव्या पिढीच्या मुलींना अगदी खेडेगावातील सुद्धा हे साकडे आहे की? वडिलांच्या घरी असतानाच धनसूत्र, द्रव्यसूत्र लक्षात घ्या. घरातील घेतला जाणारा प्रत्येक निर्णय पारखून पाहा आणि तो अन्यायकारक असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवा. वडिलांच्या मनावर हे ठसवण्याचा प्रयत्न करा की तुमचे आयुष्य स्त्री म्हणून पुरुषाइतकेच महत्त्वाचे आहे आणि ज्ञान मिळवण्याची एकही संधी सोडू नका.

**- उषा पुरोहित**
भ्रमणध्वनी : ९८२००६५७६९

## स्वागत नवनवीन लेखनाचे!

'शब्द रुची' हा एक व्यापक विचारमंच आहे. विविध विषयांवरील मनमोकळी चर्चा हे 'शब्द रुची'चे वैशिष्ट्य. आपले सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विषयांवरचे लेखन खालील मेलवर पाठवावे.

veenasanekar2018@gmail.com

**॥ग्रंथाली॥*॥**

**श्रीलिपी फाँटमध्ये पुस्तके कंपोझसाठी देणे आहे.**
**संपर्क : सुदेश हिंगलासपूरकर ९८६९३९८९३४**

**ऑफिस कामासाठी व्यक्तीची गरज आहे.**
**(पार्सल / ऑफिसमधील कामे)**
**संपर्क : सुदेश हिंगलासपूरकर ९८६९३९८९३४**

## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१९



# मासिक पाळीचा टॅबू आणि बरंच काही...

श्रद्धा पेडणेकर

**कोडिंग कन्सोर्टियम युनिकोडने नुकतेच काही इमोजी जाहीर केले आहेत. यात ५९ नवीन सिम्बॉल आणि १७१ जेंडर संदर्भातील आयकॉन आहेत. इमोजी म्हणजे सध्याच्या काळातले हृदयाचे ठोके म्हणा किंवा मग तुम्ही जिवंत असल्याचं लक्षण. यातलं एक प्रतीक अत्यंत महत्त्वाचं आहे ते आहे महिलांच्या मासिक पाळीच्या संदर्भातील..**

**प्रसंग पहिला–** टीममधल्या दोघांनी अचानक सुट्या घेतल्या. क्लायन्टने डेडलाइन प्रीपोन केली आणि सुरू झालेली मासिक पाळी. रीनाची चीडचीड वाढत गेली आणि क्लायन्ट कॉलमध्ये तिचा तोल सुटलाच. नेहमी सगळ्यांना सांभाळून घेणारी ती नि नेमकं आजच काय झालं? सर्वांच्याच चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह.

**प्रसंग दुसरा–** टीव्हीवर सॅनिटरी पॅडची जाहिरात सुरू होती आणि सहा वर्षांच्या अनघाने, ''आई हे काय ग, आपण आणूया का?'' असा प्रश्न सर्वांसमोर विचारला. आईने रोखून तिच्याकडे बघितलं आणि खेचत बेडरूममध्ये घेऊन गेली. ''भलतंसलतं विचारत जाऊ नकोस'' असा दमही भरला. एवढं काय झालं काय होतं ते? अनघासमोर मोठं प्रश्नचिन्ह.

**प्रसंग तिसरा–** बाबांच्या गोळ्या आणायला प्रथमेश केमिस्टकडे गेला. केमिस्टला गोळ्या काही सापडेनात. तेवढ्यात पाचव्या मजल्यावरची अनी आली. तिने केमिस्टला हळू आवाजात काही तरी सांगितलं आणि त्यानेही वर्तमानपत्रात बांधून तिच्याकडे दिलं आणि त्याला मात्र गोळ्या-औषधं हातात दिली. ''अनीला कसं छान बांधून दिलंत तसं मलाही द्या.'' या त्याच्या मागणीवर केमिस्ट एकमेकांकडे बघून हसायला लागले. प्रथमेशच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह!

अरे बापरे खूपच प्रश्नचिन्ह झाली नाही, तेही लेखाच्या सुरुवातीलाच. प्रकाश संतांच्या लंपनसारख्या चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आलंच असेल की नेमकं हे प्रश्नचिन्ह कशाबद्दल आहे. त्याला निमित्त म्हणजे कोडिंग कन्सोर्शियम युनिकोडने नुकतीच काही इमोजी जाहीर केली आहेत. ५९ नवीन सिम्बॉल आणि १७१ जेंडर संदर्भातील आयकॉन आहेत. इमोजी म्हणजे सध्याच्या काळातले हृदयाचे ठोके म्हणा किंवा मग तुम्ही जिवंत असल्याचं लक्षण. सध्या तोंड नाही पण इमोजी चालवता आले पाहिजेत. सो कमिंग टू द पॉईन्ट, त्या सिम्बॉलमधलं एक सिम्बॉल अत्यंत महत्त्वाचं आहे, ते म्हणजे महिलावर्गासाठी. मासिक पाळीकडे आजही टॅबू म्हणून



पाहिलं जातंय. आपण सगळेच पुढारलेले असलो तरीही चारचौघांत सिगारेट पिणाऱ्या किंवा मद्य सेवन करणाऱ्या तथाकथित पुढारलेल्या स्त्रियाही 'अरे आज पाळी आली ना म्हणून थोडीशी थकलेय', असं सर्रास म्हणताना मात्र दिसत नाही. आता हे वाचतानाच काय 'एकेकाचं कौतुक तरी?' असे भाव चेहऱ्यावर आणणारेही आहेत. अक्षयकुमारचा पॅडमॅनचा विषय निघाल्यावर ट्रेनमधल्या ग्रुपमध्येही ''शी! ते काय बघायला जायचं, मुलाबाळांसोबत पाहायचा सिनेमा आहे का?'' अशा चर्चाही झडताना दिसल्या. असो. मुळात मुद्दा ना कौतुकाचा आहे ना त्यासाठी मागितल्या जाणाऱ्या सुविधेचा. मुद्दा आहे तो, मासिक पाळी हा शरीर धर्म आहे हे समजून घेण्याचा!

हा इमोजी म्हणजे एक रक्ताचा थेंब असेल. तो मासिक पाळीच्या संदर्भातील सूचक असेल. महिलांच्या दृष्टीने हा विचार केला गेला हे कौतुकास्पद आहेच. हा टॅबू दूर करण्यासाठीचा त्यांनी उचलेलं हे छोटं पाऊल म्हणता येईल. अनेकदा मासिक पाळी हा शब्द उच्चारण्याची किंवा टाईप करण्याचीही अनेकींना किळस वाटते म्हणा किंवा लाज वाटते म्हणा. हा इमोजी दाखल झाला असला तरीही किती जणी तो प्रत्यक्षात वापरतील याची

शक्यता फारच कमी. मुली-मुलींच्या, बायका-बायकांच्या ग्रुपमध्ये हा सर्रास वापरला जाईल, चेष्टेचा विषयही होईल. मात्र ग्रुपमध्ये म्हणा किंवा सोशल नेटवर्किंग साईटच्या पोस्टमध्ये म्हणा त्याचा बाकीच्या इमोजी एवढाच सरसकट वापर केला जाईल का, हे प्रश्नचिन्हच आहे. कुणी एकीने पुढाकार घ्यायचा प्रयत्न केला तरीही एवढं काय ते कौतुक म्हणून आपल्याच काही जणी नाकं मुरडतील. इमोजी आणण्याचा प्रमुख उद्देशच हा टॅबू घालवणं, त्याचं कौतुक करणं हा नव्हे. पाळी येणं, त्यामुळे पोटात दुखणं, चिडचिड होणं हे सगळं नैसर्गिक आहे. तुला तुझ्या स्त्रीपणाची जाणीव झाली, नवनिर्मितीची शक्ती यामुळे तुझ्यात आली, त्या शक्तीचा वापर कसा करायचा याची मोठी जबाबदारी तुझ्यावर आहे याचं भान सकारात्मकपणे मुलींना देण्याऐवजी पाळी आली की पॅड वापरणं, धार्मिक कामांत सहभाग न घेता येणं, शारीरिक बदल यामुळे खरं तर ती आल्यापासूनच मुलींच्या मनावर ती वाईट आहे हे बिंबवलं जातं. पाळी आली आहे असं सांगणं, त्यामुळे शरीरात होणाऱ्या बदलांबद्दल चारचौघात बोलणं हे त्या मासिक पाळीसारखंच आणि तितकंच नैसर्गिक आहे हेही बिंबवणं आवश्यक आहे. गेल्या वर्षी एका कंपनीने स्त्री कर्मचाऱ्यांच्या त्या दिवसातील एक दिवशी भर पगारी रजा देणारी घोषणा केली होती मात्र त्यानंतर यांना सगळ्यातच सूट हवी अशी पुरुषांची तर 'काय त्याचं कौतुक? आम्ही काम करतोयंच ना' असे स्त्री वर्गातूनही सूर उमटत होते.

तिच्याबद्दल चारचौघात बोलायचं नाही असे संस्कारही लहानपणापासून आपल्यावर केले जातात. आज पुढारलेल्या स्त्रीची व्याख्या म्हणजे केवळ शिक्षणाने पुढारलेली एवढंच नव्हे तर ते शिक्षण प्रत्यक्षात आणणारी, अशी करणं ही समाजाची गरज आहे. त्या दिवसांबद्दल मुलींची-महिलांची आपापसात होणारी कुजबुज थांबली पाहिजे. पुरुष सहकाऱ्यांबरोबर इतर दिवसांप्रमाणेच त्या दिवसांबद्दलही खुलेपणाने बोलता आलं पाहिजे. घराघरातून स्त्री-पुरुषांनी यावर इतर गोष्टींप्रमाणेच मोकळेपणाने बोललं पाहिजे. सॅनिटरी पॅड ही लपवून नेण्याची गोष्ट नाही इतर औषध गोळ्यांप्रमाणेच तीही जीवनावश्यक वस्तू आहे, याची जाणीव सर्वांना व्हायला हवी. यामुळे खरं तर अनेकांच्या चेहऱ्यावरची प्रश्नचिन्ह पुसून टाकायला मदत होईल. हे लिहितानाच ही जी चर्चा चालली आहे ती सो कॉल्ड मिडल आणि हायर क्लासबद्दल. आज महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात अनेक ताई, माई सॅनिटरी पॅडसारख्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि जीवनावश्यक अशा वस्तूंपासून वंचित आहेत. अनेकींना त्यामुळे अनेक गंभीर शारीरिक आजारांचा सामना करावा लागतोय आज बुलेट ट्रेनचं स्वप्न पाहणाऱ्या या मुलींकडे ना स्वतःची काळजी घेण्यासाठी व्यवस्था आहे ना ती नाही म्हणून आंदोलन करण्याची हिंमत, या उगवत्या महिलादिनानिमित्ताने धैर्य दाखवण्याची शक्ती स्त्रियांना मिळो.

**– श्रद्धा पेडणेकर**
भ्रमणध्वनी : ९९३०११२००४
shraddha.vasant@gmail.com



amazon*

flipkart.com*

**ॲमेझॉन व फ्लिपकार्टवर आपल्या पुस्तकांच्या विक्रीसाठी**

ॲमेझॉन व फ्लिपकार्ट चे नोंदणीकृत विश्वासार्ह वितरक :

संपर्क

संगणक प्रकाशन

**मोबाईल / व्हॉटसअप**
विश्वनाथ खांदारे / ९९८७६४२७९३
संजय बांदेकर / ९५९४३६९६८९
ईमेल : info@sanganak.in

* वरील ॲमेझॉन व फ्लिपकार्टचे ट्रेडमार्क हे त्या त्या कंपनीचे नोंदणीकृत ट्रेडमार्क आहेत.

**'ग्रंथाली'ची निवडक पुस्तके ॲमेझॉन व फ्लिपकार्टवर विक्रीस उपलब्ध**



# सायकल, एक गंमत? की मुक्तिदायी संचाराचे साधन?

छाया दातार

**आज मला आश्चर्य वाटतंय की त्या छोट्याशा खेड्यात, १९५६ साली मी स्कर्ट घालून शाळेला कशी जाऊ शकत होते आणि माझ्या सायकल चालविण्यावर कोणी कसा प्रश्न उभा केला नव्हता?**

**मी** म्हटलं तर कोणाला खरं वाटणार नाही की मला सायकल येत नसती तर माझे लग्न जमले नसते. म्हणजे अशी कल्पना करू नका की मला पाहायला स्थळ आले होते आणि त्याने मला पहिला प्रश्न विचारला की सायकल चालविता येते की नाही आणि मला त्याने होकार दिला. पण कशी वाटते ही कल्पना की स्वयंपाक येतो की नाही, किंवा गाणे येते की नाही असा काही प्रश्न अभिप्रेत असताना एकदम सायकलाचा प्रश्न विचारणे हे मला फार भारी वाटते. आजकाल कोणी असा प्रश्न विचारणार नाहीत ह्याची मला कल्पना आहे. फार फार तर ड्रायव्हिंग येते का किंवा किमानपक्षी स्कूटर चालविता येते का कारण आमचे घर गावाच्या बाहेर आहे आणि जर नोकरी करयची असेल तर तुझी वाहनाची सोय तू केली पाहिजेस असा काहीतरी तो प्रश्न असेल. अर्थात मी सांगतीय ही गोष्ट १९६३ मधील. म्हणजे तेव्हा माझे लग्न झाले. त्याआधी दोन वर्षे आमची ओळख होती. म्हणजे वधू परीक्षेला येऊन सायकलचा प्रश्न विचारला नाही, पण माझी खात्री आहे की आमची ओळख टिकली ती केवळ सायकलमुळेच टिकली. मी सायकल चालवीत नसते तर ही ओळख वाढलीच नसती आणि मग पुढचा प्रश्न, 'तू माझ्याशी लग्न करशील का?' हा आलाच नसता. थोडक्यात सायकल या वाहनाला माझ्या जीवनात किती भारी स्थान आहे हे मला वारंवार येणाऱ्या प्रसंगांमुळे जाणवू लागले आहे. तर हे सायकल आणि लग्न प्रकरण काय आहे हे पहायला थोडे मागे जावे लागेल.

मी सायकल चालवायला शिकले आठवीत असताना. एका खेड्यात. १९५६ साली. जेथे वीजही नव्हती. आई-वडिलांना मुंबईचा कंटाळा येऊन त्यांनी तब्येतीच्या कारणासाठी खेड्यात जाऊन रहायचे ठरविले. तेथे नुकतेच हायस्कूल सुरू करण्यात आले होते. फक्त आठवी व नववी. पुढे दहावी व अकरावी सुरू होणार होती. आई बाबा दोघेही शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. वीज तर नव्हतीच आणि संडासही नव्हता. पण आम्ही दोघी बहिणींनी त्या खेडवळ जीवनाशी बऱ्यापैकी जुळवून घेतले आणि शिक्षण पुढे सुरू झाले. मी स्कर्ट घालत असे आणि माझ्याबरोबर वर्गात असणाऱ्या दोन मैत्रिणी साडी नेसून शाळेत येत. त्यांना माझ्या स्कर्टचे भारी कौतुक वाटत असे. त्यातच एक दिवस माझ्या वडिलांनी मला सायकल शिकविण्याचा प्रस्ताव समोर ठेवला आणि मी खूश झाले. माझ्या लक्षात आले की मी जर मुंबईत असते तर मला सायकल शिकता आली नसती. आमची चाळीची इमारत अगदी रस्त्यावर होती, आणि शिकवायला जवळपास मैदानही नव्हते. शिवाय त्या गर्दीत मला चालवायला परवानगी मिळाली नसती. शाळेच्या जवळच्या पटांगणामध्ये रविवारी माझा सराव सुरू झाला आणि मला सायकलच्या वेगाची मजा अनुभवायला यायला लागली. मला वाटते मी फार लवकरच सायकल शिकले अर्थात पडझड करतच. माझी बहीण मात्र शिकली नाही. अर्थात ती पाचवीतच होती आणि अजूनही घरासमोरच्या रस्त्यावर लगोरी आणि लंगडी खेळण्यात तिचा वेळ छान जाई. मला मात्र नुकतीच पाळी सुरू झाली होती आणि अंगात धमक आली होती. खूप खूप नवं नवं शिकायचं, जग पहायचं, क्षितिजाच्या पलीकडे जायचं असे काहीतरी वेध लागल्यासारखे झाले होते. मन असे फुलून आले होते. अंगावर काटा चढायला लागला होता. त्यातच ही सायकलची देण मिळाली. वेगाचे भान आले. रविवारी बाबांची परवानगी घेऊन मी सायकल बाहेर काढत असे आणि उतारावर भन्नाट वेगाने चालविताना जणू पंख फुटल्याची भावना तयार होत असे. जवळच एक टेकडी होती. तेथे जाऊन बराच वेळ बसणे हा तर माझा आवडीचा छंद झाला होता. नंतर माझ्या लक्षात आले की माझ्या पुढील वर्गातील एक मुलगा तेथे रहात असे. ती पोलिसलाईन होती. त्याचे वडील पोलीस होते. नंतर मला तो चाळाच लागला. त्यांच्या घरातील हालचालींचा वेध घ्यायचा. त्याची सावत्र आई बहुधा पायाने अधू असावी. ती दोरीवरचे कपडे काढायला बाहेर यायची. माझा मित्र कोठेतरी बाहेरून यायचा आणि तेथे अंगणात पुस्तक वाचत बसायचा. बाबांकडे तो पुष्कळदा गणित समजून

घ्यायला यायचा. तो आला की माझे मन उत्फुल्ल होत असे. दिसायला जरा स्मार्ट आणि हसतमुख छबी माझ्यावर इम्प्रेशन मारून गेली होती. माझ्या सायकलचा हा एक फायदा मला दिसत होता. रविवारी लांब टेकडीवर जाऊन त्याच्या हालचालींकडे मी डोळे लावून पहात बसू शकत होते.

आज मला आश्चर्य वाटतंय की त्या छोट्याशा खेड्यात, १९५६ साली मी स्कर्ट घालून शाळेला कशी जाऊ शकत होते आणि माझ्या सायकल चालविण्यावर कोणी कसा प्रश्न उभा केला नव्हता. आम्ही शहरातून आलो होतो आणि कदाचित कृतज्ञतेची भावना मनात होती,




त्यामुळे आमचे कुटुंब वेगळे समजले जाई. शिवाय आई शाळेत पदवीधर शिक्षिका होती. म्हणून या पुढारलेपणाचा आम्हाला जाच झाला नाही. कदाचित थोडे कौतुकच झाले असावे असे वाटते. पण एक मात्र झाले, मला त्या वेगाची सवय लागली. कानात वारे भरलेल्या वासरासारखी मी भन्नाट पळायला शिकले. आणि आजही वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी मी मुंबईला गर्दीच्या रस्त्यातून स्कूटर चालवू शकते.

पुढे आम्ही जळगावला आलो. आणि माझी सायकल सुटली. घरी आजी आणि एक पंगू आत्या होती. आईवडिल इंग्लिश आणि गणिताचे क्लासेस चालवू लागले. शाळा घराच्या जवळ त्यामुळे सायकल घेण्याचा प्रश्नच आला नाही. शिवाय माझ्या आजीला ते आवडले नसतेच. मात्र मला मॅट्रिकला चांगले मार्क्स मिळाले आणि बाबांनी पुण्याला वसतिगृहात पाठविण्याचे कबूल केले. सायकल अर्थात नाही. पुण्याला फर्ग्युसन कॉलेजला शिकायला आल्यावर तर मला सायकलची आठवण फारच तीव्रतेने यायला लागली. सुंदर रस्ते आणि पुणे पहाण्याची ओढ. मात्र खंडाळा बावड्याची सायकल माझ्याकडे नव्हती. आम्ही तेथून जळगावला येताना बाबांनी ती ज्याची त्याला देऊन टाकली होती आणि अचानक संधी चालत आली. यदुनाथ थत्ते, साधना साप्ताहिकाचे संपादक, माझ्या आतेबहिणीचा नवरा यांनी मला विचारले, ''आर्ट्सला आहेस. फार अभ्यास नसतो. साधनात येत जा. वृत्तपत्रकारितेचे शिक्षण आणि अनुभव मिळेल.'' ''पण त्यासाठी लागणारी संचारव्यवस्था कशी करायची?'' माझा प्रश्न. त्यांनी लगेच त्यांच्याकडे असलेली जुनी सायकल देऊ केली आणि मी पुन्हा सायकलस्थ झाले. माझ्या आयुष्यातील सर्वात चांगला काळ कोणता? असे कोणी विचारले तर मी याच काळावर टिक मारीन. खंडाळा-बावड्याचा निसर्ग येथे नव्हता पण एक गजबजलेले शहर, अर्थात आताच्या सारखे मोटरसायकल्स आणि स्कूटर्सनी भरलेले नाही, तर खूपशा सयकलस्वारांनी भरलेले असे ते शहर. आणि तेथे मी जरी जळगावसारख्या गावंढळ गावातून आलेली होते तरी, तशी मी पण काही कमी नाही अशा तऱ्हेने सहज विहार करणारी मुलगी.

वृत्तपत्रकारितेच्या निमित्ताने ठिकाणे शोधून काढणे आणि माहिती मिळविणे अशी बरीच कामे माझ्या हातून झाली. माझा पहिला लेख हा 'टाकलेल्या बायांना' मदत करणाऱ्या संस्थेबद्दलचा होता असे अजून आठवतं. त्यावेळी अजून वृत्तपत्रकारितेचे कोर्सेस सुरू झाले नव्हते असे मला आठवतंय. निदान मराठीत तरी आणि पुण्यात.

आणि मग फर्ग्युसन कॉलेजमधील साहित्य सहकारचे सदस्यत्व आणि तेथे होणाऱ्या चर्चा. तेथे मी चांगलीच रुजले. खूप मित्र मिळाले. मैत्रिणी का नाहीत? आज मला प्रश्न पडतोय. पण तेव्हा नाही पडला. मी मराठी विषयही घेतला नव्हता. पण तेथे चांगल्या चर्चा होतात कळले म्हणून मी जॉइन झाले. आणि मग मला खऱ्या अर्थाने पुणे पहाण्याची संधी मिळाली. दर रविवारी कुठे तरी लांब, कॅम्पमध्ये, एम्प्रेस्स गार्डन, इकडे पद्मावती, बिबवेवाडी अशी खूप लांब-लांबची ठिकाणे आणि गप्पांचा अड्डा होऊ लागला. गप्पा साहित्यिकच असत असेही नाही. पण मी एकटी मुलगी आणि चार मुलगे अशी आमची सायकलयात्रा निघत असे. पैसे कोणाकडेही नसत, त्यामुळे चहा पिणे क्वचित घडे. वसतिगृहातील माझ्या खोलीतील आणि शेजारी खोलीतील मुली रविवारी दुपारी शेजारच्या बेकरीतून केक किंवा सँडविचेस आणून खात. मलाही विचारत, पण मला संकोच होई. त्यामुळे मला ही रविवारची सायकल ट्रिप आवडू लागली. हळू-हळू माझ्या लक्षात येत गेले की त्यापैकी दोघांचा माझ्यावर जरा जास्त जीव होता. मला त्याची संवेदना होत असे, पण ते कॉलेजचे पहिलेच वर्ष होते त्यामुळे ते शब्दात कळण्याची काही आवश्यकता वाटत नव्हती. छान कोझी, ऊबदार भावनेने लपेटल्यासारखे वाटत असे. मला आठवतंय एकदा पावसात मला सायकल हातात पकडून यायला लागले. रात्रीची वेळ. दिवा नव्हता. त्यावेळी काढून ठेवता येईल असा सायकलचा टॉर्च मिळत असे. माझा मित्र मला पोचवायला. त्याच्याही हातात सायकल. घरी आल्यावर मैत्रिणींनी चिडविले, 'जिन्दगीभर नही भुलेंगे वो बरसातकी रात!' ताडताड पडणारा पाऊस पाठीवर आणि डोक्यावर, तोंडावर. आणि त्याचा ओलाचिंब हात माझ्या हॅन्डलवर, माझ्या हातावर ठेवलेला, ऊबदार. आव्हान होते नऊच्या आत वसतिगृहावर पोचलेच पाहिजे. या आव्हानापायी आम्ही नेहेमीच वेळेच्या आधी येऊन मग अर्धातास झाडाखाली गप्पा मारत उभे राहत असू. शेवटच्या क्षणी आत जायचे.

जेमतेम पाच महिन्यांची ओळख आणि एक दिवस मला मुंबईला लग्नासाठी जायचे होते म्हणून तिकीट काढायला सकाळी सात वाजता माझ्याबरोबर कोणी येतेय का अशी विचारणा केल्यावर अर्थात कोणीही यायला तयार होतेच, पण एकाने जरा जास्तच आग्रह धरला. 'मी जवळ राहातो तेव्हा मला जास्त सोयीचे आहे.' मला थोडी कंपनी हवी होती. क्यूमध्ये उभे राहायला आणि गप्पा मारायला. सकाळी उठून सायकल काढून मी गेटच्या बाहेर गेले

तर दुसराच उभा. त्याने स्पष्टीकरण दिले की, आपले ठरल्यावर घरी जाताना मीच त्याला विनंती केली की मला जरा माझ्या स्कॉलरशिपबद्दल तुझ्याशी बोलायचे आहे आणि मी ही संधी मागून घेतली. माझी काहीच हरकत नव्हती. आम्ही दोघे स्टेशनवर योग्य वेळेला पोचलो आणि तिकीट काढायचे महद्कार्य पार पडले आणि निघताना त्याने मला विनंती केली, 'आपण जरा बंडगार्डनच्या बागेत जाऊ या का, मला तुझ्याशी काही बोलायचे आहे. क्लास नाहीय आहे नं?' आणि मी अलगद 'हो' म्हटलं असावं. सायकल स्टॅन्डवर ठेवून आम्ही आतमध्ये चलायला लागलो. त्याने मला आनंदाची बातमी सांगितली. त्याने बी.ए. नंतर एम.ए. करण्यासाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्ससाठी अर्ज केला होता आणि प्रवेश मिळाला होता. पण स्कॉलरशिप नव्हती. वडिलांनी परवानगी दिली नव्हती. पण अमेरिकेतील स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटी मध्ये एक्स्चेन्ज प्रोग्रॅम मध्ये एक वर्षासाठी प्रवेश मिळाला होता. त्याला खात्री होती की थोडे महिने आणखी थांबून तो एम.ए. पूर्ण करू शकेल. इकडे तिकडे छोटे मोठे काम करून पैसे मिळविता येतील. वडील जायचे-यायचे पैसे भरायला तयार होते. याचा अर्थ किमान दीड वर्ष तो अमेरिकेत राहील आणि परत येईल. मी यावर काय बोलणार? शुभेच्छा देण्यापलिकडे माझ्या हातात काहीच नव्हते. आणि एका अर्थाने मला ही स्कॉलरशिप किती महत्त्वाची असते वगैरे काहीच माहीत नव्हते. तो दूर जाणार आणि आमचा ग्रुप फुटणार याबद्दल वाईट वाटणार होते एवढंच. तो म्हणाला, 'त्याने अजून सर्वांना सांगितले नव्हते.' मला आधी सांगण्याची त्याची इच्छा होती. आणि चालता चालता तो एकदम थांबला आणि त्याने माझे हात हातात घेतले आणि मला विचारले, ''तू माझ्याशी लग्न करशील?'' माझ्या मनात त्याच्या संबंधी अंकुर फुटू लागले होते. विशेषत: त्याच्याकडे अतिशय सुंदर परदेशी सायकल होती. तेव्हा तो कॉलेजला आला की नाही हे बघण्यासाठी मी सायकल स्टॅन्डच्या बाजूने चक्कर मारत असे. त्याचे खादीचे कपडेही त्याला सर्व विद्यार्थ्यांमध्ये उठून दिसण्यासाठी मदत  करत असत. पण सोळाव्या वर्षी अशी लग्नाची मागणी कोणी घालेल हे माझ्या स्वप्नातही आले नव्हते. त्याचे वय असेल विशीचे. अजून नोकरी नाही. शिक्षण पूर्ण व्हायचे आहे आणि तरी लग्नाची मागणी. मला सुचत नव्हते. आणि माझ्या मूकतेचा अर्थ त्याने हो समजून चक्क म ाझ्या हाताचा मुका घेतला. आता विचार करताना वाटतेय की किती निरागस काळ होता तो. किती संयमित! त्याने पुढे सांगितले की तो घाईने का विचारतो आहे कारण जाण्यापूर्वी त्याला माझ्याकडून वचन हवे होते की मी तो परत येईतोवर त्याची वाट पाहीन. लग्न अर्थात एवढ्यात करायचेच नव्हते. पण त्याला भिती होती की माझ्यासारखी निरागस, कोवळी मुलगी दुसऱ्या कोणी विचारले तर त्याला सरळ हो म्हणून बसेल. म्हणून तो म्हणाला, ''मी प्रेम नाही म्हणत आहे. मी बांधिलकी मागतो आहे. तुझ्या एका शब्दाने मला परत येण्यासाठी बळ मिळेल, ओढ लागेल, नाहीतर एखाद्या दोरी तुटलेल्या पतंगासरखा मी भरकटत राहीन.'' माझ्या एकदाही मनात आले नाही की कथा-कादंबऱ्यातून परदेशी जाणाऱ्या प्रियकराबाबत प्रियेला नेहमी भीती वाटत रहाते की तो तिला विसरून जाईल. नव्या जगात त्याला नवी कोणीतरी मिळेल. ती आकांताने त्याच्याकडून वचन मागत रहाते, परत येण्याचे, तिला न विसरण्याचे. मला त्याची विनवणी इतकी भावली. मी इतकी प्रगल्भही नव्हते म्हणायला की, कशाला बांधून घेतो आहेस, नवे जग बघून घे, समजून घे, परत येण्याची घाई करू नकोस. मीही त्याच्यावर अधिकच भाळले. एका क्षणात जीवनभराची बांधिलकी स्वीकारली. आताच्या भाषेत ते काफ लव्ह होते आणि तरीही खूप आर्त आणि सच्चे होते असे आता म्हणावंसं वाटतंय. शेवरीच्या कापसासारखे हलके हलके वाऱ्यावर उडत चालल्याची भावना तयार झाली होती. आयुष्यात खूप खूप लवकर मी प्रेमात पडले होते आणि वचनबद्ध झाले होते. सायकलवर स्वार होऊन मी दुपारच्या जेवणासाठी वसतिगृहावर पोचले आणि माझ्या प्रिय मैत्रिणीला हा सगळा प्रसंग सांगितला. ती थोडी माझ्याहून प्रगल्भ होती. मुलगा दिसायला छान आहे म्हणाली आणि इकॉनॉमिक्स घेऊन बी.ए. करते आहे आणि पुढे एम.ए. म्हणजे नोकरीची शक्यता नक्की. पण हे परदेशी प्रकरण काय आहे आणि भविष्यात काय होईल याबद्दल साशंकता होतीच तिच्या मनात. तरीही तिने आमच्या जवळपासच्या दोन खोल्यात ती बातमी सांगितलीच. आणि मग गल्ला सुरू झाला अभिनंदनाचा! पण त्याच बरोबर हे काय? तुमचा प्रेमविवाह पण दोघेही ब्राह्मण म्हणजे काहीच मजा नाही. तुमचे आईवडिल परवानगी देतीलच. नाट्यपूर्ण काहीच घडणार नाही. असे उद्गार ऐकू येऊ लागले.

मी माझ्या आईवडिलांना लगेच पत्र लिहून कळविले आणि त्यांचे उत्तरही आले. ''झाले ते ठीक आहे. पण आता हे शीतपेटीत राहू दे. परीक्षा झाली की बघूया काय करायचे ते.'' त्याने त्याच्या आईवडिलांना सांगितलेच नाही. त्याच्या मते हा गुप्ततेचा काळ होता. आमच्या मित्रांना मात्र कळले आणि म्हटल्याप्रमाणे आमच्यात फाटाफूट झाली. इतकी की त्याच्या एका मित्राने त्याच्या घरी जाऊन त्याच्या बहिणीला आणि आईला सांगितले. लगेच मला बोलाविणे आले. त्याचे वडिल डॉक्टर होते. आता निवृत्त. त्यांनीच बोलण्याचा मक्ता उचलला. ''तुम्ही दोघेही खूपच तरुण आहात. आताच काही निर्णय घ्यायची गरज नाही. या वयात पाय घसरायची शक्यता असते. शिवाय तो परदेशी चालला आहे. काय सांगता येतेय काय होईल ते. उगाच वचने वगैरे देत बसू नका. जाऊन परत आला तर मग बघू. नोकरी वगैरे लागू दे. चार सहा स्थळे बघू देत. तोपर्यंत प्रेम वगैरे कायम राहिले तर बघू. मग मी तुझ्या आईवडिलांना बोलावून घेईन आणि मग प्रत्यक्ष लग्नाचा विचार होईल. सध्या मात्र एकमेकांना भेटायचे पण नाही. मी मित्रांना विचारेन.'' माझे सगळे अवसान गळूनच गेले. त्यांच्या आवाजात एवढी जरब होती नं की मी उलट प्रश्न विचारणे. किंवा समर्थन करणे शक्यच नव्हते. तोही चूपचाप बसलेला. मी जायला निघाले तर दारापर्यंत पोचवायला आला नाही. अविरत अश्रूंनी नहालेल्या अवस्थेत मी खोलीवर आले आणि मैत्रिणीच्या खांद्यावर मनसोक्त रडले.

दोनच दिवसांनी मला एक चिठ्ठी मिळाली आणि त्यावर 'अमुक एका ठिकाणी भेटायला ये', असा निरोप. पुरुष मित्रांनी मदत नाकारली, पण एका स्त्री मैत्रिणींनी मदतीचे आश्वासन दिले आणि अभ्यासाच्या दिवसात सुद्धा आमच्या चोरभेटी कायम राहिल्या सायकलच्या जोरावर. मुख्य म्हणजे, तुमच्या प्रेमामध्ये काही नाट्यमयता नाही म्हणणाऱ्या माझ्या मैत्रिणींना मला टुकटुक करत आले. अर्थात आता गुप्तता पाळणे महत्त्वाचे होते. परीक्षा झाल्यावर व्हिसा, तिकेट वगैरेच्या कामासाठी मुंबईला आल्यावर पुन्हा भेट आणि आणाभाका. माझी मात्र वसतिगृहातून हकालपट्टी आईवडिलांकडून. मुख्य म्हणजे मी जळगावला परतण्याचा आग्रह. मला नवी सायकल मिळाली कारण कॉलेज लांब होते. इतर मुले मुली बसने जात. आणि त्याहून मोठी भेट म्हणजे पत्र लिहिण्यास परवानगी. अमेरिकेला बोटीने जातानासुद्धा निरोप देण्यासाठी मला बंदरावर येण्याची परवानगी मिळाली नाही. दीड वर्षे आम्ही किती पत्रे लिहिली असतील याचा हिशोब ठेवलेला नाही. मात्र परत येताना पश्चिमेकडून यायचे असल्याने हाँगकाँग आणि कलकत्ता असे विमान येणार होते आणि मला पत्र आले होते, 'कलकत्त्याला घ्यायला ये. मित्राकडे राहायची सोय होईल. आईवडिलसुद्धा तेथेच येणार आहेत. तेथून विनोबा भावे भूदानाच्या निमित्ताने बंगालमध्ये यात्रा करत आहेत. तेथे जाऊन त्यांचा आशीर्वाद घ्यायची कल्पना आहे.' ज्या सासऱ्यांनी दोन वर्षांपूर्वी मला नकार दिला त्यांनीच हे सर्व घडवून आणले होते. आठ दिवस आम्ही भूदान यात्रेमध्ये पहाटे चार वाजता उठून कंदिलाच्या प्रकाशात प्रवास करत होतो आणि पडावाच्या ठिकाणी मिळेल ते खात होतो. चांगलीच थंडी होती. पहाटेच्या काळोखात हातात हात घालून चालायला खूप मजा येत असे. फारसे ओळखीचे लोक नाहीत, त्यामुळे एकप्रकारचे खाजगीपण मिळत असे. पण त्या दिवसांइतका रोमँटिक काळ पुढे आयुष्यात कधी उपभोगला नाही एवढं खरं. मग पाच-सहा महिन्यांनी लग्न झाले. माझे बी.ए. पूर्ण व्हायचे होते. १८ वर्षे पूर्ण होते. तर अशी ही लग्नाची गोष्ट. पुढेही वर्षभर सायकल चालवायला मिळाली, नवऱ्याबरोबर. माझी जळगावची सायकल मी घेऊन आले होते. वर्षानंतर त्याला खाजगी क्षेत्रात नोकरी लागली आणि हातात गाडी आली. मात्र आज मागे वळून बघताना लक्षात येतेय की विनोबांना भेटण्यासाठी केलेली ट्रिप फुकट गेली नाही. मीही आयुष्यात कार्यकर्ता म्हणून आणि संशोधनाच्या निमित्ताने ग्रामीण भागात बरीच हिंडले आणि माझा नवराही गेली २० वर्षे नोकरी सोडून कार्यकर्ता म्हणून शहरी प्रश्नांमध्ये लक्ष घालत आहे.

जळगावला परत आल्यावर बाबांनी मला सायकल घेऊन दिली होती, ती मला नागपूर, आणि काही काळ दिल्लीलाही पुरली. आणि ती आम्ही मुंबईला घेऊन आलो. माझ्या धाकट्या मुलाला सलीलला त्याचा उपयोग झाला, शाळेत आणि पहाटे उठून शिवाजीपार्कवर क्रिकेट खेळायला जायला. लेडिज सायकल असूनही त्याने तक्रार केली नाही.

पुन्हा मला संधी मिळाली हॉलंडला. वयाच्या छत्तिसाव्या वर्षी, प्रेमामध्ये पडल्यानंतर बरोबर वीस वर्षांनी स्कॉलरशिप मिळून मी सोळा महिन्यांसाठी एम.ए. करण्यासाठी दि हेग, या हॉलंड देशाच्या राजधानीमध्ये रहायला गेले. 'इन्स्टिट्यूट ऑफ सोशल स्टडीज' या संस्थेमध्ये प्रथमच वुमेन्स स्टडिजचा कोर्स सुरू झाला होता. इतरही अनेक कोर्सेस होते. मुख्य म्हणजे वयाच्या मध्यावर, नोकरीपेशात किंवा चळवळींमध्ये थोडासा अनुभव मिळालेल्या लोकांसाठी तेथील कोर्सेस होते. जगभरच्या विद्यार्थ्यांना तेथे संधी दिली जाई. माझ्याही कोर्समध्ये दक्षिण अमेरिकेपासून ते फिलिपाईन्स, इन्डोनेशिया अशा 'विकसनशील देशांतून विद्यार्थी' आलेले होते त्यामुळे त्या त्या देशातील विविध चालीरीती, समजूती आणि अर्थात अर्थव्यवस्था यातून दिसणारे स्त्रियांचे स्थान याबद्दल खूप देवाणघेवाण आणि विश्लेषण शक्य होई. गंमत म्हणजे आमच्या डिपार्टमेंटच्या मुख्य मारिया मिएस यांनी स्थानिक डच विद्यार्थिनींना, मुलग्यांना सुद्धा परवानगी दिली होती. पाश्चिमत्त्य देशातून स्त्रियांची चळवळ त्याकाळात १९७० ते १९८५ खूप मजबूत होती आणि उत्साहाने थयथयत होती. त्यामानाने विकसनशील देशात अजून स्त्रियांचे आत्मभान सावकाश उमलायला लागले होते. मारिया मिएस यांना या दोन्ही बाजूंची एकमेकांना ओळख व्हावी अशी इच्छा होती. चळवळीच्या पुष्कळशा प्रसंगांना आम्ही जात असू, पण या स्थानिक मैत्रिणींचा फायदा कोणी करून घेतला असेल तर तो मी आणि याचे कारण माझे सायकलचे ज्ञान. हॉलंड हा देश सायकलस्वारांचा आहे. पूर्वीही होता आणि कौतुकाची गोष्ट म्हणजे आताही आहे. चीनच्या विकसनशील काळात आपण बिजिंगच्या रस्त्यावर कामावर निघालेल्या स्त्री-पुरुषांच्या सायकलींच्या झुंडी पाहिल्या होत्या, पण आता देश श्रीमंत झाल्यावर, मेट्रो आल्यावर सायकली गायब झाल्या आहेत आपल्यासारख्या स्कूटर्स आल्या आहेत. तर सांगायची गोष्ट म्हणजे दि हेगला आल्यावरही मी नशिबवान ठरले कारण मला माझ्या लॅन्डलेडीने तिची सायकल देऊ केली आणि मग मी लांबच्या मॉलमधून स्वस्तात मिळणाऱ्या अन्नपदार्थांची आठवडाभराची साठवण करू शकले. दि हेगचे समुद्र किनारे पालथे घालू शकले आणि डच मैत्रिणींबरोबर पिकनिकचे बेत आखू शकले. आमच्या मध्ये एकदम मैत्र तयार झाले. माझ्या बरोबरीच्या बऱ्याच क्लासमेट्स एनजीओमधून किंवा सरकारी नोकरीतून आलेल्या होत्या आणि मी आणि एक बंगलादेशची सुल्ताना चळवळीची पार्श्वभूमी घेऊन आलेल्या होतो. त्यामुळेही असेल आम्ही अजिबात व्यावसायिक पद्धतीने वागत नव्हतो. स्थानिक डच मैत्रिणींनाही तिसऱ्या देशातील स्त्रियांबद्दल कुतूहल होते म्हणूनच तर त्यांनी हा कोर्स निवडला होता. इंग्लिश मात्र सक्तीचे होते. तर सांगायचे म्हणजे सायकलने जसा मला जीवनसाथी दिला तशा या जीवनभर पुरतील अशा डच मैत्रिणीही दिल्या.

मला सुमित्रा भाव्यांचा लघु चित्रपट आठवतोय, 'चाकोरी'. खेड्यातील मुलगी चोरून सायकल चालवायला शिकते आणि तिचे आत्मभान जागरूक होते. पंख पसरायला लागतात. आजही जेव्हा मी बातमी ऐकली की बिहारमध्ये नितिशकुमारांनी मुलींना

शाळेत जाता यावे म्हणून सायकलींचे वाटप केले तेव्हा मला भरून आले. मुली आता शिकतात, पायलट होतात, लढाऊ विमाने चालवायला लागतात. तरीही मला वाटते की सायकल शिकणे हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मुलींसाठी खचितच. बॅलन्स राखणे, रस्त्यावरचे लक्ष ढळू न देणे. आश्चर्य वाटून वळून वळून बघणाऱ्या वाटसरूंमुळे बिचकून न जाता आत्मविश्वासाने पुढे जाणे, एक तंत्रज्ञान आपण आपलेसे केले याचा आनंद उपभोगणे आणि फिरण्याच्या अनंत शक्यता आता उपलब्ध होऊ शकतील यामुळे जग जिंकल्याचे फीलिंग येणे असे सर्व काही याच्याशी निगडित आहे असे मला वाटते. माझ्या मते विमान चालविणे आणि सायकल चालविणे याची तुलनाच होऊ शकत नाही. निसर्गाशी स्पर्धा न करत किंवा त्याच्यावर आपण मात केली आहे अशी भावना मनात न आणता, उलट निसर्गाशी संवाद साधत त्याच्या लीला बघत, कधी चढ तर कधी उतार, आजूबाजूला उमललेली शेते, चरणारी गुरे, शेळ्या, मेंढ्या, कधी माळावरचा एकलकोंडा रस्ता, उन्हाच्या आसऱ्यासाठी एकुलते एक झाड, असंख्य रुपे बघत, कुठेतरी दूर कोणीतरी आपली वाट बघत आहे अशी ओढ आणि नेटाने सायकलचे पॅडल मारत निघालेलो आपण.

आताही मी माझ्या आजूबाजूला जेष्ठ नागरिक, खरं म्हणजे वयोवृद्ध नागरिक, बघते, मुख्यत: स्त्रिया आणि मला खंत वाटते की यांनी आपली मोबिलिटी कशी कॉम्प्रमाइज केली? ज्यांच्याकडे गाड्या आणि ड्रायव्हर आहे त्यांचे बरे आहे, पण नाही त्यांना निदान सायकल किंवा स्कूटर तरी चालविता आली असती की नाही? आता उबर आहे नं! कोणीतरी मध्येच म्हणते. पण जवळ कुठे जायला तिचा काय उपयोग? हॉलंडमध्ये कितीतरी म्हाताऱ्या बायका अजूनही सायकल चालवत स्टेशनपर्यंत येतात. सायकल पार्क करून लोकल ट्रेनमध्ये बसून खूप हिंडत असतात. अर्थात तिकडे खूप सोयी केलेल्या आहेत. सायकलींसाठी खास रस्ते, पार्कींगची सोय. पण त्यांनी सायकल संस्कृती अंगिकारली आहे. मी माझ्या बाबांना मनातल्या मनात खूप धन्यवाद देते, त्यांनी एकदा मला सायकलवर बसून सोडून दिले आणि मग मी स्कूटर चालवायला शिकले, गाडी चालवायला शिकले. ग्लायडर चालवायला शिकले. मला आठवते की मी गिरणी कामगारांच्या बरोबर काम करत असताना एकदा संपाच्या वेळी आम्हाला कोणी तरी जुनी गाडी दिली, फिरण्यासाठी, ठिकठिकाणी पिकेटींग कसे काय चाललंय हे पहाण्यासाठी, पण कोणाला गाडीच चालवायला येत नव्हती. गाडी जुनी होती आणि हॅन्डल मारून सुरू करावी लागत होती. मी तयारी दाखविली आणि पुढचे पाच दिवस मी ड्रायव्हर आणि बरोबरीच्या कार्यकर्त्याने हॅन्डल मारले की माझी गाडी सुरू होऊन आम्ही सर्व गिरणगाव पालथे घालू शकत होतो. संचारसुविधा (मोबिलिटी) हे जीवनाचे महत्त्वाचे तत्व आहे आणि सायकल हे त्याचे प्रतीक आहे, असे मला मनापासून वाटते. विशेषत: स्त्रियांना, चार भिंतीतून बाहेर पडण्यासाठीचे पहिले पाऊल. पाच हजार वर्षांपूर्वी स्त्री बंधनात कशी पडली असेल, हे सांगतांना आम्ही सांगतो की कुंभाराच्या चाकाचा शोध स्त्रीने लावला कारण गवताचे बी भरून ठेवण्यासाठी त्यांना मडक्यांची गरज होती, पण तेच कुंभाराचे चाक घेऊन पुरुषाने बैलगाडीला लावले, रथाला लावले आणि तो जग जिंकायला निघाला. पुरुष सत्तेचा उदय झाला. म्हणूनच ही संचारबंदी तोडण्यासाठी स्त्रियांनी सायकलपासून सुरुवात करावी. स्कूटर किंवा मोटरसायकल शक्तीचे, बळाचे प्रतीक आहेत. पण सायकल, शांत, सुंदर, तुमच्या कलाने चालणारी, आजूबाजूच्या निसर्गाचा आस्वाद घेत घेत पुढे नेणारी, कोणत्याही प्रकारच्या प्रदूषणाचा प्रसार न करणारी, अशी तुमची सखी होऊ शकते. आज मी ऐकते की स्वित्झर्लंड किंवा झाग्रेब येथे अशा सायकल टूर्स काढल्या जात आहेत. त्या स्पर्धा नाहीत तर निसर्गाशी सान्निध्य साधत एखाद्या देशाचा शोध घेणाऱ्या या टूर्स आहेत. मला वाईट वाटतंय की आधी का नाही कळलं नाहीतर मी देखील सामील झाले असते. अर्थात मीही थोडाफार अनुभव घेतलाच आहे हॉलंडमध्ये वयाच्या छत्तिसाव्या वर्षी.

मग काय म्हणाल तुम्ही, सायकल ही केवळ गंमत आहे की संचारबंदीची लक्ष्मणरेषा ओलांडण्यासाठीचे पहिले पाऊल, पहिले प्रतीक आहे? मुक्तिदायी प्रतीक?

**– छाया दातार**
भ्रमणध्वनी : ९३२२५९७९९७
chhaya.datar1944@gmail.com

।।ग्रंथाली।।

# नैतिक–अनैतिक

**अर्जुन जगधने**




या कथांमधील पात्रांचे हे धाडसी निर्णय आणि कृती बरेचदा नैतिक आणि अनैतिक या संकल्पनांची चर्चा छेडतात. तत्वच्युत झालेल्या पतीपासून अलग होऊन विचारपूर्वक दुसऱ्या विचारी आणि आवडीनिवडींचे सूत जमू शकणाऱ्या पुरुषाशी नवे सहजीवन सुरू करणाऱ्या स्त्रिया या कथांमधून भेटतात. सरधोपटपणे वागणारा समाज दुसरा विवाह करणाऱ्या स्त्रीकडे फारशा आपुलकीने पाहत नाही. त्यात आधीचा संसार मोडून दुसरी निवड केली असेल, तर नाहीच नाही. पण जगधने यांनी उभी केलेली स्त्रीपात्रे काहीएका विचारातून, नैतिक भूमिकांतून हा निर्णय घेताना दिसतात.

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**


नवं पुस्तक


सत्तेच्या मलिद्यासाठी प्रत्येक राजकारणी घरात पेटलेले नवे 'पानिपत'...
ज्याला झेंड्याचे आणि पक्षाचे बंधन नाही

# विश्वास पाटील

यांची नवी वादळी कादंबरी

# नागकेशर



**पृष्ठसंख्या : ४०४**
**किंमत : ₹४५०**
Book Available

नवीन सुधारित आवृत्ती

शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी
यांचे अर्थानुसार संकलन




अभिनव मराठी-मराठी-इंग्रजी

## पर्याय शब्दकोश


लेखक
वि. शं. ठकार

**पृष्ठसंख्या : ९७६**
**किंमत : ₹६३०**
Book Available

इंग्रजी व्याकरणाचा समग्रतेने,
सुलभतेने घेतलेला अभिनव वेध

## A METHODICAL ENGLISH GRAMMAR

लेखक
जी. डी. मोरे




**पृष्ठसंख्या : ५४८**
**किंमत : ₹४९५**
Book Available

मेहता पब्लिशिंग हाऊस
Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
Mehta Books
1000+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665
Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book -
play.google.com/store/books
www.amazon.in/b?node=15513892031



# तिची कविता


## बायका बोलू लागल्याहेत मिटू मिटू

बायका
बोलू लागल्याहेत मिटू मिटू
फुटला आहे त्यांना कंठ
नखही वाढलियेत त्यांची
निघल्याहेत त्या
आपल्या तीक्ष्ण टोकदार नखांनी
टराटर बुरखे फाडत
वासनेची भुतं नागवी करून
वेशीवर लटकवत

बाईची आब्रू म्हणजे काचेचं भांडं
असल्या कचकडी धारणा
मोडून टाकल्याहेत त्यांनी
टरकावूनही दिले आहेत
बाईपणाचे विटके पदर
आणि निघाल्याहेत त्या वणवा होऊन
अवतीभवतीची वखवख भस्मसात करत

काळ झोपेतून जाग्या झाल्याहेत बायका
काचेच्या भांडया सारखे
खळ्ळकन आता
फुटताहेत पुरुष

**– संगीता अरबुने**
भ्रमणध्वनी : ८०८०२३३९६३



रेखाटन : ईशा सानेकर

## काश्मिरी स्त्री

काश्मिरी स्त्रीला
भीती वाटते
'आई' होण्याची
आतून तिला
पोखरत असते
एकच चिंता
मुलगा झाला तर
दहशतवादाचे सावज होईल
जर मुलगी झाली तर
होईल बलात्काराची शिकार
काश्मिरी बाई
घाबरते मातृत्वाला

## महिला दिवस

एक महिला
फाटक्या वस्त्रात
आपल्या भुकेल्या
मुलीला
पाठीवर बांधून
फोडते आहे दगड
रस्त्याच्या कडेला.....
पाहते, न्याहाळते
'ती'
स्त्री सक्षमीकरणविषयक
पोस्टर, बॅनर, आंदोलन
स्वप्नाळूपणे, आश्वासकपणे.....
नारीशक्ती झिंदाबाद,
स्त्रीमुक्ती झिंदाबाद
ऐकत असते जोशपूर्ण घोषणा.....
तेवढ्यात
पोटावर तिच्या
बसते कंत्राटदाराची लाथ
दगडफोड
हाच तुझा महिला दिन.

**मूळ कविता : डॉ. अनिता ठक्कर**
**अनुवाद : सुचेता गिरीश नलावडे**
भ्रमणध्वनी : ९८१९३१०८७२

## रजोनिवृत्ती

यौवनाच्या खुणा
विलयाला जाताना
गूढ षड्यंत्रांची
कुजबुज सुचवणाऱ्या ऋतूची
चाहूल लागते.

एका ओल हरवलेल्या दिवशी

थंडगार आणि बेचव झालेला काळ
माझ्या ताटात वाढला जातो
आणि आता
माझ्या ओलाव्याच्या खुणा
पार पुसून गेल्यावर
असह्य आणि अवघड घासाघिशी तेवढ्या
शिल्लक उरतात.

मंद गतीने का होईना शरीर
उत्सुक आणि सज्ज  असतं
तरी गुडघ्यातली कळ
आणि वयानं मांडलेला मनाचा छळ
यांचा मेळ घालत
स्वतःला सुरक्षित राखणं
जमता जमत नाही.

कुठे आहे कुठे नाही अशी
अस्ताव्यस्त लव फुटलेय हनुवटीभोवती
पॉलिथिनची रिकामी पिशवी भरकटावी हवेत
तसं मन
कधी इकडे कधी तिकडे

मी घट्ट पकडून बसते वाऱ्याला
अंग पिळवटतं
आणि हात निसटू न देण्याच्या प्रयत्नात,
इथं तिथं मुरगळतं

तरीही उत्सव येतात
पुन्हा पुन्हा येतात
गेलेल्या सणासुदीच्या  खुणा
पार मिटून गेल्या असल्या
तरीही.



## रजोनिवृत्ती २

सुकलेल्या ग्रंथींचे फटकारे मारुन
काळाने देहाचा नक्षाच पालटलाय

उजाड योनी :
ग्रीष्मातील शुष्क तळ्यासारखी

धूसरतेच्या रिपरिपीत
देह चिकचिकतोय

वर्षानुवर्षं लपवून जपून ठेवलेल्या ज्वाळा उफाळतायत
सगळं जग जाळून टाकायला

प्रेमाच्या प्रतिमा विखुरतात
वेदनांचे रेणू ओघळू लागतात
नागमोड्या धारा बनून

काफ्काच्या ग्रेगर प्रमाणे
रुप पालटून
हा देह आतल्या राक्षसाला घट्ट मिठीत घेईल
प्रेमभराने चुंबन घेईल त्याचं
आणि सांगत राहील
आईपणाच्या कल्पित कथा

**मूळ तमिळ कविता : कवयित्री सलमा**
**इंग्रजी अनुवाद : एन. कल्याण रामन**
**मराठी अनुवाद : सोनाली नवांगुळ**
भ्रमणध्वनी : ९७६७९५१९०५



# कलाक्षेत्र समृद्ध करण्यात महिला चित्रकारांचे योगदान

प्रा. डॉ. सुभाष पवार

**चित्रकलेच्या क्षेत्रात आपल्या कुंचल्याचे रंग उमटवणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा आलेख महिलादिनानिमित्ताने रेखाटला आहे चित्रकलेचे व्यासंगी अभ्यासक आणि जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे निवृत्त प्राध्यापक सुभाष पवार यांनी...**

**भा**रतीय चित्रकला क्षेत्रात महिला चित्रकारांची परंपरा प्राचीन काळापासून सुरू होते. बाणासूर कन्या उषा ही भारतीय चित्रकारांमधली आद्य चित्रकर्ती आहे. तिने चितारलेल्या चित्रयुक्त महालाचं वर्णन हरिवंश पुराणग्रंथात आढळतं. आपल्या स्वप्नात आलेल्या प्रियकराचं चित्र उषेनं साकारलं होतं. यामध्ये उषेला तिची सखी चित्रलेखाची मदत झाली होती. चित्रलेखासुद्धा उत्तम चित्रकर्ती होती असं वर्णन या ग्रंथात केलं आहे. हर्षाच्या रत्नावली नाटकाची नायिकासुद्धा चित्रकलेत निपुण होती, तिने वत्सराज उदयन या आपल्या प्रियकराचं उत्कृष्ट चित्र रेखाटलं होतं. संस्कृत साहित्यात चित्रकामात निपुण असलेल्या नायिका एकमेकांची चित्रं काढून मनोविनोदन करीत असत असे उल्लेख आढळतात.

भारतीय चित्रकलाक्षेत्रात प्राचीन काळातल्या या संदर्भानंतर मधल्या काळातली काहीच माहिती उपलब्ध होत नाही. सुप्रसिद्ध चित्रकार एम. व्ही. धुरंधर यांनी सर जे. जे. स्कूल आर्टमधील विद्यार्थी ते अध्यापक पर्यंतच्या (१८९० ते १९३१) कलाप्रवासाबाबत लिहिलेल्या कलामंदिरातील ४१ वर्षे या पुस्तकात काही महिला चित्रकारांचा उल्लेख आहे. १९१० च्या ड्रॉईंग टीचरच्या ट्रेनिंग कोर्समध्ये मिस करशेटजी व मिस बारिया या दोन महिला कलाविद्यार्थिनींचा उल्लेख आहे. त्यापैकी मिस करशेटजी चांगल्या चित्रकार झाल्या. त्यांच्या नावाने आजही लेडी करशेटजी अ‍ॅवार्ड जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये उत्कृष्ट कलाविद्यार्थ्याला दिले जाते. मिस बारियाविषयी फारशी माहिती उपलब्ध झाली नाही. या काळात चाळीस विद्यार्थ्यांमध्ये जवळपास पंधरा विद्यार्थिनी असत, अशीही माहिती मिळते. १९१५ च्या फोर्थ इयर पेंटिंग क्लासमध्ये मिस इंजिनीअर या कलाविद्यार्थिनीचा उल्लेख आहे. 'पुढे त्या चित्रकर्ती म्हणून चांगल्या प्रकाशमान झाल्या', असे धुरंधरांनी लिहून ठेवले आहे. १९३० च्या फोर्थ इयर पेंटिंग क्लासमध्ये मिस हेंडरसन, मिस धुरंधर, मिस डिसोझा, मिस एल. फर्नांडीस व मिस वाझ या कलाविद्यार्थिनींचा उल्लेख आहे. त्यापैकी मिस धुरंधर व मिस हेंडरसन यांच्या कलाजीवनाविषयी या लेखात लिहिणारच आहे. मिस डिसोझा या पुढे सेंट झेवीयरमध्ये ड्रॉईंग टीचर म्हणून कार्यरत होत्या. मिस वाझ यांनी काही काळ ड्रॉईंग टीचरचे काम केले नंतर ते सोडून त्यांनी कॉनव्हेंटचा मार्ग स्वीकारला असे लिहिले आहे. त्या पुस्तकात औंध संस्थानमधील श्रीमंत अक्कासाहेब पंत यांनी 'बर्मिंगहॅम कॉलेज ऑफ आर्ट'मधून डॉईंग टीचरचा डिप्लोमा पूर्ण केला होता व त्याही उत्तम चित्रकर्ती होत्या. औंध संस्थानचे राजे कलाप्रेमी होते यासाठी औंधचे कलासंग्रहालय ही साक्ष पुरेशी आहे.

वरील काही नोंदी वाचल्या तरी पहिल्या भारतीय स्त्री चित्रकार म्हणून अमृता शेरगील (१९१३-१९४१) यांचं नाव प्राधान्याने घेतलं जातं. आई हंगेरियन तर वडील शिख नोबलमॅन उमराव सिंग. वीस वर्षांतच सेझां, गोगँ, व्हॅनगॉग यासारख्या पोस्ट इम्प्रेशनिझमचा पुरस्कार करणाऱ्या कलावंताचा प्रभाव अमृता शेरगीलवर मोठ्या प्रमाणात झाला. या काळातच तिने व्यक्तिचित्रे, न्यूडस्, सेल्फप्रोट्रेट्स आणि निसर्गचित्रे साकारली. १९३४ दरम्यान भारतात आल्यावर शेरगील यांनी भारतभर भ्रमण केलं. भारतीय लघुचित्रशैली, बंगाली चित्रशैली यांचा अभ्यास केल्यावर त्यांच्यावरचा पाश्चात्त्य प्रभाव हळूहळू कमी होऊन भारतीय चित्रविषयांना त्यांनी प्राधान्य दिलं. तैलरंगातल्या रंगलेपनातून त्यांनी या कलाकृती साकारल्या. त्यांचं पहिलं चित्रप्रदर्शन १९३५ साली शिमल्यात झालं. त्यांनतर दिल्ली, मुंबई, अलाहाबाद, हैद्राबाद इत्यादी ठिकाणी शेरगील यांच्या चित्रांची प्रदर्शनं भरवण्यात आली. त्यांच्या चित्रांत गरिबी, दुःख, करुणा, वात्सल्य, प्रेम या भारतीय स्त्रियांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा विशेषरूपाने समावेश केलेला आढळतो. शेरगील यांनी साकारलेल्या तीन बहिणी या चित्राला १९३७ साली 'बॉम्बे आर्ट सोसायटी'चं गोल्ड मेडल मिळालं होतं. ५ डिसेंबर १९४१ रोजी अल्पशा आजाराने अवघ्या २८ व्या वर्षी शेरगीलचं निधन झालं.



बी. प्रभा



प्रफुल्ला डहाणूकर



अंजली इला मेनन



गोगी सरोज पाल

तिचा मृत्यू सर्वांनाच चटका लावून गेला. भारतीय कलाक्षेत्रात अमृता शेरगीलचं नाव अजरामर झालं आहे.

सुप्रसिद्ध चित्रकार त्रिदांद मास्तर यांच्या कन्या अंजेला त्रिदांद (१९०९-१९८०) यांचा जन्म मुंबईतलाच. वडिलांचा कलावारसा अंजेलाकडे चालून आला. पहिली महिला कलाशिक्षिका व चित्रकार म्हणून नावाजलेल्या अंजेला त्रिदांदने व्यक्तिचित्रण व स्थिरचित्रणावर प्रभुत्व मिळवलं. १९३६ साली 'ऑल इंडिया वुमन आर्टिस्ट कॉम्पिटिशन'मध्ये त्यांनी गोल्ड मेडल मिळवलं. भारतीय पद्धतीने ख्रिस्ताचं जीवनदर्शन त्यांनी आपल्या चित्रांतून साकारलं होतं. राजघराण्यातल्या गुलाबशेठ या समवयस्क मैत्रिणीचं व्यक्तिचित्रण त्यांनी केलं होतं. १९४०च्या स्त्री मासिकाच्या मुखपृष्ठावर ते चित्र प्रकाशित झालं होतं. वयाच्या ७१ व्या वर्षी १९८० साली त्यांचं ब्राझीलमध्ये निधन झालं.



जगप्रसिद्ध चित्रकार रावबहादूर धुरंधराच्या चित्रशैलीप्रमाणे चित्रनिर्मिती करणाऱ्या त्यांच्या सुकन्या अंबुताई धुरंधर (१९१२-२००९) या उत्कृष्ट चित्रकर्त्या होत्या. १९३१ मध्ये पेंटिंगचा डिप्लोमा दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. त्याच वर्षी गोपाळ देऊसकर प्रथम क्रमांकाने तर जे.डी. गोंधळेकर तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. अंबुताईंनी १९२८ ते १९३९ या ११ वर्षात बॉम्बे आर्ट सोसायटी मुंबई तसेच शिमला, बंगळुरु, म्हैसूर, कोलकाता, दिल्ली आणि कोल्हापूर इथल्या कला प्रदर्शनात आपल्या कलाकृती पाठवल्या होत्या आणि त्यांना रौप्यपदकं तसेच अनेक पारितोषिके मिळाली होती. वडिलांच्या निधनानंतर त्यांनी धुरंधर कला मंदिराची स्थापना केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी शिवाजी महाराजांच्या राज्यरोहण समारंभाचं चित्र अभ्यासपूर्ण असं साकारलं होतं. तसंच इतरही शिवाजींच्या जीवनावरची चित्रं तयार करून त्यांचं प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं होतं. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं होतं. अखेरच्या काही वर्षात त्या एकाकीपणाने जीवन जगत होत्या.

व्यक्तिचित्रणात प्रभुत्व असलेल्या स्त्री चित्रकर्ती आणि महिला शिक्षिका असलेल्या रतन वडके (१९२८-१९६५) यांचं कलाशिक्षण तर जे.जे. मध्ये झालं आणि तिथेच शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. भित्तीचित्रांसाठी त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली. उत्कृष्ट गुणांनी पदविका उत्तीर्ण झाल्यामुळे फेलो म्हणून त्यांनी काम पाहिलं. १९४७ मध्ये लक्ष्मण पै, शंकर पळशीकर, बाळासाहेब संगवई यांच्यासमवेत शिक्षिका म्हणून त्यांनी उत्तमरित्या जबाबदारी पार पाडली. रतन वडकेंच्या व्यक्तिचित्रणात वेगळा गोडवा होता. तसंच त्यांच्या चित्रात भावदर्शी बोलके डोळे अप्रतिमरित्या चितारलेले असत. त्यांनी स्वतःचंच न्यूड चित्र साकारलं होतं. त्या काळातल्या मोजक्याच महिला चित्रकर्तींमध्ये त्यांचं नाव आघाडीवर असे. यकृताच्या कर्करोगाने त्यांचं मे १९६५ मध्ये निधन झालं.

मिस मारी हेंडरसन (१९१२-१९८१) या जे.जे.स्कूल ऑफ आर्टमध्ये सॉलोमनच्या काळात शिक्षिका होत्या. त्या मूळच्या इगतपुरीच्या जातीने अँग्लो-इंडियन उत्कृष्ट शरीरसौष्ठव, सुस्वरुप, लाघवी भाषा आणि युरोपियन जमातीकडून आलेला धीटपणा यामुळे त्यांची कुणावरही चटकन छाप पडे. या बाई जे.जे.मध्ये द्वितीय वर्षाला स्टिल-लाईफ हा विषय शिकवत असत. तत्कालिन मिस्त्री मास्तरांच्या टीचर्स ट्रेनिंग वर्गात त्या पहिल्या आल्या होत्या. शिक्षकी पेशाबरोबरच त्या सॉलोमनसाहेबांच्या देखरेखीखाली चित्रकलेचा अभ्यास करत. त्यांनी चित्रकलेत दिवसेंदिवस प्रगती केली. अनेक प्रदर्शनात बक्षिसंही मिळाली. पुढे त्यांच्या एका नग्नाकृती चित्राला बॉम्बे आर्ट सोसायटीचं गोल्ड मेडल मिळालं. सॉलोमन निवृत्त होण्यापूर्वी त्यांना मिस हेंडरसनची चिंता सतावी, कारण आपण गेल्यानंतर बाईंच कसं होणार या चिंतेपोटी आणि तिच्यावरच्या मायेपोटी त्यांनी तिचा विवाह सर रिचर्ड टेंपल या साहेबाबरोबर करून दिला. जे.जे.चे नवीन डायरेक्टर जेराल्ड आल्यावर हेंडरसन यांनी आर्ट स्कूलमधल्या शिक्षकपदाचा राजीनामा दिला. पुढे तिच्या पतीचं निधन झालं सर टेंपलपासून झालेल्या मुलांचा सांभाळ



नलिनी भागवत



ज्योत्स्ना कदम



सुजाता आचरेकर



स्वाती साबळे

करण्याची पाळी लेडी टेंपल (अर्थात मारी हेंडरसन) यांच्यावर येऊन पडली. त्यांनी कॅथेड्रल स्कूलमध्ये आर्ट टीचरची नोकरी पत्करली. वास्तववादी शैलीत चित्रनिर्मिती करण्यात त्या वाकबगार होत्या. ८० व्या दशकापर्यंत त्या कार्यरत होत्या. त्यानंतर त्यांची काहीच माहिती उपलब्ध नाही.


बी. प्रभा (१९३३-२००१) यांनी नागपूरच्या स्कूल ऑफ आर्ट व मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून कलेचे शिक्षण घेतले. आदिवासी व ग्रामीण महिला जीवनावर फिगरेटीव्हमधून त्यांनी स्वतःची चित्रशैली निर्माण केली. बी. विठ्ठल या शिल्पकार पतीबरोबर त्यांची कला फुलत गेली. त्यांच्या चित्रशैलीत फ्रेंच कलाशैलीबरोबरच अमृता शेरगीलच्या कलेचाही ठसा दिसतो. त्यांनी आपल्या मुक्त व स्वैर कल्पनाशक्तीच्या जोरावर विविध साहित्य, वेगळे विषय आणि भिन्न कलाप्रकारामधून विपुल चित्रनिर्मिती केली. निसर्गचित्रणाबरोबरच मानवी जीवनाला भेडसावणारे विषय- भूक, दुष्काळ, बेघर, बांगला देश युद्धाचा आघात इत्यादी विषयावर भरपूर चित्रे साकारली. त्यांच्या सहज सुलभ पद्धतीने चितारलेल्या डौलदार, नाजूक चेहऱ्याच्या आणि उभट अंगाच्या स्त्रिया सुकोमलतेच्या प्रतीक वाटतात. त्यांच्या चित्रात अध्यात्मिकतेचेही प्रतिबिंब दिसते. बी. प्रभा यांच्या चित्रांची देश परदेशात ५१ चित्रप्रदर्शने भरवली गेली. चित्रकलेतील योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे १९९८ साली त्यांचा सत्कारही झाला होता.

प्रफुल्ला डहाणूकर (१९३४-२०१४) यांनी मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून कलेचे शिक्षण घेतले होते. त्यांनी आधुनिक चित्रकर्ती म्हणून कला क्षेत्रात आपला ठसा उमटवला. सुरुवातीला वास्तववादी चित्रनिर्मिती करणाऱ्या प्रफुल्ला डहाणूकर यांनी अमूर्तवादाकडे आपली वाटचाल केली. भारतीय आधुनिक कलेचे नेतृत्व करणाऱ्या डहाणुकर यांनी अनेक तरुण चित्रकारांना म दतीचा हात दिला. 'बॉम्बे आर्ट सोसायटी इंडिया' या कलासंस्थेच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. जहांगीर कलादालन, आर्टिस्ट सेंटर कलादालनाच्या कलाकार्यातही उत्साहाने त्या सहभागी होत. अनेक जुने व मान्यवर काळाच्या पडद्याआड गेलेल्या कलावंतांच्या दुर्मीळ कलाकृतींचे प्रदर्शन भरवण्यात त्यांनी बहुमोल कार्य केले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे मान्यवर चित्रकर्ती म्हणून त्यांना गौरवण्यात आले होते. त्यांच्या निधनानंतर स्थापन झालेल्या 'प्रफुल्ला डहाणूकर आर्ट फौंडेशन'तर्फे त्यांच्या कलाकृतींचे जतन करण्यात आले असून तरुण चित्रकारांना मदतीचा हात देऊन प्रोत्साहन देण्याचेही कार्य सुरू आहे.

अंजली इला मेनन (१९४०) प. बंगालमध्ये जन्मलेल्या मेनन यांनी दिल्ली विद्यापीठाच्या 'नॅशनल स्कूल ऑफ फाईन आर्ट'मधून कलेचे शिक्षण घेतले. स्वतंत्रपणे चित्रनिर्मिती करून त्यांनी समकालीन चित्रकलेत स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. पश्चिम बंगालचे विषय व काहीशी अमृता शेरगीलची चित्रशैली यातून कलानिर्मिती करून समकालीन महिला चित्रकारांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर आहे. चित्रकलेतील योगदानाबद्दल त्या पद्मश्री व कालिदास पुरस्काराने सन्मानित झाल्या आहेत.

गोगी सरोज पाल (१९४५) उत्तरप्रदेशात जन्मलेल्या सरोज यांनी नॅशनल कॉलेज ऑफ आर्टमधून कलाशिक्षण घेऊन विविध रंगमाध्यमात चित्रनिर्मिती केली. गॉश, तैल, सिरॅमिक व टेक्सटाईल (विविंग) मधूनही कलानिर्मिती केली आहे. त्यांच्या चित्रातील विषय महिला व त्यांचे जीवन यावर आधारित असून चित्रात फॅन्टास्टिकल इलेमेन्टचा पूरेपूर वापर केलेला दिसतो. गोगी सरोज पाल यांच्या चित्रावर 'द फेमिनाईन अनबाऊंड' हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

नलिनी भागवत (१९४८) यांचा जन्म कोल्हापूरचा. प्राध्यापिका, चित्रकार, लेखिका व कला समिक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागवतांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून इतिहासात एम. ए. आणि 'दळवी स्कूल ऑफ आर्ट'मधून पेंटिंगचा डिप्लोमा व आर्ट मास्टरचा कोर्स पूर्ण केला. पुढे त्या मुंबईत जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये आर्ट हिस्ट्रीच्या प्राध्यापिका झाल्या. अध्यापकीय जबाबदारी सांभाळत त्यांनी बडोदा विद्यापीठातून १९८५ साली कलेच्या इतिहासात पीएच्.डी. मिळवली. त्यांनी हुंडाबळी, स्त्रियांवरील अन्याय व भारतीय नद्यांवरील घाट इत्यादी विषयावर काहीशी निमवास्तववादी चित्रनिर्मिती केली असून त्यांच्या चित्रांची भारतातील वेगवेगळ्या कलादालनातून प्रदर्शने आयोजित केली आहेत. नाईफ साह्याने उजळ रंग, सपाट रंगलेपन करून त्यांनी ही चित्रे कॅनव्हासवर साकारली आहेत. चित्रकला व कलाप्रदर्शने तसेच मान्यवर कलाकारांवर त्यांनी प्रतिष्ठीत अशा वृत्तपत्रात व




नियतकालिकात अभ्यासपूर्ण लेखन केले आहे.

ज्योत्स्ना कदम (१९५७) बदलापूर येथे जन्मलेल्या ज्योत्स्ना (जोशी) कदम यांनी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून कलेचे शिक्षण घेतले. मान्यवर चित्रकर्ती म्हणून व कलेवर विशेषतः चाईल्ड आर्टवर अभ्यासपूर्ण लेखन करणाऱ्या ज्योत्स्ना कदम यांनी निसर्ग अमूर्त शैलीत चितारला. चित्रकार व प्राध्यापक पती संभाजी कदम यांच्यासोबतच्या सहजीवनावर आधारीत 'सर आणि मी' हे त्यांचे पुस्तक कलाक्षेत्रात नावाजले आहे.या पुस्तकासाठी त्यांना पुरस्कारही मिळाला आहे. कलाक्षेत्रातला एक दस्तऐवज म्हणूनही या पुस्तकाचे मोल महत्त्वाचे आहे. त्यांनी साकारलेल्या चित्रांची वेगवेगळ्या कलादालनात प्रदर्शने भरवली गेली आहेत.

गायत्री मेहता (१९५९) यांनी बी.कॉम, एम.ए.(वाङ्मय) व एम.ए.(पेंटिंग)मधून शिक्षण घेतले. एक महिला चित्रकार म्हणून करिअर करताना त्यांनी काही काळ अध्यापिका म्हणूनही जबाबदारी सांभाळली होती. 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया'सारख्या कलासंस्थाचे कार्य करताना विपुल कलानिर्मिती केली. साधारणतः वास्तववादी शैलीत चित्रनिर्मिती करताना मानवी चित्ररचना व व्यक्तीचित्रण हे त्यांचे आवडीचे विषय आहेत. काही न्यूड चित्रांची निर्मितीही त्यांनी केलेली दिसते. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भारतातल्या अनेक कलादालनात भरवण्यात आली असून त्यांच्या चित्रांना पुरस्कारही मिळाले आहेत.

प्रा. डॉ. मनिषा पाटील (१९६१) यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये कलेच्या इतिहासावर अध्यापकीय कार्य करताना चित्रनिर्मितीही केली आहे. त्यांची स्वतःची निमवास्तववादी चित्रशैली असून मानवाकृती चित्ररचनामधून कलानिर्मिती केली आहे. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने वेगवेगळ्या मान्यवर कलादालनातून भरवली गेली आहेत. चित्रनिर्मितीबरोबरच त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेत कलेविषयक विपुल लेखन केलेले आहे.

सुजाता आचरेकर (१९६८) यांनी रहेजा स्कूल ऑफ आर्ट आणि 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मधून पेंटिंगचे शिक्षण घेतले. काही काळ त्या जे. जे. मध्ये कलाध्यापिका होत्या नंतर त्यांनी स्वतंत्रपणे चित्रकर्ती म्हणून आपले करिअर सुरू केले. फिगरेटीव्ह पेंटिंगमधून अध्यात्मिक विषयावर त्यांनी ऑलीक रंगात कॅनव्हासवर कलाकृती साकारल्या. ब्राईट व प्युअर रंगसंगतीत त्यांनी ही चित्रनिर्मिती केली. त्यांच्या चित्रांची अनेक प्रदर्शने विविध कलादालनात झाली असून अनेक कलारसिक व कलासंग्रहात संग्रहित करण्यात आली आहेत.

स्वाती साबळे (१९७५) यांनी पुण्याच्या एस.एन.डी. टी.मधून चित्रकलेचे उच्चशिक्षण घेतले. एक कलाशिक्षिका व स्वतंत्रपणे चित्रकर्ती म्हणून कार्यरत असताना त्यांनी निमवास्तववादी चित्रशैलीत कलानिर्मिती केलेली आहे. आपल्या चित्रातून 'स्त्री' हा विषय प्रामुख्याने साकारला असून स्त्री जीवनातील भाववैशिष्ट्ये दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. त्यांच्या चित्रांची भारतातल्या विविध कलादालनात प्रदर्शने झाली असून त्यांना राज्य व राष्ट्रीय पातळीवर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भारतातल्या काश्मीर, बंगलोर, हैद्राबाद, राजस्थान, पंजाब इत्यादी ठिकाणी त्यांनी आर्टकँपमध्ये सहभाग घेऊन आपली चित्र अभिव्यक्ती दाखवली आहे.

चित्रकला क्षेत्र समृद्ध करण्यात खालील महिला चित्रकारांनीही आपले योगदान दिले आहे. नलिनी मालिनी, अर्पितासिंग, भारती खेर, निलिमा शेख, शिल्पा गुप्ता, नसरीन मोहमदी, रीता साई कलात, अर्पणा कौर, माधवी पारेख, अनिता दुबे, मिथुसेन, दयानिता सिंग, शिला गावडा, मीरा मुखर्जी, हेमा उपाध्याय, झरिना, गार्गी रैना, मृणालिनी मुखर्जी, अनुपम सूद, नवज्योत अल्ताफ, गौरी गील, ललिता लाजमी, रिमा बन्सल, भारती दयाल, केतकी पिंपळखरे, सोनिया खुराणा, टी. के. पद्मिनी, सुनयनी देवी, शुभा गोखले या काही महिला चित्रकांराबरोबरच, शिल्पा निकम, स्मिता किंकळे, सीमा गोंडाणे, प्रिया पाटील, सुनिता पवार, योगिता होले यासारख्या तरुणींही आपले योगदान देत असून कलाक्षेत्र समृद्ध करण्यास हातभार लावत आहेत. अजूनही अनेक महिला कलावंत आहेत ज्यांची नावे जागेअभावी किंवा मला अज्ञात असल्याने त्यांचा सहभाग या लेखात करता आला नाही पण त्यामुळे त्यांचे योगदान कमी ठरत नाही. अशा सर्व महिलाशक्तींना महिला दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त करतो व लेखाला विराम देतो.

**– प्रा. डॉ. सुभाष पवार**
भ्रमणध्वनी : ९८६९५५१६६१
subhashpawar8@gmail.com



# चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रातील भारतीय महिला

संतोष पाठारे

**गेल्या दोन दशकांमध्ये भारतीय चित्रपटसृष्टीत दिग्दर्शकांची कामगिरी लक्षणीय ठरली आहे. त्यांनी केवळ स्त्रीवादीच नव्हे तर अनेक खळबळजनक विषयांची मांडणी चित्रपटांतून केली.**

दिग्दर्शक हा चित्रपटाचा कप्तान असला तरीहे कप्तानपद अनेकदा पुरुषच भूषवित असतो. मूकपटाच्या काळापासून स्त्रियांनी अभिनय करायला सुरुवात केली. सरस्वती फाळकेंनी पहिला भारतीय चित्रपटाच्या निर्मितीत योगदान दिलं आणि गेल्या शंभर वर्षाच्या काळात अनेक नायिकांनी चित्रपटसृष्टी गाजवली. तरीही मागील शतकात चित्रपट दिग्दर्शन हे प्रामुख्याने पुरुषाचं क्षेत्र मानलं गेलं. चित्रपटनिर्मितीमधील इतर विभागात स्त्रिया कार्यरत असल्या तरीही भारतीय चित्रपटसृष्टीत हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या स्त्री दिग्दर्शिका नावारुपाला आल्या. फातिमा बेगम या मूकपटाच्या दिग्दर्शिकेपासून सई परांजपे, अरुणा राजे, कल्पना लाजमी, सुमित्रा भावे, अपर्णा सेन या महिला दिग्दर्शिकांनी वैविध्यपूर्ण आशय त्यांच्या चित्रपटांतून मांडले. मीरा नायर, दीपा मेहता आणि गुरुविंदर चड्ढा या परदेशस्थ भारतीय महिलांनी केवळ स्त्रीवादीच नव्हे तर अनेक खळबळजनक विषयांची मांडणी चित्रपटातून केली. मुंबईतील रस्त्यावरील मुलाचं जीवन, १९४५ साली झालेल्या फाळणीचं दुःख, स्त्रियांमधील समलिंगी संबंध अशा अनेक संवेदनशील आशयाचा आविष्कार त्यांच्या चित्रपटातून झाला.

गेल्या दोन दशकांमध्ये भारतीय चित्रपटसृष्टीत महिला दिग्दर्शिकांची कामगिरी लक्षणीय ठरली आहे. झोया अख्तर, रिमा कटगी, अलंकिता श्रीवास्तव, कोंकणा शर्मा सेनगुप्ता, फरहा खान, अश्विनी अय्यर तिवारी या दिग्दर्शिका केवळ कलात्मकच नव्हे तर मनोरंजनाने ठासून भरलेले व्यावसायिक चित्रपट घेऊन आल्या. मराठी चित्रपटसृष्टीतही मृणाल कुलकर्णी, स्वप्ना वाघमारे जोशी या दिग्दर्शिका सातत्याने चित्रपट दिग्दर्शन करत आहेत. या सर्व दिग्दर्शिकांनी केलेल्या चित्रपटांकडे केवळ स्त्रीने निर्माण केलेला सिनेमा किंवा स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा सिनेमा एवढं संकुचित लेबल लावता येणार नाही. हे सगळे चित्रपट पाहताना प्रेक्षकांना गोष्ट सांगणं, त्यातून एक ठोस विधान करणं आणि त्यांना अपेक्षित असलेलं मनोरंजन पुरवणं या सर्व घटकांचा जाणीवपूर्वक विचार केलेला दिसतो. खरं तर काहींना स्त्री दिग्दर्शिका अशी वेगळी वर्गवारी करणं देखील आवडणार नाही. मात्र ज्या क्षेत्रावर पुरुषांची मक्तेदारी आहे त्या क्षेत्रात स्वतःचा दबदबा निर्माण करण्याचं कर्तृत्व या महिलांनी दाखवलयं. वर उल्लेखलेल्या प्रतिथयश नावांच्या बरोबरीनेच भारतीय चित्रपटसृष्टीत अनेक तरुण महिला दिग्दर्शिका विविध प्रशिक्षण संस्थांमधून शिक्षण घेऊन एखाद्या नामवंत दिग्दर्शकाच्या सहाय्यक म्हणून कामाचा अनुभव घेऊन स्वतंत्रपणे चित्रपट दिग्दर्शनाच्या क्षेत्रात येत आहेत. अशा महिलांनी निर्माण केलेल्या चित्रपटांचा महोत्सव महिलादिनाच्या निमित्ताने 'प्रभात चित्रमंडळा'तर्फे आयोजित करण्यात आला आहे. या चित्रपट महोत्सवात जगभरातील महिला दिग्दर्शिकांचे महत्त्वाचे चित्रपट, लघुपट व माहितीपट दाखवण्यात येणार आहेत. या महिलांना दिग्दर्शक म्हणून प्रस्थापित व्हायचं आहेच पण त्यांना चित्रपट माध्यमातून आजच्या स्त्रीची जीवनशैली, तिचं आजच्या समाजातील स्थान, तिच्या आशा आकांक्षा, तिच्या वाट्याला येणारी उपेक्षा, सुखदुःखाचे क्षण या सगळ्याला अधोरेखित करायचं आहे. या चित्रपटातून आशय ठळकपणे दिसतोच पण त्याच बरोबरीने या स्त्रियांचं सौंदर्यभानही लक्षत येतं. प्रतिमांची रेखीव मांडणी हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य ठरून जातं.


देयाली मुखर्जीचा 'तीन मुहूरत' हा अवघ्या सत्तर मिनिटाचा चित्रपट त्यातील तीन स्त्री व्यक्तिरेखांच्या तीन वेगवेगळ्या कथा सांगतो. रिना, नेहा आणि ईशा या आधुनिक विचारांच्या तरुणींच्या आयुष्यातील एका काळाचा तुकडा दिग्दर्शिका आपल्या समोर मांडते. पाच वर्ष ज्याच्याशी डेटिंग केलं त्या मुलाबरोबरच रिनाचं लग्न ठरलय. वरात दाराशी आलीय आणि रिनाच्या मनाची विचित्र घालमेल सुरू आहे. आपण घेतलेला लग्नाचा निर्णय चुकलाय, लग्न करुन नवीन घरात जायला, तिथल्या वातावरणाशी जुळवून घ्यायला आपण सक्षम नाही असं तिला वाटतयं. तिच्या या विचित्र मानसिक कोंडीतून, मेकअप करायला आलेला तरुण मुलगा तिला बाहेर काढतो. स्वतःची आधुनिक विचारसरणी आणि घरातील पारंपरिक चालीरिती, यामध्ये अडकलेल्या तरुणींचं रिना प्रतिनिधित्व करते.

नेहा आणि ईशा देखील रिनासारख्या स्वतंत्र विचारांच्या आहेत मात्र त्यांना घराबाहेरच्या जगात स्वतःच्या अस्तित्वासाठी लढावं लागतयं. आपण केवळ सुंदर दिसतो म्हणून बॉसने आपल्याला नोकरी दिली, हे सत्य समजल्यावर नेहा अस्वस्थ झालीय तर ईशाने आपल्यावर वर्चस्व गाजवू पाहणाऱ्या बॉसला उलट उत्तरे देऊन ऑफिस बाहेर पडलीय. तिला स्वतःचा उद्योग सुरू करायचा आहे. तिचा हा निर्णय तिच्या प्रियकराला पसंत नाही. पण त्याला आवडो न आवडो, ईशाचा निर्धार पक्का आहे.

रिना, ईशा, नेहा यांच्या शहरी जाणिवांना 'तीन मुहूरत' प्रेक्षकांसमोर आणतो. घरातून पाठिंबा मिळाला, शिक्षण मिळालं तरीही स्त्री म्हणून वाट्याला येणारा संघर्ष त्यांना चुकलेला नाही. स्त्रीचा शैक्षणिक किंवा आर्थिक स्तर कोणताही असला तरीही तिला जगताना ज्या प्रश्नांना सामोर जावं लागतं त्या प्रश्नाचं स्वरुप काही बदलत नाही. 'मॅनहोल' या विधू विंसेट दिग्दर्शित मल्याळम चित्रपटातील शालिनी समोर देखील जातिव्यवस्था हेच पेच उभे करते. शालिनीचे वडील मॅनहोलमध्ये उतरून साफसफाईचं काम करत असतात. शाळेतल्या मैत्रिणीपासून आपल्या वडिलांचा व्यवसाय ती लपवते, पण जेव्हा मॅनहोलमध्ये गुदमरून तिच्या वडिलांचा अपघाती मृत्यू होतो तेव्हा तिच्या मैत्रिणींना ती कनिष्ठ जातीची असल्याचं कळतं. आपल्या आईला मदत करण्यासाठी ती काम करते, उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करते पण वेळोवेळी तिची जात तिच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक आयुष्यात आडवी येते.

प्रेमचंद आणि सत्यजित राय यांच्या 'सद्‌गती'मधील परिस्थिती देशाला स्वातंत्र्य मिळवून सत्तर वर्ष उलटून गेली तरीही बदललेली नाही. जातिव्यवस्था आणि स्त्रियांची स्थिती यावर विधू विन्सेटला भाष्य करावंसं वाटतं हे उल्लेखनीय आहे.

बंगालमधील अभिजात साहित्यावर चित्रपट निर्माण करण्याची परंपरा आजच्या पिढीतल्या महिलांनी कायम ठेवलीय. बिभूतीभूषण बंदोपाध्यायांच्या 'पथेर संधात' या कथेवर आधारित त्याच शिर्षकाचा चित्रपट सिक्ता बिश्वास यांनी केलाय. बंगालच्या खेड्यातील एका तत्त्वनिष्ठ शाळा शिक्षकांची ही गोष्ट हृदय हेलावून टाकणारी आहे. विपरित परिस्थितीमध्ये सुद्धा आपल्या तत्त्वांना हा शिक्षक मुरड घालत नाही. कृष्णधवल रंगात केलेलं मनमोहक प्रकाशचित्रण हे 'पथेर संधान'चं वैशिष्ट्य आहे.




अरुणाचलमधील तरुण दिग्दर्शिका बॉबी शर्मांने 'मिशिंग' या चित्रपटातून जनमानसात रुजलेल्या अंधश्रद्धा व सत्शील माणसांच्या निष्ठा यांच्यातील ताणेबाणे उत्कंठावर्धक रितीने मांडलेत. 'भैरु' या लघुपटात मानसी देवधरने एका बहिऱ्या मुलाचे भावविश्व त्याला ऐकू यायला लागल्यानंतर कसे बदलून जाते याची संवेदनशील गोष्ट



सांगितली आहे. तर हमीद या माहितीपटातून समाजसुधारक व विचारवंत हमीद दलवाई यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख सुप्रसिद्ध अभिनेत्री ज्योती सुभाष यांनी घेतलाय.




आसाम, महाराष्ट्र, अरुणाचल, बंगाल, केरळ या विविध राज्यातील तसेच बांगलादेश, क्रोशिया, रशिया, श्रीलंका, इजिप्त या देशातील महिला दिग्दर्शिका लघुपट, माहितीपट व चित्रपटांच्या माध्यमातून ज्या वैविध्यपूर्ण आशयाची हाताळणी करताहेत त्याची झलक 'प्रभात चित्र मंडळा'च्या महिला चित्रपट महोत्सवातून पहायला मिळणार आहे. स्त्रीवादाच्या पलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टिकोन ठेवून निर्माण केलेल्या या चित्रपटाचा रसास्वाद रसिक प्रेक्षकांना महिला दिनानिमित्ताने ५ ते ७ मार्च २०१९ या काळात मुंबईत घेता येणार आहे.

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in



# घायाळ हरिणी

सुहास सोनावणे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नी डॉ. शारदा कबीर (डॉ. सविता अर्थात माईसाहेब आंबेडकर) यांचे व्यक्तिमत्त्व बाबासाहेबांशी किती एकरूप झाले होते हे रेखाटणारे एक हृद्य भावचित्र...**

**ल**ता मंगेशकरांच्या आर्त स्वरातून जेव्हा 'घायाळ मी हरिणी...' हे गीत ऐकतो तेव्हा व्याधीच्या तीक्ष्ण बाणाने शिकार झालेल्या एका देखण्या, चपळ म्हणून ज्ञात असलेल्या नितांतसुंदर अगतिक निर्दोष पण अगतिक झालेल्या प्राण्याचे चित्र डोळ्यांत उभे राहते. त्याच्या शरीरातून भळभळ वाहणाऱ्या रक्ताची कारंजी डोळे मिटून घेतली तरी थयथय नाचू लागतात.

माझ्या डोळ्यांसमोर मात्र जागतिक कीर्तीच्या सर्वव्यापी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रिय शरूची प्रतिमा अवतरते. 'लाखात लाभले भाग्य तुला गे बाई, विटेवरच्या विठ्ठलाची झालीस तू रखुमाई' या काव्यपंक्तीप्रमाणे वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी, ज्या तशाच लाखात देखण्या स्त्रीने डॉ. भीमराव आंबेडकर यांचा पती म्हणून स्वीकार केला, त्या शारदा कृष्णराव कबीर या माऊलीची! त्यांचा बाबासाहेबांसोबतचा उणापुरा आठ वर्षांचा प्रत्यक्ष संसार आणि त्याआधी एक वर्षाचा एकमेकांना जाणून घेण्याचा काळ वगळला, तर डॉ. सविता तथा माईसाहेब आंबेडकर यांच्या नशिबी उर्वरित सेहेचाळीस वर्षांचा सारा प्रवास रखरखीत तप्त वाळवंटातून झाला. सेवाभावी वृत्तीतून त्यांनी बाबासाहेबांचा हात हाती घेतला आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर प्रत्येक दिवस त्यांनी मरणयातनेसारखा भोगला. स्वार्थी मंडळींनी अशी कंडी पिकवली की, या ब्राह्मणकन्येनेच त्यांच्या दैवताला विष देऊन मारले. ही मंडळी केवळ राजकारणातील नव्हती तर शिक्षणक्षेत्रात वावरणारी, धम्मकार्याचा अंगरखा अंगावर चढवून त्या कर्णोपकर्णीच्या विषारी प्रचारात अडकली. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूची चौकशी करणाऱ्या समितीत जसे त्यांच्यावर वेळोवेळी उपचार करणारे डॉक्टर होते तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर त्यांचा राजकीय वारसा चालवणारे बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी कर्मवीर दादासाहेब गायकवाडही होते. चौकशी समितीने दिल्ली पोलीस अन्वेषण विभागाची मदत घेऊन सखोल चौकशी केली आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मृत्यू नैसर्गिक असल्याचा निर्वाळा दिला तरी या कर्णोपकर्णी पसरलेल्या विषाची पेरणी काही थांबली नाही.



एवढेच नाही तर ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झालेल्या बाबासाहेबांनी त्यांच्या लेखनिकाला पूर्वीच लिहून ठेवलेल्या त्यांच्या 'बुद्धा अॅन्ड हिज धम्मा' ग्रंथाची प्रस्तावना घरी जाण्यापूर्वी त्यांच्या टेबलावर काढून ठेवायला सांगितले होते. त्या प्रस्तावनेत आपल्या स्वाक्षरीसह बाबासाहेबांनी ग्वाही दिली होती की 'माझ्या सततच्या आजारपणाने मला 'विझत्या ज्योती'ची उपमा मिळाली होती. पण माझ्या पत्नीच्या वैद्यकीयशास्त्रातील निपुणतेने आणि माझ्यावर वैद्यकीय उपचार करणाऱ्या डॉक्टरांमुळे मी जिवंत राहून हा ग्रंथ पूर्ण करू शकलो.'

बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा ग्रंथ त्यानीच स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर एका वर्षाने प्रसिद्ध केला. त्यांच्याकडे ही मूळ प्रस्तावना असूनही त्या कर्मदरिद्री व नतद्रष्ट लोकांनी ती ग्रंथासोबत प्रसिद्ध केली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंजाबमधील एक संशोधक अनुयायी डॉ. बाली यांनी त्या प्रस्तावनेची जादा प्रत त्याच लेखनिकाकडून मिळवून एक पुस्तिका 'रेअर प्रीफेसेस ऑफ डॉ. आंबेडकर'

प्रसिद्ध करून ती बाब बऱ्याच उशिरा उघड केली. विशेष म्हणजे माईसाहेबांच्या बदनामीत सामील असलेल्या त्याच लेखकाकडून प्रा. डॉ. बाली यांनी ती प्रस्तावना मिळवली होती.

हे सारे आठवण्याचे कारण झाले ते 'शब्द रुची'च्या महिला विशेषांकानिमित्ताने! महिलादिनाचे महत्त्व लक्षात घेऊन माईसाहेबांची भळभळती जखम त्याद्वारे मांडण्याचे मी ठरवले. माईसाहेबांचे आणि माझ्या कुटुंबातील सर्वच सदस्यांचे नाते जिव्हाळ्याचे व कौटुंबिक. माईसाहेबांनी माझ्या घरी यावे, पत्नीने त्यांना आंघोळ घालावी, मुलींनी त्यांचे केस करावे इतके जवळचे. त्यामुळे माईसाहेबांच्या तोंडून मी लिहिता हात असल्याने मी अनेक आठवणी जागवून त्या मनाच्या आतील कुपीत सुरक्षित ठेवल्या.

मनाच्या कुपीचे झाकण अलगद उघडून मी वाचकांसमोर मांडत असतो. एकदा माईसाहेबांना बाबासाहेबांच्या प्रथम भेटीबद्दल मी विचारले असता, त्या म्हणाल्या होत्या, ''साहेब म्हणजे एक युगपुरुष. अशी माणसे कितीतरी शतकातून एकदाच जन्माला येतात. खरं तर साहेबांच्या रूपाने काळालाच पडलेलं ते एक रुपेरी, दिव्य, भव्य स्वप्न होते. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचं सोनं व्हावं तसं मी साहेबांची झाले आणि माझ्या जीवनाचं कोणालाही हेवा वाटावा असं सोनं झालं. साहेबांच्या उत्तर आयुष्यात त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत मी त्यांच्यासमवेत सावली सारखी वावरली. काया, वाचा, मने मी त्यांची सेवा केली. खरं तर मनापासून मी त्यांची पूजाच केली. त्यांना व्यक्तिपूजा मान्य नव्हती पण मला ते आदर्शापेक्षा अधिक काहीतरी वाटायचे. अशा या युगप्रवर्तक महामानवाशी माझी जन्माची गाठ बांधली गेली आणि मी धन्य झाले. कोणी मला कितीही दोष लावले तरी साहेबांच्या प्रती माझी भक्ती, प्रेम रतीभर देखील कमी झाले नाही.

इंग्रजीतील एका म्हणीप्रमाणे प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या जीवनात एका स्त्रीचा मोठा वाटा असतो. साहेब तर पडले महापुरुष, महामानव म्हणूनच की काय त्यांच्या यशस्वी जीवनात दोन स्त्रियांचा मोठा वाटा आहे. पूर्वायुष्यात रमाबाई आणि उत्तरायुष्यात मी.''

यासंदर्भात माईसाहेब एकदा माझ्याकडे असे म्हणाल्या होत्या की, 'गतस्मृतीत जाताना, साहेबांच्या तोंडून त्याचे वडील सुभेदार रामजीबाबा आणि रमाबाईंबद्दल बोलताना त्यांचा कंठ रुद्ध होऊन जायचा. डोळ्यांतून अश्रू वाहू लागायचे. रमाबाईंसाठी तर साहेब ढसढसून रडायचे. त्यावेळी रमाबाईंबद्दल माझा आदर दुणा व्हायचा. त्यांनी साहेबांवर केलेल्या निर्व्याज्य प्रेमाची खात्री पटायची पण त्यासोबतच साहेबांप्रती माझी त्यांना सांभाळून घ्यायची जबाबदारीही वाढायची.'

माईसाहेब म्हणायच्या, ''साहेब म्हणजे दुर्वासाचा दुसरा अवतार त्यामुळे त्यांची पत्नी होणे हे महान दिव्य होते. महापुरुषाच्या पत्नीला कोणकोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते हे सांगूनही इतरांना कळणार नाही. त्यात भरीस भर म्हणजे आम्हा दोघांमधील कमालीची असाधारण आणि तितकीच विलक्षण परिस्थिती होती. साहेब पडले तथाकथित अस्पृश्य समाजाचे आणि मी सवर्ण. त्यात



एम.बी.बी.एस. पदवी धारण केलेली. त्या काळात तोच चर्चेचा विषय झाला होता.''

माईसाहेब 'त्या' काळच्या गोष्टी बोलत असल्यातरी १९९० साली बाबासाहेबांना मरणोत्तर भारत पुरस्काराचा स्वीकारण्यासाठी माईसाहेबांसोबत आम्हाला राष्ट्रपती डॉ. आर.व्ही. रमण यांनी राष्ट्रपती भवनात चहापानासाठी बोलावले होते. त्यावेळी सौ. जानकी रमण माईसाहेबांना म्हणाल्या होत्या, 'मला अशा एका ब्राह्मणकन्येला पहायचे होते, जिने ऐन तारुण्यात डॉ. आंबेडकरांना आपला जीवनसाथी निवडले होते. त्यासाठी घरातल्या साडीतच मी तुम्हाला भेटायला आले आहे' म्हणजे अर्धशतकानंतरही बाबासाहेब व माईसाहेबांच्या लग्नाचा विषय कौतुकाचा होता.

माईसाहेब मात्र या लग्नाला समताधर्म संबोधायच्या आणि आश्चर्य म्हणजे त्यावेळी दोघांचे आदर्श तथागत बुद्धच होते, पण बाबासाहेबांच्या दृष्टीने हा विवाह त्यांनीच माईसाहेबांना लग्नापूर्वी एका पत्रात लिहिल्याप्रमाणे, 'एका जीवात्म्याने दुसऱ्या जीवात्म्यास पाहिले. एकमेकांनी समानशील ओळखले' आणि त्यांचे मनोमीलन झाले.

माझ्या दृष्टीने बाबासाहेबांचा व माईसाहेबांचा हा विवाह 'बोले तैसा चाले' या वचनाचा प्रत्यक्ष साक्षात्कार आहे. १९३७ साली बाबासाहेबांनी 'ॲनीहेलशन ऑफ कास्ट' हे पुस्तक लिहून त्यात जातिअंताचा संदेश दिला. आंतरजातीय विवाह मोठ्या प्रमाणात घडवून आणले तर एक काळ असा निर्माण होईल की या आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांमुळे कास्टलेस म्हणजे जातिविरहित समाज निर्माण होऊन ते एकमेकांच्या जातींचा द्वेष करायचे सोडून प्रेमाच्या अतूट बंधनातून इतर जातींचा द्वेष करायचे विसरून जातील, असा त्यांचा विश्वास होता. 'आधी केले मग सांगितले' उक्तीप्रमाणे बाबासाहेबांनी तसा एका ब्राह्मणकन्येशी विवाह करून समाजासमोर मोठा आदर्श ठेवला आहे.

माईसाहेब या नखशिखांत डॉक्टरांच्या सेवाभावी वृत्तीने बाबासाहेबांच्या जीवनात नदीने समुद्रात विलीन व्हावे तसे स्वत:चे अस्तित्व विसरून त्यांच्यात सामावून गेल्या होत्या. त्यांचं एकमेकांशी नातं असं होतं जसं प्रचंड वृक्षाचं नातं त्यावरील सालीशी असतं तसं, त्याचं नातं कसं होतं हे अधिक समर्पकपणे सांगायचं, तर शरीराचं जे नातं त्वचेशी असतं तसं त्यांचं एकमेकांशी घट्ट नातं होतं.

डॉ. मावळकरांनी बाबासाहेबांची सर्वतोपरी तपासणी करून त्यांना जी औषधं व गोळ्या लिहून दिल्या होत्या, त्या नियमितपणे, वेळच्या वेळी घेणे आवश्यक होते. ते समजावून सांगण्यासाठी साहेबांना माईसाहेबांनी त्यांच्या पत्नीला घेऊन येण्यास सांगितले होते, पण आपण विधुर आहोत असं सांगताच माईसाहेब डॉक्टरकीच्या पेशाला जागून सहज बोलून गेल्या की 'मी तुमच्यासोबत काही दिवस राहून तुम्हाला समजावून सांगेन म्हणजे अडचण येणार नाही.'

ही आठवण सांगताना माईसाहेब मला म्हणाल्या होत्या, 'अरे! मी असं बोलताच अंगावर पाल पडावी तसे साहेब शहारून म्हणाले होते, 'नाही, नाही, ते शक्य नाही. कारण तुमच्यासारखी रुपवती स्त्री माझ्या सोबत राहिली तर लोक काय म्हणतील?'

त्यातूनच मग साहेबांनी माईसाहेबांशी लग्न करण्याचा निश्चय पक्का केला. जवळच्या संबंधितांना त्यांनी तसे पत्र लिहून कळविले आणि १५ एप्रिल १९४८ रोजी ते रजिस्टर पद्धतीने लग्न करून विवाहबद्ध झाले. त्यावेळी माईसाहेबांचे वय होते ४३ वर्षे तर बाबासाहेबांचे वय होते ५७ वर्षे. माईसाहेबांचा संसार आधी सांगितल्याप्रमाणे ८-९ वर्षांचा पण बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्या जगल्या तब्बल सेहेचाळीस वर्षे. ही सेहेचाळीस वर्षे त्यांचे जगणे म्हणजे घायाळ हरिणीसारखे होते. दु:ख आहे ते त्याचे!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी व जॅकलीन केनेडी हे आदर्श जोडपे. पण केनेडीसाहेबांच्या निधनानंतर जॅकलीनने बड्या उद्योगपतीशी लग्न करण्यात धन्यता मानली, पण माईसाहेबांचं मोठेपण एवढे की, त्या अखेरपर्यंत बाबासाहेबांच्या नावासोबतच जगल्या.

त्यांच्या जगण्याला उपमा द्यायची तर कार्नेशच्या पांढऱ्याशुभ्र फुलाचीच देता येईल. अमेरिकेत सर्वत्र आढळणारे हे शांततेचं प्रतीक असलेलं फूल. प्रेमाचं प्रतीक म्हणून ओळखलं जातं. ते इतर फुलांसारखंच कोमेजतं पण त्यांच्या पाकळ्या गळून पडत नाही. ते अखेर पाकळ्यांसह मातीत मिसळतं. अक्षरश: माईसाहेबांसारखंच!


**– सुहास सोनावणे**

भ्रमणध्वनी : ९९२०८०१६०२

ग्रंथाली

**बी.जी. वाघ**

**मानवी संस्कृतीचा अर्थ**




**मूल्य २२५ रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

मुख्य उद्देश आहे तो अनिश्चित अव्यवस्थेकडून सुनिश्चित व्यवस्थेकडे जाण्याचा. श्रद्धा चांगली किंवा वाईट हे तिच्या परिणामावरून ठरते. श्रद्धेमुळेही बदल होतात; परंतु खरा बदल होतो तो शिक्षणामुळेच. वस्तुस्थितीमागील कारणे जाणणे आणि वस्तुनिष्ठ, सकारात्मक, सुनियोजित बदल घडवून आणणे चांगल्या शिक्षणामुळेच शक्य होते. परंतु शिक्षण सामाजिक पूर्वग्रहांवर व विद्वेषावर उभे असेल तर त्यामुळे समाजात सकारात्मक बदल होणार नाहीत. स्वत:ला शोधत जाणे, खोदत जाणे निसर्गाने दिलेल्या आपल्या अमूल्य हृदयाच्या हाका ऐकत दिशेचा शोध घेणे म्हणजे सत्याकडे जाणे होय.
आपल्या स्वातंत्र्याचा शोध हा सत्याचाच शोध असतो.



# बंडखोर वादळी व्यक्तिमत्व कृष्णा सोबती

संजीवनी खेर

**सर्व दडपणे झुगारून लेखकाने आपली भूमिका मांडली पाहिजे असे मानून आयुष्यभर ठामपणे लिहीत राहणाऱ्या कृष्णा सोबती काळाच्या पडद्याआड गेल्या. त्यांचे हे अविस्मरणीय शब्दचित्र!**



कृष्णा सोबती ह्या जबरदस्त ऊर्जेच्या हिंदी लेखिकेचे ९३ वर्षांच्या पक्व वयात २५ जानेवारी २०१९ रोजी दिल्लीत निधन झाले. (ह्या फेब्रुवारी महिन्यात त्या ९४ वर्षांच्या झाल्या असत्या.) एक निर्भीड, बेडर लेखिका आपल्यातून गेली, पण त्या, त्यांचे विचार, साहित्य त्यांच्या पुस्तकांतून आणि त्यांच्या यू ट्यूबवरील मुलाखतीतून नेहमीच भेटत राहील. त्यांच्या भाषेत हिंदीसह, पंजाबी, उर्दू शब्दांचा भरणा असे. त्यांच्या मते हिंदी ही फारच मवाळ भाषा आहे. चक्क शाकाहारी. त्या भाषेला पंजाबी तडका दिल्याखेरीज मला जे सांगायचेय ते सांगताच येणार नाही सामान्यांच्या जगण्याची खुमारी लेखनात येणार नाही. कृष्णा सोबती ह्या नावाचा दरारा हिंदी साहित्य जगतात होता नि राहील. त्या काळातील मान्यवरांनी कृष्णाजींच्या भाषेची टिंगल केली पण कृष्णाजींनी आपला खाक्या सोडला नाही.

१८ फेब्रुवारी १९२५ला तेव्हाच्या पकिस्तानातील गुजरातमध्ये कृष्णा सोबतींचा जन्म झाला. वडील ब्रिटिश सरकारात उच्चाधिकारी, बदलीची नोकरी, त्यामुळे प्राथमिक शिक्षण उत्तर भारतातील अनेक शहरात झाले. त्यांची आई त्या काळात भरधाव घोडेस्वारी करायची. कुणाही नाठाळ घोड्याला वठणीवर आणायचे तर तिला हाक मारली जायची. कृष्णाजींचे कॉलेज मात्र लाहोरमधील. तेव्हा लाहोर हे सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत श्रेष्ठ मानले जाई. त्या काळात दिल्ली हे त्यामानाने लहान नि कमी महत्त्वाचे शहर होते. त्या काळातील प्रसिद्ध लेखक-लेखिकाही लाहोर कॉलेज-फतेहसिंग कॉलेजचे विद्यार्थी होते. तेजी बच्चन, निर्मल वर्मा इत्यादी. तेथील वातावरण सृजनशील कलांसाठी उपयुक्त होते. सिमला, दिल्ली येथेही त्या काही काळ राहिल्या, शिकल्या होत्या. तेव्हाही विद्यार्थी आंदोलनात इतर लेखनकर्मींसह त्या भाग घेत असत. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा हा दृष्टिकोन शेवटपर्यंत कायम होता. लेखन हेच त्याचे जीवनसर्वस्व होते. त्यांनी आयुष्यात खूप उशिरा विवाह केला. त्यांचे पती शिवनाथ 'साहित्य अकादमी'चे पारितोषक विजेते होते. त्या दोघांचा मोठा मित्र परिवार होता. त्यांचे चाहते खूप होते पण विवाह, मुलं हे फारसं मानवणारं नव्हतं. पतीच्या निधनानंतर त्या दिल्लीत एकट्याच राहत असत. आपल्यानंतर आपले राहते घर, आपला प्रचंड ग्रंथसंग्रह त्यांनी नवोदित लेखकांना उपयोगी पडावा म्हणून दान केला. आपले घर हे सृजनशीलांकरता निवारा ठरावे म्हणून ठेवले आहे. त्या म्हणत, ''मी शेकडो सूर्यास्त पाहिलेत. चार पिढ्या वाढताना पाहिल्यात. शेकडो सूर्यास्त पाहिलेत पण सूर्योदय मात्र फारच कमी पाहिलेत कारण मी खूप उशिरा उठते. दुपारी बारा वाजता माझा दिवस सुरू होतो. रात्रीची शांतता मला फार आवडते.'' त्यांना खाण्याची, खाऊ घालायची खूप आवड होती. जेवणाचे टेबल अनेक पदार्थांनी भरलेले असे. स्वत: थोडेसेच खात पण येणारे जाणारेच त्याचा आस्वाद घेत.

अगदी मागच्या वर्षीपर्यंत त्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत असत. अस्खलित शब्दात, धारदार आवाजात आपली निर्भीड मते मांडत असत. मागच्या वर्षीच्याच एका साहित्यिक सभेत त्यांनी लेखकांच्या नि विचारवंतांच्या अभिव्यक्तीवर येणाऱ्या बंधनांचा तीव्र शब्दात निषेध केला होता. 'येथील सामान्य लोकांच्या मनात देशप्रेम पुरेपूर भरलेले आहे ते कुणी आम्हाला शिकवायची गरज नाही' असे सत्ताधीशांना ठणकावून सांगण्याचा बाणा शेवटपर्यंत कायम होता. पण लेखन हेच जीवन सर्वस्व होते.

वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांना ज्ञानपीठ हा साहित्यातील सर्वोच्च सन्मान (२०१७) मिळाला होता. अनेक सन्मान त्यांना मिळाले होते. जसे कथा चुडामणी, जीवनगौरव पुरस्कार, व्यास


सन्मान इत्यादी. 'ए लडकी', 'डार से बिछडी', 'यारों के यार', 'तीन पहाड', 'बादलों के घेरे मे', 'दादी अम्मा', 'समय सरगम' (वृद्धांच्या अवस्थेवरील कादंबरी) 'सिक्का बदल गया', 'दिलो दानिश' इत्यादी लेखनाने त्यांचे नाव भारतीय साहित्यात अमर झाले आहे. लाहोर आणि सिमला येथील सांस्कृतिक वातावरणाबद्दल त्यांनी फार आत्मीयतेने लिहिले आहे.

त्यांच्या लेखनाचे वैविध्य लघुकथा, व्यक्तिचित्र, कादंबरी, निबंध असे आहे. त्यांची शेवटची कादंबरी, 'गुजरात पाकिस्तान से गुजरात हिंदोस्तान' ही बृहद् कादंबरी फाळणीची वेदना मुखर करते. ''वास्तविक ही कादंबरी माझी पहिली असायला हवी होती पण ती अखेरच्या वळणावर लिहिलीय. त्यात माझं जीवन प्रतिबिंबित होतंय, पण तशी तर लेखकाच्या प्रत्येक लेखनातून त्याची लेखनाची गुंतागुंत दिसत असतेच. लेखकाच्या आतले नि बाहेरचे त्यात येत असते. त्याच्या जीवनातली कोणती घटना त्यात कधी शिरकाव करेल हे त्याचे त्यालाही कळत नसते. आपले काय नि परके काय सगळेच जीवानुभव त्याला लिहायला प्रवृत्त करत असतात. ही एक वैचारिक आणि सृजनात्मक प्रक्रिया असते.

त्यांचे पहिले लिखाण (१९५९) त्याकाळातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या एका प्रकाशनगृहाने स्वीकारले. त्यांना जेव्हा दुरुस्त्यांसाठी प्रेस कॉपी मिळाली तेव्हा लक्षात आले की प्रकाशकाने त्यांचे अनेक शब्द बदलून संस्कृत शब्द वापरले होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की असे चालणार नाही. प्रकाशकही बधेनात. कृष्णाजींनी प्रुफं आपल्याच ताब्यात ठेवली, पण प्रकाशकाने पुस्तकावर बराच खर्च केला होता, त्यामुळे तो कुरकुरु लागला. कृष्णाजींनी त्याला तडक पैसे पाठवून दिले. ''तुम्ही माझ्या लेखनाशी जी छेडछाड केलीय त्यामुळे माझ्या पात्रांच्या जगण्याची भाषा नाहीशी झालीय मला हे मंजूर नाही.'' असे त्यांनी त्याला कळवले. आपलं लेखन आपल्याला हवं तसंच प्रकाशित व्हायला हवं हा हट्ट पहिल्या पुस्तकापासूनच चालवला. आपण आपल्या हाताने आपलं लिखाण दफन केलंय असं म्हणून ते ठेवून दिलं.

बरीच वर्षे हे लिखाण पडून होते. पुढे ते 'जिंदगीनामा' ह्या नावाने १९७९मध्ये प्रकाशित झाले नि १९८० साली त्या लेखनाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला. (आपल्या लेखनाच्या कसदारपणावर त्यांचा किती विश्वास होता हे पटते.) त्यांनी नेहमीच आपल्याला पटेल तेच वक्तव्य केले. कुणाची तळी उचलून घरली नाही. सरकारचा धर्म, जाती यांबाबतचा अनुदार दृष्टिकोन पाहून त्यांनी आपले पुरस्कार निषेधार्थ परत केले. सरकारने दिलेले 'पद्मभूषण' नाकारले. ह्यासाठी मोठे धैर्य लागते. वयाची नव्वदी उलटल्यावरही त्या साहित्यिक समारंभात जायच्या नि आपल्या खणखणीत आवाजात आपला निषेध नोंदवायच्या, आपल्या सर्वसमावेशक संस्कृतीचे महत्त्व सांगायच्या नि साहित्यिकांनी दडपणाविरुद्ध लेखणी वापरावी असे आवाहन करायच्या.

त्यांनी आपली एकत्र कुटुंबव्यवस्था स्त्रीच्या कुचंबणेला कशी कारणीभूत आहे, परंपरा जतनाच्या नावाखाली जी गळचेपी होते




त्याविरुद्ध लेखनातून जोरकस आवाज उठवला. 'मित्रो मरजानी' ही १९६६सालची त्यांची कादंबरी. त्यात ती आपल्या नपुंसक नवऱ्याविरुद्ध सासूकडे तक्रार करते. तिचे लैंगिक सुखाचे आकर्षण स्वाभाविक असते. असे पुरुषाबाबत असेल तर त्याला इतर स्त्रियांकडे जाण्याचा मार्ग मोकळा असतो. त्याबद्दल घरच्यांना वा बाहेरच्यांना काही अनुचित वाटते नाही, पण स्त्री ह्या नैसर्गिक भुकेबद्दल बोलली तरी ती स्वैरिणी ठरते. ह्याबद्दल मित्रो-सुमित्रावंती, आपले मत आपली सासू आणि जावेकडे व्यक्त करते. एकत्र कुटुंबात स्त्रीला आपल्या मताप्रमाणे बोलता येत नाही. एका बाजूने सुरक्षितता हा मोठा फायदा ह्या कुटुंबव्यवस्थेत असला तरी स्वातंत्र्य मात्र तडजोडीत बळी जाते.

जेव्हा स्त्री एकत्र कुटुंबातील आपली संस्कृतीने लादलेली कर्तव्ये पार पाडण्यातच धन्यता समजत होती, तेव्हा तिच्या मनावर तेच ठसवले गेले होते. तेव्हा कृष्णाजींची नायिका स्वत:च्या लैंगिक इच्छांबद्दल बोलते ही कल्पनाही करता येत नाही. पारिवारिक सुखाच्या गोड-गोड गोष्टी लिहून त्यांना कीर्ती मिळवता आली असती पण त्यांनी स्त्रीच्या अंर्तमनाचा वेध घेऊन त्याचे चित्रण केले. साल १९६६! काय गदारोळ झाला असेल, आपण अंदाज लावू शकतो. शारीरिक सुखाची अपेक्षा फक्त पुरुषालाच असते असा आपल्या समाजात ठाम समज असतो. पंजाबमधील एका गावातील तीन मुलगे, सासूसासरे, सुना असलेले हे कुटुंब! बाईनं जे पदरी पडलं ते गोड मानून निमूटपणे जगावं. घर, संसार, घरातली माणसं, कामंधामं ह्यात मन रमवावं अशी अपेक्षा, पण एकत्र कुटुंबातल्या घुसमटीनं जीव कावराबावरा झालेली मित्रो आपल्या सासूकडे, जावेकडे आपला पती नपुंसक असल्याची नि त्याला आपल्या तनमनाची भाषा कशी कळत नाही ह्याचा खेद व्यक्त करते. पतीच्या बीजाचे मूल औरस नि दुसऱ्याकडून झालेलं अनौरस असं का? असा प्रश्नही बेधडक उपस्थित करते.

ह्या कादंबरीत लेखिका कुठलेही उत्तर वा पळवाट दाखवत नाही. अस्वस्थ करणारी ठसठस वाचकांच्या मनात राहते. असं कोरडं वैवाहिक जीवन वाट्याला आलेली ही तरुणी तिची आई

जेव्हा, ''ह्यावर वेगळाच उपाय शोधूया' म्हणते त्याला ती नकार देते. ह्या कादंबरीचा सविस्तर उल्लेख ह्यासाठी केला की स्त्रीच्या शारीरिक सुखाबद्दल लिहिल्याने तिला स्त्रीवादी लेखिका म्हटलं गेलं पण कृष्णाजींनी ते नाकारलं. 'मी स्त्रीपुरुषांच्या वेदनांचा, भावभावनांचा वेध घेते. त्यात लिंगभेद करत नाही.' असे त्या म्हणाल्या.

'हम हशमत' ह्या संस्मरणात्मक लेखनात साहित्यिक वातावरणाचे नि साहित्यिकांचे चित्रण नेमकेपणाने येते. आजवरच्या लेखनात त्यांना डाचणारा मुद्दा होता नि आहे तो म्हणजे बदलत्या मूल्यांचा, माणूसपण गमावण्याचा! या विषयी त्या पोटतिडिकेने लिहितात. फाळणीचा काळ हा अत्यंत दुःखाचा, वेदनेचा होता, प्रचंड अविश्वास, घृणा, हिंसा यांनी भरलेला तो काळ होता, आठवणीही नकोशा होतात पण देश म्हणून आपण त्यातूनही तरलो, देश उभारला. पण आता आपल्याच माणसात जो द्वेषाग्नी पेटवला जातो आहे, तो आपल्याला विनाशाकडे घेऊन जाईल अशी भीती त्या व्यक्त करत.

आपल्या संस्कृतीत अर्धनारीनटेश्वरची सुंदर व्यक्तिविशेष संकल्पना आहे. काळ, घटना, ज्यात दोन्ही तत्वं-स्त्री-पुरुष- एकत्र येतात. तेच कृष्णाजींच्या लेखनाचे मर्म आहे.त्यांनी जेव्हा 'हशमत' ह्या नावाने प्रदीर्घ लेखन केले तेव्हा ह्या पुरुषी नावाने त्यांना वेगळी नजर दिली होती. या शब्दाचा अर्थ गौरव, मोठेपण असा आहे. 'मित्रो मरजानी'मधील नायिका जेव्हा आपली वक्षस्थळं उघडी करून पाहते तेव्हा ते पाहणं पुरुषी पण असतं नि स्त्रीचं देखील असतं . दोन्ही गोष्टी त्यात समावलेल्या असतात. त्यामुळे त्यांना लेखिका म्हणून आपण वेगळ्या आहोत असे वाटत नसे. साहित्यिक पुरुषही स्त्रीचा दृष्टिकोन मांडू शकतो. 'हशमत आणि मी' असाही संवाद त्यांनी प्रकट केला होता. 'मी लपवते, तो उघड करतो, मी पारंपरिक तर तो आधुनिक विचारांचा आहे.' असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी त्यांच्या तीन सह लेखकांबद्दल खास करून, भीष्म साहनी, अशोक वाजपेयी, नामवर सिंग यांविषयी खूप आत्मीयतेने लिहिलंय. एका अचानक नाहीशा झालेल्या लेखकामुळे मनाला लागलेली हुरहुर, अत्यंत हळुवारपणे मांडली आहे. ९३ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी जे पाहिलंय अनुभवलंय त्याचा परिपाक त्यांच्या लेखनात आहे. त्यांच्या मते, 'लेखन ही गुंतागुंतीची प्रक्रिया असते. त्यात भाषा, भावना नि आत्मा जणू समोरासमोर असतात. स्वतःशीच सामना असतो. पात्रांच्या भावना, त्यांच्या जीवनातल्या घटना, त्रास, संकटं, प्रेम हे लेखणीतून उतरवायचं असतं. तुम्ही जणू दुसरी व्यक्तीचं होत हे अनुभवता; पण तरी लेखिका म्हणून वेगळ्या असताच. एक प्रकारचा ताण या व्यक्तिमत्वांचा असतो. त्या पात्रांची भाषा, वातावरण तुम्ही निर्माण करीत असता. ती तुम्हाला घेरून असतात.'


स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकातील हिंदीतील साहित्य हे वेगळ्याच मुशीतून निघालं होतं. हवेत मोकळेपणा होता, नवा समाज निर्माण करायची इच्छा, उमेद होती, लेखनासाठी दाही दिशा खुल्या होत्या, त्यामुळ लेखनात अनेक प्रयोग झाले. त्यांनी लिहिलेली निसर्गवर्णनेही वाचकाला बांधून ठेवतात. काश्मीरच्या सीमेवरचे त्यांचे गाव, लडाख यांची वर्णनं, त्यात त्यांना येत असलेला एक प्रकारचा आध्यात्मिक अनुभव, संस्कृती, भाषा, आपले लोक यांविषयी असलेलं प्रगाढ प्रेम त्यांच्या लेखनाला बळ देत असे.

**– संजीवनी खेर**
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२, २४१४१६६९
sanjeevanikher@gmail.com

॥ग्रंथाली॥

# अनवट निवडक गोखले

(जन्मशताब्दीनिमित्त सिद्ध केलेला ग्रंथ)




लेखन/संपादन
**नीला वसंत उपाध्ये**

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

अरविंद गोखले यांनी त्यांच्या कथेत भावनांचं उदात्तीकरण करणं टाळलंय. त्यांच्या कथेतील पात्रं आपल्याला भावनाविवश न करता, कथाबीजाशी निगडीत सत्य सांगत राहतात. भारतीय वाचकाला आणि प्रेक्षकाला भावविवशता आवडते. त्याला रडायचा आवडतं. पण तरीही अरविंद गोखले ही वाचकशरणता टाळतात. तरीसुद्धा वाचकांना त्यांच्या कथा आवडतात. 'मांसाचा गोळा' ही कथा स्वमतावर ठाम आणि धाडसी लेखकाचे एक अप्रतिम उदाहरण आहे. माझ्या या आवडत्या कथाकाराला नव्या पिढीतल्या आम्हा कथाकारांच्या वतीने जन्मशताब्दीनिमित्त मानवंदना!



# माणसाच्या अस्सलपणाचा शोध हीच प्रेरणा...

**डॉ. प्रज्ञा दया पवार**



> **माझ्या कवितेचा आशय जरी बव्हंशी स्त्रीची, चेहरा हरवलेल्या-चेहरा शोधणाऱ्या, त्यासाठी झुंजणाऱ्या स्त्रीशी जोडलेला असला तरी असं मला वाटत नाही की मी बाईची कविता लिहिते. स्त्री हे विषम व्यवस्थेचं एक प्रतिरूप म्हणून माझ्या कवितेत येतं.**



**मी** लिहिती झाले तो काळ मोठा रम्य होता. पण तो अशा अर्थाने की चळवळी जिवंत होत्या, टोकदार होत्या. दलित पँथर्सपासून ते नामांतर लढा, मागोवा-युक्रांद, स्त्रीमुक्तीपर्यंतच्या. त्याचा परिणाम म्हणजे कविता ही गंभीरपणेच घेण्याची बाब आहे हे मी शिकले. कविता आपोआप एका व्यापक विधानाकडे जाऊ लागली. माझा प्रकृतीधर्मही खाजगी-सार्वजनिक अशी जी पाचर मारली गेली आहे तिच्यातील अंतर्विरोध शोधण्याचाच होता.

दया पवार नावाच्या लेखक-कवी-कार्यकर्त्याच्या पोटी जन्म घेणं ही गोष्ट कुठल्याही स्थावर जंगम मालमत्तेपेक्षाही एक मौलिक ऐवज ठरला माझ्यासाठी. घरी येणारे लेखक, विचारवंत, कार्यकर्ते, नाट्यसिनेमाशी निगडित असलेले कलावंत, विविध क्षेत्रात काम करणारी अठरापगड माणसं, त्यांच्याशी होणाऱ्या दादांच्या गप्पा, चर्चा, वादविवाद यातून माझी समज आकार घेत गेली. शोषणाची जाणीव झाली पण त्याला लेखणीनं भिडता येतं हेही जाणवलं. शिवाय घरात पुस्तकांच्याच असलेल्या भिंती! गजानन माधव मुक्तिबोध, राजकमल चौधरी, अज्ञेय, इस्मत चुगताई, हरिशंकर परसाई, मंटो, विनोदकुमार शुक्ल, कमलेश्वर, महाश्वेता देवी, धूमिल, करतुल ऐन हैदर, श्रीकांत वर्मा, विष्णू खरे, साहिर लुधियानवी, जॉ निसार अख्तर, फैज, पाश, अमृता प्रीतम, सुकांत भट्टाचार्य, मायकोव्हस्की, बर्टोल्ट ब्रेख्त, हो चि मिन्ह, ऑक्टेव्हियो पाझ, पाब्लो नेरूदा यांनी माझ्या जाणिवांना व्यापकत्व दिलं आहे.

मी ज्या मराठी काव्यपरंपरेत लिहिते त्याच्याशी माझं निश्चितच नातं आहे असं मी मानते. मराठी साहित्याशी होड घेऊ पाहणाऱ्या दलित साहित्याने, दलित कवितेच्या सशक्त प्रवाहाने व्यक्तिलक्ष्यी, समूहलक्ष्यी, सौंदर्यलक्ष्यी या विभाजनाला मुळातूनच काही प्रश्न विचारले ते मला महत्त्वाचे वाटले. विचारप्रधानता आणि


---

ठाणे व मुंबई परिसरातील आंबेडकरी साहित्य चळवळीतील कवयित्रींचा एक प्रातिनिधिक काव्यसंग्रह नुकताच प्रा. आशालता कांबळे यांच्या 'प्रभा प्रकाशन'ने प्रकाशित केला आहे. टंकलेखन, मुखपृष्ठ, प्रकाशन अशा सर्वच जबाबदाऱ्या निभावून स्त्रियांनी केलेले हे काम नक्कीच दखलपात्र आहे. प्रज्ञा दया पवार, हिरा बनसोडे, छाया कोरेगावकर, उषा अंभोरे, शारदा नवले, उर्मिला पवार, वर्षा भिसे, अभिनया रमेश, हिरा पवार, लता इंगळे, शकुंतला रोकडे, दीपा राजवर्धन, स्मिता नगरकर, विद्या भोरजारे, श्यामल गरुड, संजीवनी राजगुरु, कविता मोरवणकर, आशालता कांबळे अशा १९ कवयित्रींची कविता या संग्रहातून आपल्यासमोर येते. किंबहुना आंबेडकरी स्त्रीकवितेचा हा कोशच म्हणायला हवा.

या कवितांची निवड व संपादन उषा अंभोरे आणि शारदा नवले यांनी केले आहे. आंबेडकरी विचारधारा आणि मानवमुक्तीच्या लढ्यातील सक्रिय सहभाग हा या सर्व कवयित्रींना जोडणारा धागा आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीच्या आणि इथल्या वर्णीय संस्कृतीच्या चक्राला धक्का देण्याचा वसा घेऊन लिहित्या झालेल्या आणि आंबेडकरी मूल्यांवर ठाम विश्वास असणाऱ्या या कवयित्रींच्या संपादनाचे वाचकांनी मनापासून स्वागत करायला हवे.

या संपादनातील डॉ. प्रज्ञा दया पवार यांच्या मनोगतातील हा निवडक अंश.



भावसंपृक्तता यांचा एकात्म संयोग, मी हा नेहमी आम्हीमध्ये विलीन होणं, सामूहिकतेचं भक्कम अधिष्ठान, नवी सामाजिक-सांस्कृतिक अन्वेषणदृष्टी, विचारप्रणालींशी असलेलं अभिन्नत्व आणि मानव्य, समता यावर आधारित नातेसंबंधांचं स्वप्न पाहणं आणि त्याचा आग्रह धरणं अशा कितीतरी सुंदर गोष्टी मला दलित कवितेनेच दिल्या. अतिशय ग्लोरियस असा हा भूतकाळ आहे. आज माझी कविता राजकीयतेकडे झुकते त्याचं कारण हेच असावं की तिचा पाया बाबुराव बागुल, दया पवार, नामदेव ढसाळ यांचे संस्कार पचवून उभा राहिला. माझ्या कितीतरी कवितांमधून व्यक्तिलक्ष्यीत्व व समूहलक्ष्यीत्व यांची एकमेकांत फारकत न होणारी विलक्षण सरमिसळ आढळते. किंबहुना माझ्या बहुतांश कवितेत कवितागत निवेदक मी आहे, पण त्याचा एक अक्ष कायम समूहावरच केंद्रित झालेला आहे. माझ्या कवितेला स्त्रीवादी, दलित स्त्रीवादी, दलित बहुजन स्त्रीवादी अशी अनेक बिरूदे लागलेली आहेत आणि ती मला यामुळेच अजिबात त्रासदायक वाटत नाहीत.

ज्या काळात दलित कविता अवतरली त्या काळात बा.सी. मर्ढेकर, पु.शि. रेगे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध या तीन मुख्य कवींच्या छायेत तत्कालीन मराठी कविता लिहिली जात होती. ऱ्हासशील रोमँटिक कवितेचे संकेत मोडून मर्ढेकरांनी मराठी कविता खऱ्या अर्थाने आधुनिक केली. मुक्तिबोधदेखील आधीच्या रोमँटिक परंपरेला शह देऊन सामाजिक बांधिलकीची राजकीय कविता लिहू पाहात होते. तर पु.शि. रेगे यांनी रोमँटिक कवितेच्या परंपरेचे सशक्तपणे पुनरुज्जीवन केलेले दिसते. विंदा करंदीकर आणि विशेषत: नारायण सुर्व्यांच्या मार्क्सवादी धारणेने हा आधुनिकतेचा प्रवाह अधिकच बळकट झाला आणि याच भूमिकेतून मला डॉ. भालचंद्र नेमाडे, अरुण कोलटकर, वसंत आबाजी डहाके, तुळशी परब, प्रकाश जाधव, सतीश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, अरुणचंद्र गवळी महत्त्वाचे वाटतात. तर स्त्री कवयित्रींमध्ये संत कवयित्री जनाबाई, सोयरा ते पुढच्या काळात बहिणाबाई चौधरी आणि ज्यांनी खऱ्या अर्थाने स्त्रियांची कविता आधुनिकतेला नेऊन भिडवली त्या प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, रजनी परुळेकर आणि मलिका अमरशेख यांची कविता मला विशेष महत्त्वाची वाटते. 'अंत:स्थ' हा माझा कवितासंग्रह १९९३ मध्ये प्रसिद्ध झाला आणि २०१३ मध्ये 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' हा पाचवा कवितासंग्रह. म्हणजे अंत:स्थ प्रकाशित व्हायच्या आधी किमान काही वर्षे मी लिहू लागले असं गृहित धरलं तर जवळजवळ पाव शतकाएवढा दीर्घ काळ मी सातत्याने कविता लिहितेय. माझ्या कवितांचे आजवर हिंदी, तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, उर्दू, पहाडी, गुजराथी, बंगाली, इंग्रजी आणि रशियन भाषेत अनुवाद झाले आहेत. गौरी देशपांडे, अशोक शहाणे यासारख्या दिग्गजांनी माझ्या कविता मराठीतून इंग्रजीत नेल्या आहेत. याच काळात मी गद्यलेखनही केलं. नाटक, कथा, ललित गद्य, आणि थोडंबहुत समीक्षापर लेखन अशा निरनिराळ्या पद्धतींनं. कवितेशिवाय मी व्यक्त होत असलेल्या इतर साहित्यप्रकारांचा आणि कवितेचा संबंध असला तर तो इतकाच आहे की, मी कवितेकडून कथा आणि नाटकाकडे वळले. काही आशयसूत्रे दीर्घ, पल्लेदार आणि अधिक मोठ्या अवकाशाची मागणी करणारे आहेत असं कविता लिहिता लिहिता कवितेतूनच मला उमगलं आणि मग मी सावकाश इतक्या काळानंतर कथेकडे, नाटकाकडे वळले. असं असलं तरी मूलत: कवी असणं हे मला स्वत:च्या नजरेत सगळ्यात आवडणारं आहे.

जगताना आपल्याला अनेक प्रश्न पडतात. नेमकी उत्तरे शोधण्यासाठी उत्तरांचे वेगवेगळे पर्याय उभे करत असतो. तसं करताना रूढ, प्रचलित पण मुळातच अपुरे असणारे पर्याय सोडून कोणते नवनवे मार्ग असू शकतात अशी एक प्रक्रिया विचारांच्या आणि कृतीच्या अशा दुहेरी स्तरावर चाललेली असते. तसंच या प्रश्नाचं स्वरूपदेखील गुंतागुंतीचं, अंतर्विरोधात्मक असतं. ते व्यक्तिगत तसेच समष्टीशी देखील अभिन्नपणे जोडलेले असतात. कारण मुळात व्यक्तीपण हीच गोष्ट स्वायत्त, सुटी नसते, ती एक रचना असते आणि तिचं रचितपण सामाजिकतेतून साकार झालेलं असतं. उदाहरण म्हणून बाईबाबत हे आपल्याला स्पष्टपणे पाहता येईल. बाई जे वागते, तिला जे वागावंसं वाटतं आणि बाई म्हणून तिनं जे वागायला हवं याचा सारखा ताळमेळ घातला जात असतो. समाजाकडून आणि परिणामस्वरूपी तिच्याकडूनही. त्यामुळे माणसाचा अस्सलपणा आणि व्यवस्थेतला रचितपणा यांच्यातील परस्परांसंबंधांचा शोध मी माझ्या सगळ्याच लेखनातून घेत आले आहे. माझ्या कवितेची मूळ प्रेरणा म्हणायचीच झाली तर ती आहे, माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेणं.

माझ्या कवितेचा आशय जरी बव्हंशी स्त्रीची, चेहरा हरवलेल्या-चेहरा शोधणाऱ्या, त्यासाठी झुंजणाऱ्या स्त्रीशी जोडलेला असला तरी असं मला वाटत नाही की मी बाईची कविता लिहिते. स्त्री हे विषम व्यवस्थेचं एक प्रतिरूप म्हणून माझ्या कवितेत येतं. ते एक अँकरेज असतं असं म्हणता येईल. बाईच्या अनुषंगाने येणाऱ्या तिच्या जगण्याचा, स्त्री-पुरुष नातेसंबंधांचा व एकूण मानवी नातेसंबंधाचा उभा-आडवा पट पाहत असताना त्यातली मानुषता मात्र हरवलेली, ठायी ठायी विरुप झालेली दिसते. या विरुपतेमध्ये लिंगभेदजन्य विषमतेबरोबरच जातवर्गवास्तव, त्याचबरोबरच जागतिकीकरणातून येणारं कंगालीकरण, बाजारशरणता आणि व्यक्तीशिवायची बाकीची सर्व मानवी एकक दुय्यम ठरवत जाणं या बाबी कळीच्या भूमिका बजावत असतात. या भूमिकांचा शोध घेणं, अर्थनिर्णयन करणं आणि त्यांच्याविरोधात हस्तक्षेप करणं हे कवितेचं काम आहे असं मी मानते. या अर्थानं कविता ही एक कृती करणं आहे असं मला वाटतं.

**– प्रज्ञा दया पवार**
pradnyadpawar@gmail.com



# मी नाही जगू शकत कवितेशिवाय....


**छाया कोरेगावकर**

> **जशी त्वचा शरीरापासून वेगळी करता येत नाही तशीच कविता माझ्यापासून! कविता माझी सखी आहे, प्रेमाने कुशीत घेणारी माय आहे आणि मिठीत आश्वस्त करणारा प्रियकरही!**

**मी** का लिहिते? जितकं सोपं तेवढंच अवघड आहे या प्रश्नाचं उत्तर! वारा वाहतो, फुलं उमलतात यामागचा जसा काही कार्यकारणभाव सांगता येणार नाही तसंच काहीसं माझ्या लिहिण्याबद्दल! माणूस हा जगाच्या पाठीवर एकमेव असा प्राणी आहे. ज्याला भाषा अवगत आहे. भाषेच्या माध्यमातून तो आपल्या भावनिक गरजांची देवाण-घेवाण करू शकतो. राग, लोभ, मत्सर सर्वच प्रकारच्या भावनांना वाट करून देऊ शकतो. मला नेहमी असं वाटत राहिलंय की मला स्वत:ला कुणीतरी आरपार समजून घ्यावं! मित्र-आप्तेष्ट, सगेसोयरे नाही पुरेसे वाटले मला. मग मी रोजनिशी लिहायला सुरुवात केली. अगदी कोवळ्या वयातच. माझी प्रेमाची भूक प्रचंड. या भुकेने मला लिहिण्यास अधिक प्रवृत्त केले.

मी वैचारिक लेख, प्रासंगिक लेख, पुस्तक परीक्षण, कथा असं चौफेर लेखन केलं पण माझा जीव कवितेतच जास्त रमतो. हे वास्तव माझ्या लक्षात आल्यावर मी कवितेवरच लक्ष केंद्रित केलं. पहिली कविता मी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिली. म्हणजे ज्या वयात स्त्रीला बाईपणाची चाहूल लागते, तिच्या अस्तित्वाला बाईपणाचे कोंब फुटू लागतात. त्या काळात मी लिहायला सुरुवात केली याचा दुसरा अर्थ असा की माझी कविता ही थेट बाईपणाशी नातं सांगते. तिच्या अंतर्बाह्य भावविश्वाचा पसारा शब्दांतून मांडते.

तसं पाहिलं तर लेखनाचा कोणताच वारसा मला घरातून मिळाला नाही. आई अर्धशिक्षित गृहिणी तर वडील सरकारी अधिकारी. त्यांच्याकडून कधीच प्रोत्साहन मिळालं नाही. मात्र आई खूप वाचायची. तिने मला वाचनाची आवड लावली. तसंच तिला हिंदी जुन्या गाण्यांची खूप आवड होती. सिलोन रेडिओवर तिच्याबरोबर मी लहानपणापासून शमशाद, सुरैय्या, नूरजहाँ, खुर्शीद यांना ऐकत आले. त्या गाण्यांचा माझ्या काव्यलेखनावर विशेष प्रभाव आहे म्हणजे असं की हिंदी गाण्यातले शब्द, त्यातली व्याकुळता गायिकेच्या आवाजातली आर्तता ह्यामुळे माझ्या कोवळ्या मनात काहीतरी हलत रहायचं. त्यातूनच सुरुवातीपासूनच मी प्रेमकविता लिहायला सुरुवात केली.




या सर्व कविता प्रेमभावनेने भारलेल्या होत्या. म्हणजे गंमत अशी की विरहाची झळ न सोसताही मी अनेक विरहगीतं लिहिली माझ्यासाठी कविता हे आत्माविष्काराचं साधन आणि माध्यम ठरलं. बहुतांशी कविता या वेदनेपोटी जन्माला आलेल्या आहेत. त्यामुळे माझ्या कविता ह्या वेदनेचा हुंकार आहेत. प्रेमभावनेने भारलेल्या या अवस्थेत माझे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. एक 'आकांत प्रिय माझा' आणि दुसरा 'एक अवकाश माझंही!'




मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मला आल्यामुळे फार मोठी स्वप्नं नव्हती पाहिली आयुष्यात, पण जी माफक आणि साधी सोपी स्वप्नं होती तीही पुरी होऊ शकली नाहीत. एका संघर्षमय-खडतर आयुष्याची सुरुवात झाली. ह्या संघर्षानं एकत्र आयुष्य जगण्याच्या प्रवासात कवितेने माझी सोबत केली. केवळ सोबत नाही तर तिने मला जगवलं, तगवलं. एकटेपणाच्या खाईत तिचं माझं नातं दिवसेंदिवस घट्ट होत गेलं. माझ्याच कवितांनी मला ऊब दिली, आयुष्य रेटण्याचं बळ दिलं.

पण आयुष्य हे प्रवाही आहे ते वेदनेच्या थांब्यापाशी किती

काळ थांबणार? माझ्या वेदनेने कात टाकली. माझ्या व्यक्तिगत दु:खातून मी बाहेर पडले आणि मी स्वत:ला समष्टीशी जोडून घेतलं. व्यक्तिगत दु:खातून बाहेर पडल्यावर मला भोवताल स्पष्ट दिसू लागला. मुळातच संवेदनशील असल्यामुळे समाजातल्या इतर घटकांच्या दु:ख-वेदनेशी एकरूप झाले. माझी कविता सामाजिक वास्तवाचं, विषमतेचं चित्रण करू लागली याचं सर्व श्रेय माझ्या मित्र-मैत्रिणींना आहे. पैकी माझा जिवलग विजय त्रिभुवन, मित्र कॉम्रेड सुबोध मोरे, माझी मैत्रीण उर्मिला पवार यांनी मला आंबेडकर चळवळींशी जोडून दिले आणि 'A For Ambedkar' हा नवा मंत्र मला गवसला. माझी कविता न्याय-अन्यायाचा लेखाजोखा मांडू लागली. समतेचा उद्घोष करू लागली. माझ्या लेखनाचं क्षेत्र विस्तारलं. स्त्रीप्रश्नांबाबत मी अधिक सजग आणि चिकित्सक होऊ लागले. अर्थातच त्याचे पडसाद लेखनातून उमटू लागले. त्यातून ललित, वैचारिक लेखन सुरू झालं.

तरीही अट्टल तळीरामाचे पाय आपसूक गुत्याकडे वळावेत तशी मी पुन्हा-पुन्हा कवितेकडे ओढली गेले. कवितेतच मी उत्स्फूर्तपणे व्यक्त होऊ शकते, हे वास्तव मला नाकारता येत नाही. कवितेशी माझं अभेद्य नातं आहे. हो, त्वेचइतकं! जशी त्वचा शरीरापासून वेगळी करता येत नाही तशीच कविता माझ्यापासून! कविता माझी सखी आहे, प्रेमाने कुशीत घेणारी माय आहे आणि मिठीत आश्वस्त करणारा प्रियकरही! मी नाही जगू शकत कवितेशिवाय. कविता लिहिली नाहीतर मी गुदमरून मरून जाईन.

त्यामुळे अखेरच्या श्वासापर्यंत मी कविता लिहीत राहणार आणि कविता जगत राहणार.

शेवटी कविता म्हणजे तरी काय?
माझ्याच शब्दात-
कविता
एक विरेचन
कविता
एक हस्तमैथुन
कविता
एकच प्याला तळीरामाचा
कविता कधीच नसते
जेवणानंतरच्या तृप्तीचा ढेकर
कविता म्हणजे मूळव्याध
देठातून उभ्या देहाला
वेदनेच्या आरपार लयीत
घुमत ठेवणारी
तरीही अनिवार्य कविता
अर्भकाच्या सुरक्षित गर्भाशयाइतकी!

**– छाया कोरेगावकर**
भ्रमणध्वनी : ९३५९१३६७७०


॥ग्रंथाली॥

## स्त्रियांच्या लेखणीतून साकारलेली पुस्तके





# कविता माझा श्वास आहे ...

**योगिनी सातारकर-पांडे**

**स्त्रीच्या जगण्याचा अर्थ नेमका कशात आहे? तिला व्यक्त होण्याचा अवकाश खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य अनुभवायचा पैस आज तरी मिळतोय का?**


भीती आणि असुरक्षितता
यांना झुगारून
मला फिरायचंय
दुकानातल्या काचेआडच्या वस्तू निरखत

रूढी आणि परंपरांची
बंधने झुगारून
मला
मुक्त मुक्त वावरायचंय
समाजात

अपेक्षा आणि कर्तव्य
यांना विसरून
मला पाहायचाय
मेकअप शिवाय माझा चेहरा
आरशात

मला जगायचंय
कोणत्याही लेबल शिवाय
दुसरी कोणीही न होता
केवळ
मी होऊन...

**अ**शा काव्यगत जाणिवा घेऊन मी माझ्या वर्तमान भावविश्वाकडे आणि एकूणच समकालीन समाजजीवनाकडे बघते आहे. आणि हे जीवनानुभव व्यक्त करण्याचं माझं माध्यम म्हणजे कविता! मी ज्या सांस्कृतिक-सामाजिक पर्यावरणात वावरते त्या पर्यावरणाचा दृश्य-अदृश्य परिणाम माझ्या जगण्यावर होत असतो. या पर्यावरणाचे काही प्रश्न आहेत, आव्हाने आहेत आणि अर्थात ते माझेही आहेत. याबद्दल मी बोललं पाहिजे, लिहिलं पाहिजे असं




मला वाटतं आणि या अभिव्यक्तीसाठी माझं माध्यम म्हणजे कविता आहे. मराठीतील समृद्ध अशी कवयित्रींची परंपरा माझ्या या सम कालाच्या मागे आहे. या समकालीन कवितेचा स्वर, स्वरूप आणि आवाका याचा विचार केला तर शिक्षणाने दिलेले सजग आत्मभान आणि व्यक्त होण्याचा आत्मविश्वास या दोन बाबींवर ही कविता उभी असलेली निदर्शनास येते आणि यास मीही अपवाद असण्याचे कारण नाही.

मी का लिहिते? याचे उत्तर शोधले तर मी व्यक्त होण्यासाठी लिहिते. ही व्यक्त होण्याची असोशी, तगमग, धडपड आणि सगळे जीवनानुभव उतरतात ते कवितेत. आपण सगळे ज्या वेगाने बदलणाऱ्या भवतालात जगत आहोत त्यामध्ये एक माणूस म्हणून, एक व्यक्ती म्हणून आणि एक स्त्री म्हणून जगताना येणारे अनुभव आणि त्याअनुषंगाने त्यावरील काही एक वक्तव्य म्हणजे माझी कविता असे म्हणता येईल. सामाजिक, आर्थिक, राजकीय, भावनिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात स्त्री या वेगाने बदलू पाहणाऱ्या भवतालात जुळवून घेण्याचा प्रयत्न करतेय. जुन्याचे संचित आणि नव्याची आव्हाने या दोन्ही गोष्टी तिच्या समोर आहेत. आपल्या विवेकाच्या, अनुभवाच्या कसोटीवर उतरणारे स्वीकारत ती पुढे जातेय आणि त्याचवेळी कालबाह्य होणारे, न पटणारे असे सोडून देण्याचे धैर्यही तिला दाखवावे लागतेय. या

सगळ्या प्रवासात येणारे अनुभव ही कविता मांडते. सभोवतालच्या वास्तवाकडे संवेदनशीलतेने पाहिल्यास तंत्रज्ञानाने आधुनिक झालेल्या या नव्या जगात स्त्री मात्र जुन्याच व्यवहाराच्या साच्यात भरडून निघतेय हे अधोरेखित होते. काळ बदलला. स्त्रीच्या जीवनाचे आयामही बदलले त्याचबरोबर जीवनाचे स्वरूप अधिक जटिल आणि गुंतागुंतीचे झाले. स्त्री शिकली, कमावती झाली आणि अर्थार्जनासाठी घर आणि काम अशी दुहेरी कसरत तिला करावी लागू लागली. स्त्री-पुरुष समानतेची आस बाळगणाऱ्या तिला प्रत्यक्षात येणारे अनुभव मात्र याहून काहीसे वेगळे असतात. जीवनात स्वत:ला सिद्ध करत असताना कुटुंबात आणि समाजात आपले अस्तित्व ढवळून टाकणाऱ्या अनेक अनुभवांना ती सामोरी जात असते. यात एक अस्वस्थता तिला व्यापून उरते. या सगळ्यात स्त्री कुठे आहे? हा प्रश्न अनेक प्रश्नांची आवर्तने निर्माण करतो. तिच्या जगण्याचा अर्थ नेमका कशात आहे? तिला व्यक्त होण्याचा अवकाश, खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य अनुभवायचा पैस आज तरी मिळतोय का? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. या अनुषंगाने भोवतालाला आणि स्वत:ला समजून घेत व्यक्त होणे खूप गरजेचे आहे. त्यामुळेच भावनिक, मानसिक, शारीरिक पातळीवर व्यक्तिगत आणि समाजजीवनात करावा लागणारा संघर्ष आणि स्वत:ला समजून घेण्याची असोशी, समानतेची, सहजीवनाची आस यातील दरी साधू पाहतानाचे अनुभव मांडण्याची, व्यक्त होण्याची जागा म्हणजे माझी कविता होय.

कविता ही अत्यंत गंभीरपणे करावयाची कृती आहे असे मला वाटते आणि ते मी माझ्या पातळीवर कायम जपत आले आहे. काव्यनिर्मितीचा प्रवास हा जाणीव - नेणिवेच्या पातळीवर अंतर्मनात उठणाऱ्या कल्लोळाचा, त्यातील घुसमटीचा, घुसळणीचा एक दमवून टाकणारा अनुभव असतो. अमूर्त अशा मानसिक आंदोलनांना दिलेले मूर्त शब्दरूप म्हणजे कविता. या कवितेची भूमिका ही जीवननिष्ठ आहे. The experiences of women are markedly different from those of men. अर्थात एक स्त्री म्हणून येणारे अनुभव हे पुरुषांच्या अनुभवापेक्षा खूप वेगळे असतात. व्हर्जीनिया वूल्फ यांनी म्हटल्याप्रमाणे, 'स्त्रीसाठी आयुष्य म्हणजे मोठमोठ्या दिव्यांची सरळ रेषेतली रांग नाहीय.' तर जगताना सूक्ष्मतर स्तरावर येणारे जटिल अनुभव तिच्यासाठी महत्त्वाचे ठरतात. शारीर अस्तित्वाला दिले जाणारे महत्त्व, लिंगभावावर आधारित भूमिका, संवादहीनता, तुटलेपण, वगळलं जाणं, दुर्लक्षिलं जाणं तिच्या जगण्याचे संदर्भ बदलतात. सामाजिक आणि कौटुंबिक वर्तुळात स्वत:ला व्यक्त करण्याच्या अवकाशाचा अभाव आणि त्याप्रती असंवेदनशील असणारा भवताल आणि समाज तिच्या जगण्याचा संकोच करतात. अशा पार्श्वभूमीवर स्त्रीने व्यक्त होणे, लिहिणे आणि आपले अनुभव शब्दबद्ध करणे अतिशय महत्त्वाचे आहे असे मला वाटते ते केवळ स्त्री म्हणून नव्हे तर माणूस म्हणूनही! माणूस म्हणून आपल्याभोवती असणारे अभावाचे स्तर संवेदनशील मनाला अस्वस्थ करतात. समकाल हा विविध विचारधारा, असंवेदनशीलता आणि व्यामिश्रता याने ग्रासलेला आहे. अशावेळी यातून निर्माण होणारी असुरक्षितता व आदर्शवादापासून तुटलेलं वास्तव आपल्या जगण्याचे बहुपेडी संदर्भ अधोरेखित करतात आणि नेणिवेच्या पातळीवर स्वजाणिवांचा आणि अस्तित्वाचा शोध घेण्यास उद्युक्त करतात. आणि म्हणूनच सूक्ष्मस्तरावर येणाऱ्या तरल भावसंवेदना आणि जीवनातील वास्तवाचे आकलन हे या कवितेतील अनुभवांच्या केंद्रस्थानी आहे. यात जीवन जगताना माणूस म्हणून घेतलेला स्वचा शोध आहे, जगण्याचे बहुपेडी संदर्भ, पीळ समजून घेण्याचा प्रयत्न आहे त्याच प्रमाणे अव्यक्ताला व्यक्त करण्याची धडपड आहे जी आपल्या आत आत जात सूक्ष्म-अतिसूक्ष्मतर अनुभवांना शब्दांच्या माध्यमातून उजागर करते. काळाची आव्हाने पेलताना माणूस म्हणून आपलं संचित आहे ते म्हणजे जीवनानुभवातून येणारं विवेक विचाराचं अधिष्ठान, जे आत्मभान जागृत ठेवण्यास सहाय्यभूत ठरतं. माझ्यासाठी जगणं म्हणजे स्वत्व शोधत माणूसपण अबाधित ठेवण्याचा प्रवास आहे, ज्यात अस्वस्थ वर्तमानाच्या सावल्या येणारा भविष्यकाळ अंधुक करू पाहतात तेव्हा निराशेने, अपूर्णतेने, बदलांनी व्यापलेल्या भवतालात कविता एक आश्वासक सोबत करते, श्वासासारखी. त्यामुळेच कविता माझा श्वास आहे. जगण्याचे एकमेव कारण...!

**डॉ. योगिनी सातारकर-पांडे**
भ्रमणध्वनी : ९८८१७१७०२७
yoginisatarkarpande@rediffmail.com

**'शब्द रुची'**

**१ एप्रिल २०१९ पासून वार्षिक वर्गणी ३०० रुपये फक्त**
**ग्रंथालय/महाविद्यालय/वाचक यांनी नोंद घ्यावी ही विनंती.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल**
**त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**



# मला जगण्यासाठी लेखनकला मिळालीय...

**सुजाता महाजन**

**प्रत्येक लेखकाला राजकीय भूमिका असेलच असं नाही. पण प्रत्येकाला एक निश्चित मूल्यसरणी असतेच असं मला वाटतं.**

**मी** का लिहिते या प्रश्नाचं उत्तर अगदी सरळ, साधं आहे, मला फक्त लिहिता येतं म्हणून. पण काय होतं नक्की या प्रक्रियेत? का लिहावंसं वाटतं, हे निश्चित सांगण्यासारखं आहे.

इयत्ता पाचवीत असताना मला गौतम बुद्धाची गोष्ट कळली तेव्हा माझ्या जिवाची खूप तगमग झाली. माझ्या वयाच्या मानाने ही तगमग खूप मोठी होती, कुणाला सांगता येण्यासारखी नव्हती. जवळच्या मैत्रिणी तर 'तिने माझं भातुकलीतलं भांडं घेतलं' आणि 'ती मला हसली' यावर भांडणं करत होत्या. रुसत, फुगत, हसत होत्या. कुठेतरी असं वाटलं खरं, आपल्याला आत-आत झालेलं दुःख, गौतमाला जाणवलेलं जे आपल्याला कळलं ते सांगायला इथं कुणीच नाहीये आणि असंही कुठेतरी जाणवलं असणार (असं आता वाटतंय) की ते सांगायला आपल्याकडे नेमके शब्द नाहीयेत मग भावनांचा नेमक्या शब्दांशी लपंडावाचा खेळ कागदावर सुरू झाला. पटकन् शब्द आले,

सुख असे अनाथ नाही
राजपुत्र गौतम संन्यास घेई

मी माझी पहिली कविता अशी लिहिली.

मानवी जगण्यात सुख हीच एकमेव गोष्ट नाहीये, त्याच्याबरोबर दुःख पण येतंय हे पहिलंवहिलं उमगलेलं सत्य मला मांडायचं होतं, मला जितपत कळलं होतं तेवढं. लिहिल्यानंतर असं वाटलं, कुणीतरी आपल्यबरोबर आहे, कायमसाठी असणार आहे, कायम साथ करणारं आहे, आणि मी लिहीत राहिले.

आपण पाहिलेली दुःखं, तळमळ, तगमग आपल्या आत खदखदत रहाते. जोपर्यंत योग्य प्रतिमा भेटत नाही तोपर्यंत ती तशीच तरळत रहाते. कुठेतरी मधोमध कापलेले झाड दिसते आणि आपल्या आतली तगमग पटकन् शब्दांत उडी घेते,

मधोमध निखलस कापले जाऊ
तेव्हाच फुटतील नव्या फांद्या
आणि कोवळी, तांबुस पालवी
सुगंधाने घमघमणारी!




विंडी सिटी म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शिकागो शहरात निसर्गाचे आविष्कार इतके स्पष्ट दिसतात. प्रचंड वादळात थरथरणारी, झुकणारी झाडं पाहिल्यावर कुठेतरी आपल्या जगण्याशी झगडणारे जीव डोळ्यांसमोर येतात आणि पटकन् डोक्यात ओळी घुमतात,

'टिकून रहा,
झाडांनो, टिकून रहा'

आपण अनुभवलेल्या दुःखांचा, व्याकुळतेचा संबंध आपण लिहिलेल्या शब्दांशी असेलच असं नाही, म्हणजे आपण त्या दुःखाचं शब्दात ट्रान्सक्रिप्शन नाही करत. दाखवायचाच झाला तर हा प्रवास असा दाखता येईल

घटना- तिचा परिणाम- तगमग- प्रतिमा- कविता म्हणजेच आपण घटनेवर कविता नसतो लिहीत, तर घटनेच्या परिणामांना प्रतिमेच्या रूपात बांधतो, असं मला वाटतं.

कविता, कथा, कादंबरी या तिन्ही प्रकारचं लेखन मी केलं आहे. या तिन्हींचा प्रवास थोडा वेगवेगळा आहे. कुठल्या घटनेच्या परिणामाची कथा होईल आणि कुठल्याची कविता हे सांगता येत नाही. माझ्या बाबतीत मी एवढंच सागू शकेन, की घटनेचा माझ्या मनावर उमटलेला ठसा वेगवेगळ्या प्रतिमांची अनावर झुंड घेऊनच मनात उमटतो. प्रतिमा अनेक असल्याने कागदावर उतरता उतरता आपल्या कक्षेबाहेर जाऊन धावायला लागतात, तेव्हा आंजारून-गोंजारून त्यांना आवरावे लागते. कवितेच्या सलग किंवा आपल्याला हव्या तशा अनुभवाला बाध आणणाऱ्या प्रतिमा कितीही चांगल्या असल्या तरी बाजूला ठेवाव्या लागतात. पण कथेचं असं होत नाही. आपल्या आसपासच्या अनुभवांमध्येच कथेचं बीज

असतं, ते मनात रेंगाळत रहाते जोपर्यंत एखादी प्रतिमा मनात जन्म घेऊन त्या कथाबीजाशी एकरूप होत नाही, तोपर्यंत कथा लिहिली जात नाही, एखाद्याच योग्य प्रतिमेचं खतपाणी मिळालं, की त्या बीजाला हळूहळू घटनाक्रम, पात्रं, भावना, विचार यांचे अंकुर फुटायला लागतात आणि कथा आकाराला येते.

उलट कादंबरी एका अवकाशासह मनात उभी राहते. छोटे-छोटे प्रसंग दिसायला लागतात. पात्रं मनात उभी रहायला लागतात. प्रत्यक्षात ती किती काळात लिहिली जाईल हे सांगता येत नाही.

मी बारावीच्या सुट्टीत मैत्रिणीबरोबर तिच्या गावी गेले होते, त्यांच्याकडे मला एक स्वतंत्र खोली मिळाली होती. माझा-माझा अवकाश मिळाला होता. खूप सांगायचं होतं, खूप बोलायचं होतं. पाच दिवसात झपाटल्यासारखी एक लघुकादंबरी लिहिली. तिला नंतर 'रेऊ प्रतिष्ठान'चा पुरस्कार मिळाला. माझ्या आयुष्यातले ते पाच दिवस अतोनात आनंदाने भरलेले होते. नवनिर्मितीच्या या आनंदासाठीच मी लिहिते. लिहिलेल्या साहित्याचं पुढे काय, हा विचारही माझ्या मनात येत नाही. प्रत्येकाला काहीतरी मिळालंय या जगात जगण्यासाठी. मला लेखनकला मिळालीय, पण याचा अर्थ मी सतत लिहीत असते आणि बरेच दिवसात काही लिहिलं नाही तर मला दु:ख होतं, असंही नाही, पण जेव्हा लिहावंसं वाटतं, तेव्हा मी स्वत:ला थोपवू शकत नाही.

माणुसकी, प्रेम, स्वतंत्रता आणि निसर्गाशी जवळीक ही चार मूल्ये बहुतेक लेखक, कलावंतांकडे असावीत, त्यामळे लेखक कशावर तरी लिहीत नसतो, तर तो जे पाहतो, अनुभवतो, जे त्याच्या मनाला स्पर्शून जातं, ते तो एका संपूर्ण वेगळ्या मंचावर पुनर्निर्मित करतो.त्याच्या सगळ्या धारणा त्यात आपोआपच येतात.

– **सुजाता महाजन**, शिकागो
sujanmaha@gmail.com

॥ग्रंथाली॥

**स्त्रियांच्या लेखणीतून साकारलेली पुस्तके**






## सहकारी बँकिंगच्या भवितव्यासाठी रोड-म्यापची आवश्यकता!!
## सतीश मराठे, संचालक, सेंट्रल बोर्ड-रिझर्व्ह बँक
## 'सारस्वत'सारख्या सक्षम सहकारी बँकेला 'व्यापारी बँक' होण्याची जबरदस्ती नको!!
## गौतम ठाकूर, अध्यक्ष, सारस्वत सहकारी बँक

**आ**युष्यभर सहकार क्षेत्र आणि सारस्वत बँक ह्यांचा ध्यास घेतलेल्या आदरणीय एकनाथजी ठाकूर स्मृती-व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफण्यासाठी सतीश मराठे ह्यांना निमंत्रित करण्यात आले होते. विषय होता- 'नागरी सहकारी बँका - आज आणि उद्या' आपले संपूर्ण आयुष्य बँकिंग आणि सहकार-क्षेत्रात व्यतीत केलेल्या सतीशजी यांची अलीकडेच रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती मंडळावर 'संचालक' नियुक्ती झालेली असल्याने मराठेसाहेब काय बोलतील ह्याची सर्वांनाच उत्सुकता होती.समारंभाच्या प्रारंभी बँकेचे ज्येष्ठ संचालक किशोर रांगणेकर ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि कै ठाकूरसाहेबांच्या आठवणी आणि त्यांचे मोठेपण विशद केले.त्यांच्या कारकीर्दीत बँकेने केलेल्या सर्वांगीण प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला.ह्यानंतर बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर ह्यांनी मराठेसाहेबांचे स्वागत केले आणि प्रास्ताविकात आपली भूमिका मांडली.

सुरवातीला गौतमजीनी आपले पिताजी आणि सारस्वत बँकेचे सर्वेसर्वा असलेल्या एकनाथजी ह्यांच्या हृद्य आठवणी सांगितल्या. ते तन-मनाने सहकार मंत्र जपणारे होते. त्यांच्याकडे एका राष्ट्रीयकृत बँकेचे संचालकपद चालून आले असताना त्यांनी नम्रपणे सांगितले की मी सारस्वत कॉ-ऑपरेटीव्ह बँकेचा संचालक आहे आणि मला सहकारमध्येच काम करायचे आहे.आपल्या बँकेसाठी कॉर्पोरेट भवन उभारताना त्यांची दूरदृष्टी असामान्य द्रष्ट्याचीच होती. त्या भवनात स्थापना करण्यासाठी देवाची मूर्ती निवडताना गणपती किंवा सरस्वती न निवडता 'पांडुरंग' असावा असे सांगितले कारण हा देव सहकाराचे महात्म्य सांगतो. वारकरी आणि वारी हे आपल्याला सहकार्याचे महत्त्व ठसवते. पुढे बोलताना ते म्हणाले की ठाकूरसाहेबांनी आम्हाला एक व्हिजन दिली आणि त्यामार्गाने आम्ही वाटचाल करत असल्याने आज सारस्वत बँक ही कोणत्याही व्यापारी-व्यावसायिक बँकेप्रमाणे प्रगती करीत आहे असे अभिमानाने सांगितले. भांडवल, मनुष्यबळ आणि व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत आम्ही कार्यक्षम असताना केवळ आम्ही सहकरी क्षेत्रात आहोत, म्हणून आम्हाला नवीन शाखा उघडायला देत नाहीत! याउलट काही वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या नवीन प्रायव्हेट बँकांना विस्तार करण्याची संधी दिली जाते. मग आमच्याच बाबतीत असा 'सापत्नभाव' का? आपल्याकडेच 'सहकार' घटकाबाबत असे संकुचित धोरण आहे याउलट अमेरिकेसारख्या आणि अन्य प्रगत इकॉनॉमी असलेल्या देशात सहकार-क्षेत्र हे अन्य घटकांप्रमाणे सक्षम मानले जाते. कोणताही दुजाभाव केला जात नाही आणि इथे आपल्या देशात जिथे सहकाराची पाळेमुळे रुजली-फोफावली आहेत, तिथे मात्र अक्षरशः गळचेपी केली जाते. आम्ही सर्वच निकषांवर -व्यावसायिक कामगिरीवर अधिक शाखा उघडण्याची रास्त मागणी करतो तेव्हा सांगण्यात येते की आता तुम्ही सहकारातून बाहेर या! 'व्यापारी' बँक म्हणून नवीन रूपात उभे रहा,

मग तुम्हाला इतर व्यवसायिक बँकेप्रमाणे वागणूक मिळेल आणि तुम्हाला हवी तशी प्रगती करता येईल! म्हणजे आम्ही सहकार-क्षेत्रात राहून एखाद्या यशस्वी व्यावसायिक बँकेप्रमाणे प्रगती करतो आहोत, ह्याची दखल घ्यायची नाही. आज संपूर्ण देशातील अग्रगण्य सहकारी बँक म्हणून आम्ही स्थान मिळवले आहे, सांगायला अभिमान वाटतो की आज समाज-माध्यमात अग्रेसर असलेल्या 'व्हॉट्स अप'चा वापर करून 'व्हॉट्स अप बँकिंग' आम्ही सुरू केले याआधी फक्त कोटक बँकेने -खाजगी बँकेने प्रथमतः अशी सुविधा निर्माण केली आम्ही 'दुसरे' असलो तरीही आमची महत्त्वाकांक्षा आणि कुवत 'पहिल्या क्रमांकाची' आहे हे आम्ही सांगू इच्छितो. त्याकडे दुर्लक्ष करायचे. का? तर आम्ही सहकाराचा वसा घेतलेला आहे म्हणून? काही अपवादात्मक प्रकरणे झाली, म्हणून संपूर्ण क्षेत्राला, त्यातील प्रोफेशनल बँकेला अधिक प्रगती करता येऊ नये, म्हणून का रोखता आहात? आज सहकार चळवळ उभी राहिल्याने गोरगरिबांना आधार मिळालेला आहे आणि वंचितांना आर्थिक आधार मिळालेला आहे. अन्यथा खाजगी सावकारीच्या जिवघेण्या विळख्यातून ते कधी बाहेर पडले असते का? पण याचा विचार होत नाही. कारण सर्वचजण खाजगीकरण-उदारीकरणाचा उदोउदो करीत आहेत. आपल्यासारख्या मोठी लोकशाही असलेल्या देशात सहकाराची अशी कोंडी होणे गैर आहे. आज सहकार चळवळीची जाण असलेले आणि समाज-भान असलेले सतीशजी हे देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळावर आहेत, हे आमच्यासाठी आश्वासक आणि दिलासा देणारे असे आहे. आमच्या समस्या तुम्हाला ठाऊक आहेत, तुम्ही त्याबाबत योग्य सोल्युशन काढाल अशी खात्री आहे. कारण आपल्या या देशात 'सहकार' क्षेत्र हे टिकणे जरुरीचे आहे.

यानंतर सदर व्याख्यानमालेचे व्याख्याते सतीश मराठे ह्यांनी उपस्थितांना आदरणीय एकनाथजी ह्यांच्या काही आठवणी सांगितल्या आणि आज त्यांच्या व्हिजनमुळे सारस्वत बँकेने नेत्रदीपक प्रगती केली असल्याचे नमूद केले आणि त्यांनी भारतातील नागरी सहकारी बँक्स [UCBs] :- वर्तमान आणि भवितव्य मुख्य विषयाबाबत आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. आपल्या देशातील सहकार चळवळीचा वर्तमानकालीन आढावा घेताना त्यांनी माहिती दिली की ७५ टक्के नोंदणीकृत सहकारी संस्था आहेत. मात्र काळानुरूप नवीन पद्धतीच्या सोसायट्या New Generation Co-operatives निर्माण झाल्या नाहीत. अमेरिकेत आणि अन्य प्रगत अर्थव्यवस्था असलेल्या देशात तश्या निर्माण झाल्या ही वस्तुस्थिती आहे.सहकार क्षेत्र हे दुबळ्यांना आर्थिक सहाय्य देते.काही अपवाद सोडले तर हे क्षेत्र तसे सशक्त आहे Healthiest Segment कारण १५५० UCBs पैकी १२०० नागरी बँकांना 'अ' आणि 'ब' दर्जा मिळालेला आहे. आज Net NP Capital dequacy असे काही ठळक निकष पाहिले तर सहकार क्षेत्रातील बँका या रिझर्व्ह बँकेने घातलेल्या मर्यादेत आहेत. ह्याचाच अर्थ या सेक्टरकडे असलेला लोकांचा पैसा हा सुरक्षित आहे. मध्यवर्ती बँकेला वाटते की या सेगमेंटवर अधिक नियंत्रण असायला हवे. सुप्रशासनाकची आवश्यकता आहे. गेल्या काही दशकात नवीन खाजगी बँक्स जन्माला आल्या, त्यांना आणि नवीन असलेल्या पेमेंट बँक्स ह्यांना विकासासाठी वाव देण्यात आला आणि सहकारी बँकांवर निर्बंध! नवीन शाखा उघडायच्या नाहीत! अशा भेदभावजनक धोरणामुळे एकूण बँकिंगमधला 'सहकारी बँक वाटा' रोडावला. विस्तार रोखल्याने प्रगती खुंटली गेली. आणि काल आलेल्या बँकांनी अल्पावधीत नेत्रदीपक प्रगती केली. ज्यादेशात सहकाराने तळागाळातील वर्गाला उभे केले, तोच सहकार मागे पडताना दिसू लागला. त्याकडे निकोप दृष्टीने पाहण्याची गरज आहे. जगभरातला सहकार वाढतो आहे आणि आपल्याकडे मात्र संकुचित धोरणांमुळे रोडावत चालला आहे -हे विदारक चित्र आहे!

सहकाराच्या भवितव्यबाबत आणि आजच्या अर्बन बँकेपुढील मुख्य आव्हानांबद्दल बोलताना ते म्हणाले - आज आपल्या क्षेत्रापुढे पुढील तीन ठळक आव्हाने आहेत :-

**१) तरुण मनुष्यबळ राखणे-विकसित करणे :** पहिला मुद्दा हा आहे की सहकारी बँकांनी तरुण आणि आधुनिक तंत्रज्ञान अवगत असलेल्या स्टाफला प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांच्या गुणांनुसार वेतन आणि बढती दिली पाहिजे. आज बँकिंगमध्ये 'नोकरी-बदल' करण्याचे प्रमाण अधिक आहे, ते रोखले पाहिजे. आपण तयार केलेला अधिकारी-वर्ग कसा आपल्याकडेच राहिले हे पाहिले पाहिजे कारण त्यांना घडवण्याकरिता आपण पैसा आणि वेळ गुंतवत असतो, असे अनुभवसंपन्न अधिकारी दुसऱ्या बँकेत गेले तर आपल्याला पुन्हा नव्यांना तयार करावे लागते.म्हणून आपण उपलब्ध मनुष्यबळ राखून त्यांची प्रगती कशी होईल याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**२. टेक्नॉलोजी भक्कम करणे :** आजचे आणि उद्याचे बँकिंग हे तंत्राधिष्ठित आहे ही जाणीव ठेवून सातत्याने नवीन तंत्र -आधुनिकीकरण आणि कल्पकता ह्यावर भर दिला पाहिजे. जे तंत्र आज आहे त्यावर समाधानी न राहता सतत अपग्रेड करण्याचे धोरण ठेवले पाहिजे.तरच स्पर्धेत टिकता येईल. विशेषतः कॉसमॉस बँकेवरील सायबर हल्ला-दरोडा प्रकरण केवळ एका बँकेपुरते नाही, तर भारतीय बँकिंगवरील -पेमेंट सिस्टीमवर केलेला हल्ला आहे. आपण सर्व बँकांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता आहे. आणखी एक लक्षात ठेवले पाहिजे की जेव्हा चांगला कालखंड चालू असतो, तेव्हाच महा-चुका, गडबड-घोटाळे होण्याची अधिक शक्यता असते. म्हणून आपण गाफील राहून नये.

**३. जोखीम (Risk) व्यवस्थापन :** आजच्या बँकिंगमधील रिस्कचे प्रमाण आणि परिणाम वाढलेले आहेत. त्याकरिता जोखीम-व्यवस्थापन विकसित केले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर जोखीम-रोखणे हे केलेच पाहिजे. तुमची बँक ही देशातील 'पहिली बँक' आहे -ज्यांनी 'जोखीम-अधिष्ठित' हिशेब-तपासणी सुरू केली आहे. भारतातील कोणत्याच बँकेने याबाबत पाऊल उचललेले नाही पण सारस्वत या नामांकित सहकारी बँकेने हे करून दाखवले आहे, ही नक्कीच सहकारासाठी अभिमानाची बाब आहे.

आजच्या नागरी सहकारी बँक आणि एकूण सहकार-क्षेत्र प्रगतिपथावर येण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांनी पुढील गोष्टी नक्कीच केल्या पाहिजेत. तरच सहकाराला उज्वल असे भविष्य राहील. गेल्या पाच वर्षात बँकिंग ऑपरेशन हे अधिक जटिल झालेले आहे, म्हणून उच्चशिक्षित तरुणांना नोकरीत सामावून घेतले पाहिजे. दुसरा मुद्दा आहे तो जोखीम व्यवस्थापनाचा. कारण जी बँक कुशलतेने रिस्क सांभाळेल, तीच उत्तम प्रगती करू शकेल. विम्याने संरक्षण नाही होऊ शकणार, त्याआधी प्रतिरोधक उपाय केले पाहिजेत. सहकारक्षेत्राला आर्थिकदृष्टीने आणि कायदेशीरबाबतीत सबळ केले पाहिजे कारण सहकारक्षेत्र हे संपूर्ण देशातील असंघटित क्षेत्राला वित्तपुरवठा देते आणि त्यांच्या विकासात मोलाची कामगिरी करते. हे देशाच्या ठोकळ उत्पन्नात प्रतिबिंबित होते.पण तशी तपशीलवार आकडेवारी मिळाली तर सहकार काय करते त्याचे महत्त्व कळेल. उत्पादन-क्षेत्र वाढायचे असेल तर असंघटित क्षेत्र विस्तारले पाहिजे त्यासाठी रोजगार निर्मितीसाठी कौशल्य-विकास व्हायला पाहिजे. देशभरातील लाखो सेल्फ-हेल्प ग्रुप्समधील महिलांना-ज्यांना आर्थिक सहाय्य मिळत नाही त्यांना ते देऊन सबळ करण्याची जरुरी आहे. अमेरिकेसारखा बलाढ्य देशात उत्पादन कमी-उपभोग अधिक अशी स्थिती आहे. आपले असे व्हायला नको असेल तर उत्पादन-वृद्धी जरुरीची आहे. भविष्यात आपली लोकसंख्या अधिक असेल, मागणी अधिक असेल हे गृहीत धरून ध्येयधोरणे आखली गेली पाहिजेत.

रिझर्व्ह बँकेने सहकारक्षेत्र-नागरी सहकारी बँकांच्या उन्नतीसाठी एक रोड-मॅप तयार केला पाहिजे. राष्ट्रीयकृत बँकासाठी जशा पुनर्वसन योजना राबवल्या जात आहेत, तसे करण्याची गरज आहे. बोर्ड ऑफ मॅनेजमेंट पद्धती ही सहकार क्षेत्राने नाकारलेली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँका आणि सहकारक्षेत्र हे अतिशय महत्त्वाचे आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एक 'व्हिजन डॉक्युमेंट आणायची वेळ झालेली आहे. आजच्या घडीला अमेरिका, कॅनडा, युरेपियन देश आणि जपान येथे सहकारचे अस्तित्व मान्य झालेले आहे आणि आपल्याकडे ते संपवण्याची-प्रगती करू न देण्याची तजवीज कशासाठी? सहकाराला आर्थिक आणि कायदेशीर बाबी बळकट करा! आणि 'नाही रे' वर्गाच्या विकासाला गती द्या!! नवीन खाजगी बँका निर्माण करून एकेकाळी सावकारी पाशात भरडला गेलेला श्रमजीवी-कष्टकरी वर्ग नव्याने उदयाला आलेल्या कॉर्पोरेट विळख्यात घुसमटू नये असे वाटत असेल, तर नक्कीच ठोस मार्ग आणि कृतीची गरज आहे आणि मी व्यक्तिशः याकरिता पाठपुरावा करीत राहीन ह्याची ग्वाही देतो कारण मुळातच सहकाराचा उद्देश नफा कमावणे हा नसून सहकार माध्यमातून उत्कर्ष करण्यास सहाय्यभूत होणे. आणि हे वार्षिक कामगिरी म्हणून वार्षिक अहवालात प्रतिबिंबित झाली तर कळेल की सहकारी बँक किती लघु उद्योग -असंघटित वर्ग व रोजगारनिर्मिती करतात! याउलट सर्व व्यापारी बँका केवळ नफा कमावण्यासाठी कार्यरत असतात. म्हणून 'सहकार' जगला-जगवला पाहिजे.

मराठेसाहेबांच्या मार्गदर्शनपर विचारांवर सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर ह्यांनी समाधान व्यक्त केले, ते म्हणाले की तुमच्या रुपाने आम्हा नागरी बँका आणि सहकाराचा खंदा पुरस्कर्ता लाभलेला आहे. रोड-मॅप आणि रिझर्व्ह बँकेचे नवे धोरण जाहीर होण्याची आम्ही प्रतीक्षा करतो आहोत, तसे झाल्यास पुढील पाच वर्षात जोमाने प्रगती करू आणि नवीन शाखा उघडायला दिल्यास कार्यक्षम सहकारी बँक म्हणून नावलौकिक वाढवू. शेवटी बँकेच्या कार्यकारी संचालिका स्मिता संधाने पहिल्या महिला कार्यकारी संचालिका ह्यांनी मराठेसाहेबांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.या समारंभाला बँकेचे जेष्ठ संचालक-साहित्यिक पद्मश्री मधुभाई कर्णिक, पी.एन. जोशी, उपाध्यक्ष साखळकर व अन्य संचालक तसेच बँकिंग आणि सहकार क्षेत्रातील विद्याधर अनास्कर आदी मान्यवर आणि बँकेचा अधिकारीवर्ग व स्टाफ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

**– राजीव जोशी**
भ्रमणध्वनी : ९३२२२४१३१३
rjoshi@gols.in

### अध्यक्ष गौतम ठाकूर ह्यांनी जागवल्या पिताजी एकनाथजी ठाकूर ह्यांच्या हृद्य आठवणी

- प्रभादेवीला जमिनीचा प्लॉट बघायला मला घेऊन गेले, मला वाटले की माझ्यासाठी असेल. पण ते म्हणाले की सारस्वत बँकेचे कॉर्पोरेट भवन उभारायचे आहे! बीकेसीसारख्या ठिकाणी एक-दोन मजले घेण्यापेक्षा त्यांना पूर्ण बिल्डिंग उभी करायची होती, हे त्यांचे व्हिजन!
- कॉर्पोरेट भवन पूर्ण झाल्यावर कोणत्या देवाची मूर्ती ठेवायची? गणपती की सरस्वती? तर ते म्हणाले- ''विठ्ठल- कारण हा सहकाराचा देव आहे!''
- त्यांच्या अखेरच्या दिवसात त्यांना काही मंडळींना बढती द्यायची होती, बोलता येत नव्हते तरीदेखील त्यांनी मी वाचत असलेली एकेक नावे ऐकून कन्फर्म केली. दिलेले वचन पूर्ण करण्याची आत्यंतिक तळमळ बघितली
- त्यांचे जीवन हे सहकाराला -सारस्वत बँकेला वाहिलेले होते, इतके की त्यांना एका राष्ट्रीयकृत बँकेचे संचालकपद ऑफर झाले होते, पण त्यांनी ते नम्रपणे नाकारले.

# मराठी अभ्यास केंद्र आणि मुलुंडमधील वझे-केळकर महाविद्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेला मराठी भाषा गौरव दिन

**साधना गोरे**

'**म**राठी अभ्यास केंद्र' या मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीसाठी काम करणाऱ्या संस्थेने यंदाच्या मराठी भाषा दिनाला 'शांताराम दातार मराठी भाषा आग्रही पुरस्कार' आणि 'जयवंत चुनेकर मराठी शिक्षण पुरस्कार' देण्याचे ठरविले.

मराठी अभ्यास केंद्र आणि वि. ग. वझे-केळकर महाविद्यालयाचे मराठी भाषा व वाङ्मय मंडळ यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या पुरस्काराच्या सोहळ्याचं हे पहिलं वर्ष.

या भाषादिन सोहळ्याची सुरुवात महाविद्यालयाच्या मराठी भाषा-वाङ्मय मंडळाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याने आणि तुषार पवार लिखित 'भाषापरिक्रमा' या पुस्तकातील परिसंवादाने झाली. गोव्याच्या कै. शशिकलाताई काकोडकर यांनी दिलेल्या पाठ्यवृत्तीतून प्रमुख राज्यांतील भाषिक स्थितीगतीचा आढावा घेण्याकरता तुषार पवार याने संपूर्ण भारताचा दौरा केला. त्यातील अनुभवांवरील हे पुस्तक 'मराठी अभ्यास केंद्रा'ने प्रकाशित केले आहे. या परिसंवादात निर्माते नितीन वैद्य, प्रा. मीना गोखले, मेधा कुलकर्णी हे वक्ते सहभागी झाले तर परिसंवादाचे अध्यक्षपद डॉ. अनंत देशमुख यांनी भूषविले.



**डावीकडून 'भाषा परिक्रमा' पुस्तकाचे लेखक तुषार पवार, नितीन वैद्य, अध्यक्ष डॉ. अनंत देशमुख, प्रा. मीना गोखले आणि मेधा कुलकर्णी**

'शांताराम दातार मराठी भाषा आग्रही पुरस्कारा'साठी बेळगाव येथील दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाची तर 'जयवंत चुनेकर मराठी शिक्षण पुरस्कारा'साठी नांदेडमधील मुखेड तालुक्यातल्या कमळेवाडीच्या विद्यानिकेतन पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक असलेले शिवाजी आंबुलगेकर यांची निवड करण्यात आली होती. पुरस्कारासाठी याच संस्थेची नि याच व्यक्तीची निवड करण्यामागे त्यांचं मराठी भाषेसाठीचं कार्य हाच निकष होता, कारण ज्यांच्या नावे हा पुरस्कार दिला गेला, त्या व्यक्तींनीही आपली हयात मराठी भाषेसाठीच खर्ची घातली होती.

शांताराम दातार हे ज्येष्ठ विधिज्ञ. आपल्या 'मराठी भाषा संरक्षण व विकास'या संस्थेमार्फत त्यांनी न्यायालयामध्ये दाद मागणाऱ्या पक्षकारांना मराठीतून निकालपत्र मिळावे याकरता सर्व पातळ्यांवर लढा पुकारला. केवळ इंग्रजीतूनच न्यायालयाचे कामकाज कसे बेकायदेशीर आहे हे त्यांनी सरकारला मुद्देसूदपणे पटवून दिले. त्याकरता न्यायालयीन लढ्याचा मार्गही त्यांनी स्वीकारला. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मराठवाडा, विदर्भ अशा विविध भागांमध्ये फिरून त्यांनी मराठीच्या न्याय्य हक्कांसाठी वकिलांचे संघटन उभे केले. मोर्चे, निवेदने, परिषदा अशा सर्व मार्गांनी त्यांनी मराठीचा आग्रह धरला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांच्या व्यासपीठावरून आपली मराठीविषयक भूमिका त्यांनी सडेतोडपणे मांडली. न्यायालयीन कामकाजात मराठीचा जास्तीत जास्त वापर व्हावा याकरता अधिसूचना काढण्यास शासनाला भाग पाडले.

तालुका व जिल्हा स्तरावरील न्यायालयांमध्ये सध्या जे ५० टक्के कामकाज मराठीतून होते त्याचे श्रेय शांताराम दातार यांच्याकडे जाते. शांताराम दातारांनी शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे निमंत्रित सदस्य आणि महाराष्ट्र राज्याच्या विधी परिभाषा सल्लागार समितीचे सदस्य म्हणूनही काम केले. दक्षिणेकडील राज्यांच्या भाषिक परिस्थितीच्या अवलोकनार्थ नियुक्त समितीतही दातार यांची महत्त्वाची भूमिका होती. अनेक अंगांनी मराठीच्या जतन-संवर्धनाच्या चळवळीत दातार आग्रही राहिले. दुसरीकडे त्यांनी न्यायालयीन मराठीच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ग्रंथही लिहिले.

इतक्या मराठी भाषाआग्रही शिलेदाराच्या नावाचा पुरस्कार देण्यासाठी तितक्याच तोलामोलाचं कार्य शोधणं आवश्यक होतं. त्याकरता मराठी अभ्यास केंद्राने १९६५ पासून बेळगाव-खानापूर या सीमाभागात कार्यरत असणाऱ्या 'दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ' या संस्थेची निवड केली. दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाला आपल्या मातृभाषेसाठी कर्नाटक सरकारशी दोन हात करायचे होते. भाषावार प्रांतरचनेनंतर बेळगाव खानापूर, निपाणी, कारवार इत्यादी मराठीबहुल भाग भौगोलिकदृष्ट्या कर्नाटकात समाविष्ट करण्यात आला. वास्तविक तिथली जनता महाराष्ट्राच्या मातीशी, संस्कृतीशी आणि भाषेशी दृढपणे जोडलेली होती. पण हक्काच्या भाषिक आणि सांस्कृतिक अवकाशाकरता बेळगाव आणि सीमाभागातील मराठी बांधवांना अविरत अटीतटीचा लढा द्यावा लागला, अजूनही द्यावा लागत आहे. या लढ्याची मशाल पेटती ठेवण्यात बेळगावातील दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचं फार मोठं योगदान आहे. प्रसंगी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पदरमोड करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आणि सीमालढ्यात काम केलं आहे.

सीमाभागात शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या संस्था असल्या तरी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची दुर्दशा होती. अशावेळी भाई दाजीबा देसाई यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण 'महाराष्ट्र शिक्षण मंडळ' ही संस्था बेळगावातील मराठीतील शिक्षणाच्या चळवळीचा एल्गार ठरली.संस्थेच्या कार्यकर्त्यांना संस्थेच्या नावापासूनच लढा द्यावा लागला. मराठीवादी व्यक्तींची व संस्थांची मुळं सीमाभागात रुजू द्यायची नाहीत हे कर्नाटक सरकारचं धोरण पहिल्यापासून होतं. मात्र आपण महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहोत या जाणिवेतूनच संस्थेने 'दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ'या नावाचा आग्रह धरला आणि कानडी पुढाऱ्यांचा विरोध मोडून काढून १९६५ मध्ये संस्थेची रीतसर नोंदणी केली. मंडळाने बहुजन समाजातील मुलांकरता, ज्योतिबा फुले यांचा आदर्श अजरामर ठेवणाऱ्या ज्योती महाविद्यालयाच्या स्थापनेचा निर्णय घेतला. पण जागेकरताही मंडळाला सातत्यपूर्ण संघर्ष करावा लागला.

अखेर माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या पाठिंब्याने महाविद्यालयाच्या इमारतीची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि १६ जुलै १९७३ रोजी कर्नाटक विद्यापीठाच्या मान्यतेने ज्योती महाविद्यालय रीतसर सुरू झाले.

आज संस्थेच्या ३५ माध्यमिक शाळा, ६ महाविद्यालये असून साडेतेरा हजार विद्यार्थी इथे शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना कला, क्रीडा तसेच स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून मंडळाने ज्योती करिअर अकादमीची स्थापना केली. विज्ञान, वाणिज्य, कला-सांस्कृतिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रांशी निगडित ज्ञानकेंद्रांची स्थापना करून मंडळाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना दिली. मंडळाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे फुले अभ्यास केंद्राची स्थापना. अंधश्रद्धा निर्मूलन, जातिवंत, पुरोगामी विचार यांची रुजवात या केंद्राच्या माध्यमातून मंडळ करत आहे. सामाजिक बांधिलकीची प्रेरणा युवा पिढीला देत आहे. त्याकरता नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे.



**डावीकडून डॉ. प्रकाश परब, डॉ. दीपक पवार, दिनकर गांगल, जयंत जायभावे, दक्षिण महाराष्ट्र मंडळाचे ॲड. राजाभाऊ पाटील आणि शिवाजी आंबुलगेकर**

ज्येष्ठ विधिज्ञ जयंत जायभावे यांच्या हस्ते पुरस्काराचा स्वीकार करताना संस्थेचे सदस्य ॲड. राजाभाऊ पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, 'महाराष्ट्रात पहिल्यांदाच आमच्या कामाची अशी दखल घेतली गेली.'या एकाच वाक्यातून त्यांनी आपला आनंद आणि अनेक वर्षांच्या उपेक्षेची खंत दोन्ही व्यक्त केले. त्यांची ही खंत मराठी भाषक म्हणून आपल्या अस्मितेला लाजवणारी आहे, एवढे मात्र नक्की.

मराठी शिक्षक पुरस्कार ज्यांच्या नावे दिला गेला ते जयवंत चुनेकर हे डॉ. सु. रा. चुनेकरांचे पुतणे. सगळी ह्यात एस.टी. महामंडळातली नोकरी करूनही त्यांनी आपले साहित्यप्रेम कसोशीने जपले. आपल्या सहकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी साहित्य, कला, संस्कृतीशी जोडून घेतलं पाहिजे म्हणून ते प्रयत्नशील राहिले. कार्यालयाचा वेळ संपला तरी म हामंडळाच्या वाचनालयात ते रमत. स्वतःच्या कक्षात कोश व संदर्भग्रंथांचं खाजगी कपाट असलेले महामंडळाचे ते एकमेव अधिकारी असले पाहिजेत. चांगदेव काळेंसारखा लेखक-समीक्षक चुनेकरांच्या सहवासात घडला. माणसांना सतत प्रोत्साहन देणे हा त्यांचा स्वभावच होता.

चुनेकरांचा अभ्यास सखोल असल्याने अनेक पुस्तकांचे संदर्भ त्यांना पाठ असायचे. विशेषतः कोशवाङ्मयाबद्दल त्यांना विलक्षण आस्था होती, म्हणूनच सुरेश वाघे यांच्या संकल्पनाकोशाचे प्रचंड कामात ते वाघे यांच्या सोबत उभे राहिले. 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या या पंचखंडी संकल्पनाकोशाच्या निर्मितीत, तो प्रकल्प तडीस जाईपर्यंत जयवंत चुनेकर नेटाने सोबत राहिले. 'ग्रंथाली'च्या 'ज्ञानयज्ञ' प्रकल्पातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

चुनेकरांना अनुवादाची कला देखील उत्तम साधलेली होती. 'द मिरॅकल', 'द सिमिऑन चेंबर' आणि 'यू ओन्ली लिव्ह ट्वाईज' या त्यांच्या अनुवादित कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. जनसंपर्क अधिकारी म्हणून १९९९ साली निवृत्त झाल्यानंतर मराठीविषयक कामांत त्यांनी स्वतः ला झोकून दिले. 'मराठी साहित्यसंघा'च्या वतीने अमराठी लोकांसाठी चालवल्या जाणाऱ्या मराठी भाषेच्या वर्गांत ते अध्यापन करीत असत. 'मराठी अभ्यास केंद्रा'शी जयवंत चुनेकर यांचा सघन भावबंध जुळला होता. बदलापूरहून दूरचा प्रवास करून ते केंद्राच्या बैठकांना उपस्थित राहत. केंद्राच्या कामाकरता वेळ देताना घड्याळी तास ते कायम बाजूला ठेवत. मराठी अभ्यास केंद्राच्या वतीने 'नवशक्ती' या दैनिकात त्यांनी दीड वर्षे 'जागर मराठीचा' या सदरात अनेक स्फुटे लिहिली.

याच दरम्यान आणखी एका प्रकल्पाला त्यांनी स्वतःला अक्षरशः वाहून घेतले. तो प्रकल्प म्हणजे मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने हाती घेतलेला 'माय मराठी' हा प्रकल्प. अमराठी भाषकांना शास्त्रीय पद्धतीने मराठी कसे शिकवावे? या करता हा प्रकल्प आकाराला आला. जर्मन विभाग, ग्रंथाली, मराठी अभ्यास केंद्र या सर्वांच्या ध्यासातून या प्रकल्पाची पूर्ती झाली. या काळात चुनेकरांनी अथक परिश्रम केले. हाती घेतलेले काम तडीस नेण्याचा ध्यास हा त्यांचा स्वभाव होता. व्यावसायविषयक वा आर्थिक यशापलीकडे जाऊन निष्ठेने काम करत राहण्यात त्यांना रस होता. बदलापूरच्या 'ग्रंथसखा' ग्रंथालयात चुनेकरांचा पुस्तकसंग्रह विसावला आहे. तिथले 'जयवंत चुनेकर दालन' आजही वाचनप्रेमींना उमेद देते आहे.

'ग्रंथाली'चे आणि 'थिंक महाराष्ट्र'चे संस्थापक दिनकर गांगल यांच्या हस्ते 'जयवंत चुनेकर मराठी शिक्षक पुरस्कारा'चा स्वीकार शिवाजी आंबुलगेकर यांनी केला. शासनाच्या आश्रमशाळेत अध्यापन करीत असताना मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून आंबुलगेकर सरांनी श्रावणातल्या पारायणाच्या धर्तीवर 'श्रावण अभिवाचनमाला' उपक्रम सुरू केला. 'श्यामच्या आई'पासून सुरू झालेल्या या प्रवासाला आता दोन दशके झाली आहेत. शालेय प्रार्थनेच्या वेळी रूढ परिपाठ टाळून निवडक पुस्तकातला रोज एक भाग वाचला जातो.

नकाशे आणि विविध देशांच्या माहितीने खच्चून भरलेला भूगोल हा विषय तसा रटाळ. मात्र आंबुलगेकर सरांनी 'माझ्या गावचा भूगोल' हा अभिनव उपक्रम राबवला. नकाशा रेखाटन, स्थाननिश्चिती भूगोलातील या अमूर्त संकल्पना मुलांना स्वतःच्याच गावाचा भूगोल लिहिल्यावर आत्मीयतेच्या वाटायला लागल्या. या उपक्रमाद्वारे मुलांनी १४ जिल्ह्यातल्या तब्बल १२८ गावांचा भूगोल लिहून काढला.

आंबुलगेकर सरांनी कमळेवाडीच्या या शाळेत राबवलेला महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणजे अनुवादाची आनंदशाळा. वडार, बेलदार, पारधी, कैकाडी, वासुदेव, मसणजोगी, बंजारा, घिसाडी, नंदीवाले या भटक्या आणि विमुक्त जमातीतल्या मुलांसाठी मराठी भाषा ही परदेशी भाषेइतकीच अगम्य आहे, हे लक्षात आल्यावर सरांनी मुलांना त्यांच्या बोलीत कविता अनुवादित करण्यास प्रोत्साहन दिले.

ज्यांच्या नावे हे पुरस्कार दिले गेले. त्या शांताराम दातार व जयवंत चुनेकर तसेच पुरस्कारविजेते दक्षिण महाराष्ट्र मंडळ व शिवाजी आंबुलगेकर यांच्यावरील ध्वनिचित्रफिती याप्रसंगी दाखवण्यात आल्या. त्यांची निर्मिती 'मराठी अभ्यास केंद्रा'ने केली आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दीपक पवार यांनी केले तर आभारप्रदर्शन केंद्राचे कार्यवाह आनंद भंडारे यांनी केले.

**– साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ९९८७७७३८०२
sadhanagore2018@gmail.com

# 'चार सख्य चोवीस'



विनोद तावडे



सचिन खेडेकर



सागर तळाशीकर



चंद्रकांत कुलकर्णी



पल्लवी वाघ केळकर

'ग्रंथाली'च्या 'चार सख्य चोवीस' या पुस्तकाचं प्रकाशन ११ फेब्रुवारी २०१९ रोजी संध्याकाळी सहा वाजता सिडनेहॅम महाविद्यालय चर्चगेट इथे झाले. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या शुभ हस्ते हे प्रकाशन पार पडले. याप्रसंगी प्रतिथयश अभिनेते व उत्तम वाचक सचिन खेडेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर या पुस्तकाला ज्यांची प्रस्तावना लाभली ते प्रतिथयश दिग्दर्शक, अभिनेते चंद्रकांत कुलकर्णी हेही उपस्थित होते. ग्रंथाली या पुस्तक चळवळीसाठी प्रसिद्ध असलेल्या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या चार लेखिका या पुस्तकाच्या मानकरी आहेत. संपदा जोगळेकर कुळकर्णी (अभिनेत्री, दिग्दर्शिका, लेखिका), हर्षदा बोरकर (दिग्दर्शिका, सूत्रसंचालिका), सोनाली लोहार (ऑडिओलॉजीस्ट, स्पीच थेरपी एक्सपर्ट, लेखिका) निर्मोही फडके (मराठी भाषा शिक्षिका, लेखिका) या चार सख्यांनी मिळून हा कथासंग्रह निर्माण केला आहे. हा कथासंग्रह, मराठी कथासंग्रहाच्या इतिहासातला 'प्रयोगशील कथासंग्रह' असा उल्लेख माननीय विनोद तावडे यांनी केला. कारण या चारही लेखिकांनी यातील २० कथा केवळ या पुस्तकासाठी लिहिल्या व शेवटच्या चार कथांमध्ये एक प्रयोगशीलता दाखवली. प्रारंभ समान व मध्य शेवट मात्र भिन्न भिन्न अशा स्वतंत्र चार कथांची निर्मिती केली आहे. कथाविश्वात हे प्रथमच घडत आहे. चारही लेखिकांच्या वेगवेगळ्या कार्य क्षेत्रामुळे, वेगवेगळ्या अनुभव संपन्नतेमुळे व वेगवेगळ्या शैलीमुळे या चारही कथा सुरुवात समान असूनही खूप भिन्न प्रवृत्ती आणि प्रकृतीच्या गोष्टींचा आनंद देतात. या प्रसंगी 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर व डॉ. लतिका भानुशाली उपस्थित होते. 'ग्रंथाली'च्या वतीने डॉ. लतिका यांनी 'ग्रंथाली'ची या पुस्तकामागची भूमिका व त्यांच्या आगामी पुस्तक उपक्रमांबद्दल माहिती देत या चारही लेखिकांचे कौतुक केले. चंद्रकांत कुळकर्णी यांनीही या कथासंग्रहाची प्रस्तावना लिहिण्यामागील भूमिका स्पष्ट करताना कथाविश्वातील या नव्या प्रयोगाचे स्वागत केले. एक अनोखा विक्रम मनस्वी कथासंग्रह निर्मिती असेही या कथासंग्रहाला संबोधले. सचिन खेडेकर यांनी याप्रसंगी कथासंग्रहाबद्दल कौतुकोद्गार काढले व शेवटच्या कथांचे विश्लेषण करत या पुस्तक प्रक्रियेच्याच उपक्रमाबद्दल उत्सुकता वाटल्याचे सांगितले. या कथा संग्रहातील दोन कथांचे अभिवाचन, अभिनेते सागर तळाशीकर व अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी अतिशय सुंदर केले. विनोद तावडे यांनी आपले अध्यक्षीय भाषण करताना लेखिकांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या या प्रयोगशील पुस्तकाचे स्वागत तर केले परंतु या पुस्तका संदर्भाने अजूनही साहित्यकृती घडतील, या नव्या प्रयोगामुळे नव्या प्रेरणाही मिळतील अशी आशा व्यक्त केलेली. अभिनेत्री पल्लवी वाघ-केळकर यांनी कार्यक्रमाचे खुसखुशीत सूत्रसंचालन केले. 'ग्रंथाली'च्या खंबीर पाठिंब्यामुळे एक छान कलाकृती साहित्यक्षेत्रात पाऊल टाकू शकली. या पुस्तकाने केवळ पुस्तकरूपात न थांबता काळाची गरज ओळखून वेगवेगळ्या माध्यमांचा ही अवलंब केला पाहिजे हे भान व्यक्त केले.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ अतुल जोशी यांनी केले तर पुस्तकातील कथानुरूप रेखाचित्रे पूजा रायबाग यांनी काढली.

डॉ. लतिका भानुशाली



संपदा जोगळेकर-कुळकर्णी



हर्षदा बोरकर



सोनाली लोहार



निर्मोही फडके



ऐश्वर्या नारकर



# 'वेदना माझी सखी'

'वेदना माझी सखी' या डॉ. द्वारकादास बाहेती लिखित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ रोजी संपन्न झाला. लीलावती हॉस्पिटल आणि संशोधन केंद्राच्या भूलतज्ज्ञ विभागातील, 'क्रोनिक पेन मेडिसीन डिव्हिजन' आणि 'ग्रंथाली' यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम लीलावती हॉस्पिटलच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

लीलावती हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. रवीशंकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

भारतातील नामवंत पेन फिजिशियनपैकी अत्यंत अग्रणी असणारे नाव म्हणजे अर्थातच डॉ. द्वारकादास बाहेती. हे लीलावती, रहेजा, बॉम्बे हॉस्पिटल इत्यादी हॉस्पिटल्समध्ये पेन फिजिशियन म्हणून कार्यरत आहेत. आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. बाहेती यांनी मराठी भाषा, मराठी समाज याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ''वैद्यकीय परिभाषेतील गुंतागुंतीचे ज्ञान प्रादेशिक भाषांमध्ये आणणे आणि या ज्ञानाला सामान्य माणसांपर्यंत पोहचवणे ही सामाजिक गरज आहे'' असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रवीशंकर यांनी अशा पुस्तकांची समाजाला खरोखरच गरज आहे. त्यातून डॉक्टर आणि रुग्ण यांच्यामध्ये विश्वासाचे नाते तयार व्हायला मदत होईल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. व्ही. टी. इंगळहळीकर यांनी पुस्तकातील मजकूर, त्याचे स्वरूप या सर्वांचा सांगोपांग विचार मांडला. विविध उदाहरणांच्या माध्यमांतून वैद्यकीय क्षेत्रातील गुंतागुंत, वैद्यकीय परिभाषा समजून घेताना सामान्य रुग्णांचा उडणारा गोंधळ यांचा ऊहापोह करून ते म्हणाले की, ''बऱ्याच वेळा इंग्रजी न समजणाऱ्या रुग्णांसाठी सामान्य वैद्यकीय भाषा कोणती व कशी वापरावी याचे ज्ञान डॉक्टरांना सुद्धा नसते. त्यामुळे असे ज्ञान देणारी पुस्तके प्रादेशिक भाषेत आणणे हे मोठे सामाजिक काम आहे. हे काम डॉ. बाहेती यांनी केल्याबद्दल त्यांनी डॉ. बाहेती यांचे कौतुक केले.



'वेदना : माझी सखी ' या पुस्तकातील एका प्रकरणाच्या लेखिका डॉ. वैभवी बक्षी यांचा सत्कार करताना कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप

या कार्यक्रमाचे विशेष पाहुणे पद्मभूषण, वरिष्ठ कॅन्सर सर्जन, टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे माजी संचालक डॉ. प्रफुल देसाई यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. रवीशंकर यांची ओळख लीलावती हॉस्पिटलच्या भूलशास्त्र विभागाच्या समन्वयक डॉ. फाल्गुनी शहा यांनी करून दिली तर डॉ. इंगळहळीकर यांचा परिचय 'आशीर्वाद पेन रिलिफ सेंटर'च्या संचालिका डॉ. लक्ष्मी वास यांनी करून दिला. पद्मभूषण डॉ. प्रफुल देसाई यांचा परिचय डी. वाय. पाटील विद्यापीठातील भूलतज्ज्ञ प्रमुख डॉ. आर.पी. गेहडू यांनी करून दिला.

'ग्रंथाली'च्या वतीने कार्यक्रमाची प्रस्तावना मांडणे आणि सूत्रसंचालन या भूमिका डॉ. लतिका भानुशाली यांनी पार पाडल्या. यावेळी ज्येष्ठ फिजिओथेरेपिस्ट डॉ. सरोज संघवी, ग्रंथाली विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि भाजप अध्यक्ष, आमदार आशिष शेलार आणि लीलावती हॉस्पिटलच्या भूलतज्ज्ञ डॉ. वैभवी बक्षी इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

'वेदना माझी सखी' या पुस्तकाचे मराठी अनुवाद करणारे अनुवादक उदय जोशी यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. तर गुजराती-हिंदी अनुवाद करणाऱ्या श्रीमती स्वाती खारोड या उपस्थित नसल्या तरी त्यांच्या अनुवादाविषयी त्यांचे जाहीर कौतुक केले गेले. या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. फाल्गुनी शाह यांनी केले.


ग्रंथाली




**वेदना : माझी सखी**

**प्रा. डॉ. द्वारकादास के. बाहेती** (एम.डी.)

दीर्घकालीन वेदना (Chronic pain) हा एक सामूहिक राष्ट्रीय आजार आहे. दीर्घकालीन वेदनेच्या विविध पैलूंची, त्यावरील उपचारपद्धतींची, औषधांची, तंत्रप्रणालींची सविस्तर माहिती सोप्या भाषेत सांगणारे आणि वेदनाशमन व्यवस्थापनशास्त्रावर आधारित असलेले हे पुस्तक म्हणजे सागरातील दीपस्तंभ आहे.

– डॉ. लक्ष्मी वास

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

## 'नैतिक-अनैतिक' कथासंग्रह

अर्जुन जगधने यांच्या नैतिक-अनैतिक या कथासंग्रहाचे प्रकाशन २३ फेब्रुवारी २०१९ झाले. हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले. कथासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांच्या हस्ते आणि लेखक व पत्रकार मा. प्रतिमा जोशी, मुंबई विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापिका डॉ. वंदना महाजन, सामाजिक कार्यकर्ते मुक्ता दाभोलकर व सुबोध मोरे यांच्या उपस्थितीत पार पडले.

मान्यवरांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक व साहित्यिक अंगाने या कथासंग्रहाविषयी आपले विचार मांडले. यावेळी ज्येष्ठ कवयित्री व कथालेखिका नीरजा आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, की नैतिक-अनैतिक कथासंग्रहातील नायिका पुरुषांपेक्षा जास्त ताकदीच्या आहेत. त्या आपल्या हक्कांसाठी भांडणाऱ्या तर आहेतच, पण घरातल्या नवरेशाहीविरुद्ध त्याच्या दांभिकतेविरुद्ध देखील त्या आवाज उठवतात, प्रसंगी बंड करायला मागे पुढे पाहात नाहीत. आणि ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे; कारण घरातल्या अन्यायाविरुद्ध बोलणं ही खूप मोठी गोष्ट आहे.आपल्याला असे वाटते की स्त्रिया लैंगिकतेबद्दल चर्चा करीत नाहीत; पण वास्तव नेमकं वेगळं असतं या कथासंग्रहात त्याविषयी स्पष्टपणे अगदी बिनधास्तपणे व्यक्त होणाऱ्या स्त्रिया आढळतात. खरे तर साधं खोटं बोलणं हीसुद्धा एक अनैतिक बाब आहे, पण आपण नैतिक आणि अनैतिकतेच्या कल्पना केवळ स्त्रियांच्या लैंगिकतेशी जोडून टाकतो. म्हणून या कथांच्या निमित्ताने लेखक जगधने यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, ते सद्य काळात साहित्यात येणं हे खूप आवश्यक होतं.

सुरुवातीलाच या पुस्तकाविषयी बोलताना ज्येष्ठ पत्रकार व कथा लेखिका प्रतिमा जोशी म्हणाल्या, की जगधने यांच्या कथांमधील नायिका या निर्णय घेणाऱ्या आणि बंडखोर नायिका आहेत. म्हणून त्या आजच्या काळाच्या निदर्शक आहेत. लेखकाने अतिशय धीटपणे आपल्या कथानकामधील पात्रं उभी केली आहेत कारण आपल्या समाजात इतर प्रश्नावर खूप बोललं जातं पण नैतिकतेविषयी बोलताना आपण कचरत असतो. या कथांमधील पात्रांचा संघर्ष समाजाशी तर आहेच पण ते ज्या गटात, संघटनांत वावरतात तेथील विसंगतीशीही आहे. या कथांत स्त्री-पुरुष समानतेच्या नावाखाली स्वार्थ साधणारी माणसे भेटतात आणि या दांभिक माणसांना त्यांची योग्य ती जागा दाखवणाऱ्या स्त्रियाही. यातील सर्वच कथा वाचनीय झाल्या आहेत.

डॉ. वंदना महाजन पुस्तकाविषयी बोलताना म्हणाल्या की हे एक प्रकारे कार्यकर्त्यांचं मनोगत आहे. यातील कथा नैतिक आणि अनैतिकतेच्या पलीकडे पोहोचल्या आहेत. सद्यस्थितीत चिकित्सा बंदीचे वातावरण असताना या संग्रहातील कथा केवळ समाजातील चिकित्सा व्हायला हवी एवढेच सांगत नाहीत तर काही बोटे स्वतःकडेही आहेत, याची जाणीव करून देऊन स्वतःची चिकित्सा करण्यासाठी वाचकाला अंतर्मुख करतात, असे वाटते.सुबोध मोरे म्हणाले की शिक्षकी पेशात असलेले अर्जुन जगधने हे सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांचे निरीक्षण उत्तम आहे. या कथांमध्ये कादंबरीची बीजे रुजली आहेत त्यामुळे जगधने यांनी त्या दृष्टीने विचार करावा. तर अर्जुन जगधने यांनी लेखक या नात्याने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'ग्रंथाली'च्या वतीने धनश्री धारप यांनी केले.

याप्रसंगी अर्जुन जगधने यांनी स्थापन केलेल्या उत्तरदायित्व फाउंडेशनचा पहिला 'सामाजिक उत्तरदायित्व पुरस्कार' अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जोडीदाराची विवेकी निवड या विभागाला सन्म ानपत्र व रुपये १० हजार या स्वरूपात देण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन मा. राजश्री साळगे यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर बळी यांनी केले.

## 'नक्षत्रलिपी' कवितासंग्रह




२७ जानेवारी २०१९ रोजी पुण्याच्या पुस्तकपेठेत एका छोटेखानी पण संस्मरणीय कार्यक्रमात 'नक्षत्रलिपी'चे प्रसिद्ध लेखक विचारवंत राजीव साने यांच्या हस्ते व कवी हेमंत गोविंद जोगळेकर यांच्या उपस्थितीत पुनःप्रकाशन झाले. पुस्तकपेठचे संजय भास्कर जोशी, माधव आणि अंजली वैशंपायन, कवी रेणू पाचपोर,कवयित्री आसावरी काकडे आणि श्रीनिवास काकडे, कवयित्री वर्षा बेन्दिगिरी कुलकर्णी, विश्वास डिग्गीकर तसेच लेखक दिलीप लिमये, नंदिनी देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. राजीव साने व हेमंत जोगळेकर यांची कविता आणि अनुवाद या विषयावर रोचक भाषणे झाली. अंजली वैशंपायन आणि पुस्तकाच्या लेखिका भारती बिर्जे-डिग्गीकर यांनी श्रोत्यांशी संवाद साधला.

## 'फुलफुलात चाललो..' प्रेरक आत्मकथन




**डॉ. पंडितराव पवार लिखित 'फुलाफुलांत चाललो' या आत्मकथनाचे प्रकाशन करताना म.वि.प्र. संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती निलिमाबाई पवार, सभापती माणिकराव बोरस्ते, उपसभापती राघोनाना आहिरे, अशोक पवार, डॉ. विश्राम निकम, वसंतराव खैरनार, संस्थेचे अन्य पदाधिकारी, डॉ. पवार, सरस्वती फाटक**

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. पंडितराव पवार यांचे आत्मकथन नुकतेच मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस श्रीमती निलिमाताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या त्यापुढे म्हणाल्या, 'डॉ. पवार यांनी संस्थेत अत्यंत निष्ठेने सेवा केली. संस्थेतील ध्येयधोरणे त्यांनी व्रतस्थपणे राबविली. आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत त्यांनी गुणवंतांसाठी अनेक प्रयोग केले. व्यक्तिगत जीवनात आणि सेवेत अनेक आव्हाने स्वीकारून सकारात्मक दृष्टिकोण अंगिकारला. त्यामुळे त्यांच्या संयम, व्यासंगी, धीरगंभीर वृत्तीचे प्रतिबिंब या ग्रंथात उमटले आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि प्राचार्यांनीही हे आत्मवृत्त प्रेरक ठरणारे आहे.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योती स्टोअर्सचे संचालक वसंतराव खैरनार यांनी केले. त्यानिमित्ताने त्यांनी डॉ. पवार यांच्या साहित्य, समीक्षा आणि शैक्षणिक विषयावरील विविध वीस ग्रंथाचा परिचय करून दिला. कवी अनिलांची कविता, सृजन, तेजाची लेणी हे ग्रंथ पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमात नेमल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, सभापती माणिकराव बोरस्ते, उपसभापती राघो नाना आहिरे, डॉ. विश्राम निकम, डॉ. जयंत पवार, प्रल्हाद गडाख, डॉ. प्रशांत देवरे, नाना महाले, अशोक पवार, सचिन पिंगळे यासह कार्यकारिणीचे सर्व सदस्य, शिक्षणाधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते. सरस्वती पवार आणि संज्योत सोनवणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्या डॉ. पवार यांनी सर्वांचे आभार मानले. सदर ग्रंथ 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला.

## 'अनवट निवडक गोखले'

'कथाव्रती अरविंद गोखले यांनी मराठी वाङ्मयाला दिलेले योगदान कुणीच नाकारू शकणार नाही. मराठी नवकथेच्या या बिनीच्या शिलेदाराच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांना मानवंदना म्हणून त्यांच्या कथा मुंबई विद्यापीठाच्या येणाऱ्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न विद्यापीठ अवश्य करेल' असे आश्वासन विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. धनाजी गुरव यांनी १९ फेब्रुवारीला येथे दिले.

महाडच्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य-मराठी विभागप्रमुखही असलेले डॉ. गुरव, जन्मशताब्दीदिनी 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'अनवट निवडक गोखले' या ग्रंथाचे प्रकाशन समारंभपूर्वक करताना बोलत होते. 'विपुल लेखन बहुधा कसदार नसते, असे सर्वसामान्यपणे मानले जाते. पण आयुष्यभर कथा या एकाच वाङ्मयप्रकाराचा ध्यास घेऊन जवळपास सहाशे कथा लिहिलेल्या गोखले यांनी तो समज खोटा ठरवून दाखवला आहे. त्यांच्या कथांचा पीएच.डी.साठी अभ्यास करण्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचे आश्वासनही डॉ. गुरव यांनी दिले.

**द्वितीय आवृत्ती प्रकाशित**

यावेळी मान्यवर पाहुणे-ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी यांच्या हस्ते शताब्दी-प्रारंभानिमित्त 'ग्रंथाली'तर्फे सिद्ध करण्यात आलेल्या 'कथाव्रती अरविंद गोखले' या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे तसेच 'डॉ. लाभसेटवार पुरस्कार' विजेते तरुण कथाकार किरण येले यांच्या हस्ते लेखिका नीला उपाध्ये यांच्या 'मी वसंततलिका' (हिंदुस्थान प्रकाशन) च्या द्वितीय आवृत्तीचेही समारंभपूर्वक प्रकाशन झाले. रत्नाकर मतकरी, गणेश मतकरी, समीक्षिका डॉ. सुरेखा सबनीस प्रभृती मान्यवरांनी या वेळी बोलताना 'परमन प्रवेशाचे सामर्थ्य लाभलेल्या गोखल्यांनी त्यांच्या पात्रांच्या मनाच्या तळाचा सखोल वेध कसा घेतला; सदाशिवपेठी असूनही त्यांच्या कथांनी विश्वात्मकतेचा पैस कसा गाठलेला आढळतो' या सुरेख उहापोह केला.

'बातमीदार' हे केवळ पुरुषांचे क्षेत्र- असे पत्रकारितेत मानले जाण्याच्या पन्नास वर्षांपूर्वीच्या काळात त्या अनवट

## पुस्तकप्रकाशन


रत्नाकर मतकरी


धनाजी गुरव


गणेश मतकरी


किरण येले


नीला उपाध्ये


डॉ. सुरेखा सबनीस


नम्रता कडू


रोहिणी गोखले


डॉ. लतिका भानुशाली

वाटेवरून चालण्याची प्रेरणा- गोखलेकाकांनी आपल्याला दिली; त्या कृतज्ञतेपोटीच ही शताब्दी दीड-दोन डझन कार्यक्रमांद्वारे अन् या दोन ग्रंथात नव्या-जुन्या कथाकारांनी शिफारस केलेल्या निवडक २६ गोखले-कथा संकलित करून साजरी होत आहे, असे लेखिका नीला उपाध्ये यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

**'अर्घ्य' कथेचे अभिवाचन**

पुलवामा येथील हुतात्मा जवानांना श्रद्धांजली वाहून सुरू झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी मुक्त पत्रकार उमेश घळसासी व नम्रता कडू यांनी, गोखल्यांच्या 'अर्घ्य' कथेच्या केलेल्या अभिवाचनाने सुरू झालेल्या या कार्यक्रमात लतिका भानुशाली यांनी 'ग्रंथाली'च्या वतीने स्वागत केले. नम्रता कडू यांनी सूत्रसंचालन तर अरविंद गोखले यांची स्नुषा रोहिणी यांनी आभारप्रदर्शन केले.

## 'सुवर्णकण'




**'सुवर्णकण' पुस्तक प्रकाशनसमयी डॉ. जितेंद्र खेर, दिनकर गांगल, अशोक रणखांब, वसंतराव ओसवाल, डॉ. विजया वाड, मीनाक्षी दादरावाला आणि इतर मान्यवर**




**'सुवर्णकण' पुस्तकातील निवडक लेखक व लेखिका मान्यवरांसह**

'ग्रंथाली' प्रकाशित व डॉ. विजया वाड संपादित 'सुवर्णकण' या गुरु-शिष्य संबंधित आधारित या पुस्तकाचे प्रकाशन दि. २८ फेब्रुवारी रोजी कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन शाळेच्या भव्य सभागृहात पार पडले.

या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माननीय वसंतराव ओसवाल यांच्या हस्ते पार पडले तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून दिनकर गांगल, ज्येष्ठ पत्रकार व संस्थापक-संपादक 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' आणि अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त भिवंडी महानगरपालिका हे उपस्थित होते.

'सुवर्णकण' या पुस्तकात डॉ. स्नेहलता देशमुख, नीला सत्यनारायण, ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे, अनुराधा गांगल आदींसह अनेक मान्यवर व्यक्तींचे गुरु-शिष्य संबंधांवर आधारित लेख आहेत. भाग्यश्री फाउंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र खेर यांनी कार्यक्रमात आभार प्रदर्शन केले.

# 'मानवी संस्कृतीचा अर्थ'



**बी.जी. वाघ लिखित 'मासवी संस्कृतीचा अर्थ' या पुस्तक प्रकाशनसमयी डावीकडून धनश्री धारप, सुदेश हिंगलासपूरकर, विनायकदादा पाटील, न्या. नरेंद्र चपळगांवकर, विभागीय आयुक्त राजाराम माने, लेखक बी.जी. वाघ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नरेश गिते, ज्योती स्टोअर्सचे वसंत खैरनार**

नाशिक येथे वास्तव्यास असलेले माजी सनदी अधिकारी व ज्येष्ठ साहित्यिक बी.जी. वाघ यांनी लिहिलेल्या 'मानवी संस्कृतीचा अर्थ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचा कार्यक्रम ग्रंथाली प्रकाशन आणि ज्योती स्टोअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या औरंगबादकर सभागृहात झाला. शुक्रवार, १ मार्च २०१९ रोजी पुस्तकाचे प्रकाशन माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनाधिपती विनायकदादा पाटील होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी विभागीय आयुक्त राजाराम माने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नरेश गिते, सुरेश मिरजापूरकर होते. पुस्तक प्रकाशनानंतर नरेंद्र चपळगांवकर म्हणाले, ''ज्ञानोपासनेची परंपरा सनदी अधिकाऱ्यांनी टिकवून ठेवली आहे. अधिकाऱ्यांना राज्यकर्त्यांच्या गुणदोषांचे दर्शन जवळून घडते. अधिकाऱ्यांनी अनुभवातून पुस्तके प्रकाशित केल्यास राजकारणातील प्रश्न सोडविण्यासाठी त्याचा उपयोग होईल व समाज सुधारण्यास मदत होईल.'' ते पुढे म्हणाले, ''सर्वांना बरोबर घेऊन जाणारी समतेची संस्कृती अजूनही उदयास आलेली नाही. जगभर वंशवाद फोफावत आहे. मानवधर्माचे नुकसान करणारे हे गंभीर चित्र आजही कायम आहे. त्यामुळे तत्कालीन प्रश्नांचा विचार करण्यापेक्षा मानवी समाजाच्या नव्या भवितव्याचा विचार रुजविण्याची गरज आहे.''

वनाधिपती विनायकदादा पाटील म्हणाले, ''आजपर्यंत मानवी संस्कृतीची व्याख्याच झालेली दिसत नाही. ती व्याख्या शोधण्याचा प्रयत्न वाघ यांनी केला आहे. सर्व तत्त्ववेत्त्यांची ओळख समाजाला व्हावी. यासाठी या पुस्तकाद्वारे छोटासा प्रयत्न मी केला आहे. वाचकांना हे पुस्तक नक्कीच आवडेल.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. ते म्हणाले, ''ग्रंथाली वाचन चळवळीसाठी नवे-नवे प्रयत्न करत असते. नवीन विषय सम ाजाला देण्यासाठी ती कायमच अग्रेसर आहे. 'मानवी संस्कृतीचा अर्थ' या पुस्तकाद्वारे समाजाला एक सर्वसमावेशक, समानतेची व्यवस्था प्राप्त व्हावी. तो विचार समाजात रुजावा हा प्रयत्न केला आहे.''

पुस्तक प्रकाशन सोहळ्यास नाशिक आणि इतर ठिकाणचेही प्रशासकीय अधिकारी, साहित्यिक, विचारवंत उपस्थित होते. विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, सकाळ उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने, माजी आयुक्त विलास ठाकूर, माजी आदिवासी विकास आयुक्त आर.जे. कुलकर्णी, कवी उत्तम कोळगावकर, ज्येष्ठ विधिज्ञ दौलतराव घुमरे, ॲड. भास्करराव पवार, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, कवी किशोर पाठक, डॉ. भाऊसाहेब मोरे, श्रीकांद बेणी, विलास औरंगाबादकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**– सुरेखा बोऱ्हाडे**

भ्रमणध्वनी : ९१५८७७४२४४

# कवी गणेश घुले यांच्या बालकविता संग्रहाला बालसाहित्याचा राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार

कवी गणेश घुले यांच्या 'सुंदर माझी शाळा' या बालकविता संग्रहाला देवाळे (जि. कोल्हापूर) येथील कै. पांडुरंग विभूते तथा दादा आदर्श वाचन मंदिराच्या वतीने यावर्षीचा बालसाहित्याचा राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार देण्यात आला. रविवार, ३ फेब्रुवारी रोजी कोल्हापुर जिल्ह्यातील देवाळे येथे झालेल्या २७ व्या बालकुमार साहित्य संमेलनात कोल्हापुरचे धर्मादाय सहआयुक्त मा.शशिकांत हेर्लेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी संमेलनाध्यक्ष दीप्ती कुलकर्णी, स्वागताध्यक्ष राजाराम विभुते, जिल्हा परिषद सदस्य शिवाजी मोरे,

वारणा बँकचे संचालक एम. एच. चावरे, माजी उपसभापती उज्ज्वला पाटील, उपअधीक्षक आर. आर. पाटील, मराठी बालकुमार साहित्यसभेचे अशोक पाटील, साहित्यिक बाळ पोतदार, चंद्रकांत निकाडे, श्रीकांत पाटील, विधिरा विभूते आणि परिसरातील साहित्य रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

'सुंदर माझी शाळा' हा बालकविता संग्रह नुकताच ऑक्टोबरमधे 'ग्रंथाली' वाचक चळवळ, मुंबई यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे.याच काव्यसंग्रहातील कवितांवर आधारित बालकवितेचा सांगीतिक कार्यक्रम 'सुंदर माझी शाळा' महाराष्ट्रातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. या कार्यक्रमाचे जवळपास चाळीसच्यावर प्रयोग झाले आहेत.

कोल्हापूर येथील बालसाहित्याचा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कवी गणेश घुले यांचे 'अभ्युदय फाऊंडेशन'चे अध्यक्ष नीलेश राऊत, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, विजय



कान्हेकर, पूर्णवादी बँकेचे संचालक सुहास तेंडुलकर, मंगेश निरंतर, सुबोध जाधव, महेश अचिंतलवार, संतोष लोमटे, श्रीकांत देशपांडे, श्रीराम पोतदार, डॉ. राहुल बडे, मयूर देशपांडे, दिपक जाधव, माधव सावरगावे, उमेश राऊत, तथागत कांबळे, एमजीएमचे शिव कदम, प्रवीण देशमख, त्रिशूल कुलकर्णी, कुशल पाटणी, राजेंद्र वाळके, रूपेश मोरे, बाबू स्वामी, सचिन दाभाडे, अक्षय गोरे, निरंजन भालेराव, रतन राऊत, साहित्यिक गेणू शिंदे, कैलास अंभुरे, समाधान इंगळे, विष्णु सुरासे, सुनील उबाळे, प्रा.बी जी गायकवाड, विठ्ठल कांबळे, सागर अहिरे, प्रमोद पाटील, अमोल शिंदे, ईश्वर उमाळे, अविनाश सोनटक्के, यूनुस नदाफ, गणेश गायकवाड, महेश आग्रे, गजानन नाईक यांनी अभिनंदन केले.

---


ग्रंथाली प्रकाशन, मुंबईच्या 'नाही फिरलो माघारी' या मोहन शिरसाट या कवितासंग्रहाला तीन पुरस्कार मिळाले आहेत.

१. यशवंतराव दाते संस्था, वर्धा यांचा संत भगवानबाबा काव्य पुरस्कार ५ हजार रुपये रोख व मानपत्र

२. महाराष्ट्र मराठी माध्यमिक शिक्षक संघ, सातारा यांचा शिक्षक प्रेरणा काव्य पुरस्कार २०१८

१८०० रुपये रोख आणि सन्मानपत्र

३. साहित्यज्योती काव्यमंच, कडा, जि. बीड यांचा राज्यस्तरीय साहित्यज्योती काव्य पुरस्कार २०१९, २१०० रुपये रोख, सन्मानचिन्ह असे स्वरूप आहे.






**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**नागकेशर**

**विश्वास पाटील**




### सत्तासंघर्षाची उत्कंठावर्धक कुटुंबकहाणी

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांची 'नागकेशर' ही कादंबरी मराठी साहित्यविश्वात दाखल झाली आहे. त्यांच्या अन्य कादंबऱ्यांप्रमाणेच बहुपेडी असं कथासूत्र लाभलेली आणि उत्कंठावर्धक वळणांनी पुढे सरकरणारी ही कादंबरी आहे.

ही कादंबरी साखर कारखान्यातील कौटुंबिक सत्तासंघर्षावर आधारित आहे. डोंगरे-देशमुख या एकाच कुटुंबातील बापूराव आणि बबननाना या दोन भावांमध्ये गजरा सहकारी साखर कारखान्यातील सत्तेसाठी सुरू झालेल्या आणि त्यांच्या पुढच्या पिढ्यांतही पोचलेल्या संघर्षाचं हे चित्रण आहे.

प्रथम शाळामास्तर असलेले बापूराव गजराचे चेअरमन होतात, तर बबननाना कारखान्यात शिरकाव करण्याच्या हेतूने वरकरणी बापूरावांच्या हितचिंतकाची भूमिका घेतात. बापूंचा मुलगा राजकुमार अर्थात प्रिन्स आणि नानांचा मुलगा बाजीराव ही पुढची पिढी. प्रिन्सशी आपला विवाह व्हावा अशी इच्छा बाळगणाऱ्या नेत्रादेवीला विचित्र दैवगतीमुळे बाजीरावच्या गळ्यात वरमाला घालावी लागते; तर नवऱ्याच्या (रमेशच्या) छळाला व मारझोडीला कंटाळून आश्रयाला आलेल्या जिद्दी, करारी व देखण्या शलाकाचा, प्रिन्स पत्नी म्हणून स्वीकार करतो.

गजरा सहकारी साखर कारखान्याची सत्ता आणि अन्य सत्ताकेंद्रे प्रिन्स आणि शलाकाच्या हातातून काढून घेण्यासाठी नेत्रा, बाजीराव, बबननाना, त्यांची पत्नी चंचला षड्यंत्र रचतात. त्यानंतर स्थानिक पातळीवर चाललेला हा संघर्ष राज्य पातळीवरील राजकारणापर्यंत पोचतो, ते शलाका आमदारकीच्या निवडणुकीला उभी राहते तेव्हा! त्या आखाड्यात मग नेत्रा-बाजीरावचा मुलगा सुपरप्रिन्स, रमेश-शलाकाचा मुलगा अभिषेक हे दोघं उतरतात.

तर आधी स्थानिक पातळीवरचं राजकारण, मग राज्य पातळीवरचं राजकारण, त्यात एकाच कुटुंबातील भावाभावांचा संघर्ष अशा कॅनव्हासवर हे कथानक विश्वास पाटील यांनी गुंफलं आहे. प्रिन्सचा विवाह दोन दिवसांवर येऊन ठेपलाय आणि वाग्दत्त वधू नेत्राला डावलून विवाहित असलेल्या शलाकाशी विवाह करण्याचा निर्णय प्रिन्स घेतो, अशा नाट्यमय प्रसंगाने या कादंबरीची सुरुवात होते. या पहिल्याच प्रसंगातून बापूराव, प्रिन्स आणि शलाका या व्यक्तिरेखांचा परिचय होतो आणि अशा नाट्यमय प्रसंगाने सुरू झालेली ही कादंबरी त्यातील सघर्षामुळे उत्तरोत्तर रंगत जाते.

यातील व्यक्तिरेखा पाटील यांनी उत्तम रंगवल्या आहेत. बापूराव राजकारणाच्या रंगात रंगलेले असले तरी आपल्या हातून घडलेल्या काही चुकांची जाणीव त्यांना आहे. गावाला त्यांनी प्रगतिपथावर नेऊन ठेवलं आहे; पण बबननाना या अस्तनीतल्या सापाला पोसण्याची मोठी चूक त्यांच्या हातून घडली आहे आणि त्याचे परिणाम प्रिन्स आणि शलाकाला भोगावे लागतात. नेत्रा, बाजीराव, बबननाना, त्यांची पत्नी चंचला हे सत्तेसाठी हीन पातळी गाठणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात. तर प्रिन्स आणि शलाका सद्गुणांच्या साहाय्याने प्रगतिपथावर जाऊ पाहतात. सुष्ट आणि दुष्ट यांची ही लढाई पाटील यांनी व्यामिश्रतेने रंगवली आहे. रमेश, त्याचा आणि शलाकाचा मुलगा अभिषेक यांच्या उपकथानकातून या संघर्षाला एक वेगळंच वळण लागतं आणि नेत्राच्या हिडीसपणाचं दर्शन घडतं. साखर कारखान्यातील राजकारण, गावातील राजकारण याचं नेमकं चित्रण पाटील यांनी केलं आहे.

माणसाच्या सत्तापिपासेचं, स्वार्थांधतेचं चित्रण पाटील यांनी अतिशय वास्तवतेने केलं आहे. माणसाच्या हीन, नीच वृत्तीसाठी त्यांनी योजलेली नागकेशर ही प्रतिमा अतिशय समर्पक वाटते. त्या प्रतिमेमुळे या कादंबरीला एक वेगळं परिमाण लाभलं आहे आणि म्हणूनच या कादंबरीचं 'नागकेशर' हे शीर्षकही सार्थ ठरतं. सनसनाटी प्रसंगांनी रंगलेलं हे संघर्षनाट्य मुळातून वाचावं असं आहे. पाटलांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेमुळे ही कादंबरी वाचनीय झाली आहे.

**– अंजली पटवर्धन**

**नागकेशर**
लेखक : विश्वास पाटील
पृष्ठसंख्या : ४०४
किंमत : ४५०
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत ३५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आभाळ झेलण्याचे दिवस**

**संजय कृष्णाजी पाटील**



**आभाळ कवेत घेऊ पाहणारे काही**

चौफेर लेखन म्हणजे काय? ते करता येते का? असेल तर ते कसे? या प्रश्नांची एकत्रित उत्तरे हवी असतील, तर त्यांचे उत्तर आहे, 'आभाळ झेलण्याचे दिवस' हे पुस्तक. हे पुस्तक वेगवेगळे अनुभवही देते तसा एकत्रितही देते, थोडक्यात कथा, लेख आणि समीक्षात्मक रसग्रहण, असा तिपेडी वेणीचा हा गोफ आहे, रेशमी, मजबूत, सशक्त, एकजीव!

संजय कृष्णाजी पाटील हे आपल्याला यापूर्वी अनेकवेळा, अनेक ठिकाणी, अनेक रूपात भेटलेले आहेत. मुळात एक कलंदर कवी मनाचा माणूस. नाटकावर भरभरून जीव ओवाळून टाकणारा. प्रकटीकरणाला रसरसून दाद देणाऱ्या सिनेमाच्या माध्यमाने झपाटलेला. कलेवर, साहित्यावर मनापासून प्रेम करणारा, प्रतिभेचे वरदान लाभलेला कलासक्त प्रतिभावान माणूस. शेवटी दैनंदिन व्यवहारातला एक प्रशासकीय अधिकारी. लेखक, नाटककार, पटकथा-संवाद लेखक, कवी-गीतकार, निर्माता अशा वेगवेगळ्या रूपात असलेले संजय पाटील अनेक गौरव पुरस्कारांनी सन्मानित झालेले आहेत, नव्हे, पुरस्कार त्यांच्यासमोर हात जोडून उभे आहेत, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

'जोगवा' चित्रपटाला सहा राष्ट्रीय पुरस्कारांसह अठ्ठेचाळीस पारितोषिके प्राप्त झालेली आहेत. खूप गाजलेला, कौतुक झालेला हा चित्रपट आपण सगळ्यांनीच पाहिलेला आहे. त्याने भारावलो देखील. पडद्यावर दिसणाऱ्या चित्रपटाचे रूप आपण पाहिले, त्याच्या पाठी असलेली पराकाष्ठा आपणास माहीत असण्याचे कारण नाही. परंतु ती समजली तर 'खरे अंतरंग' समजून येईल. त्यासाठी 'मंतरलेला जोगवा' हा लेख वाचायला हवा. कलेने झपाटलेला कलावंत माणूस जिद्दीने पेटला तर किती परिश्रम घेऊ शकतो, कोणत्या मानापमानाच्या, तडजोडीच्या कातळाशी टक्कर घेत राहतो,याचे चित्रण या लेखात आहे, जे चित्रपटाइतकेच सुरस आणि जिद्दीची चिकाटी दर्शविणारे आहे.

पाऊस सगळ्यांनाच आवडतो. त्यात बागडण्यासाठी वयाने लहानच असले पाहिजे असे बंधन नाही. पाऊस पाहताना सगळेच अंतर्बाह्य त्यात चिंब होतात, त्याच्याशी समरस होतात. परंतु एक जबाबदार अधिकारी जेव्हा कर्तव्याची जाणीव ठेवून पावसाकडे पाहतो, तेव्हा तो सगळ्यांसाठी या कोसळणाऱ्या नभाला प्रार्थना करतो. जांभूळपाड्यातले क्लेशकारक अनुभव आणि बालपणी घेतलेले पावसातल्या मस्तीचे अनुभव यांना जोडणारा 'आभाळ झेलण्याचे दिवस' हा लेख अंतर्मुख करतो.

'अंगबीणात चाफा' या लेखातून लेखक बालपणापासूनचा पट उभा करतात तो 'आई' नावाच्या दीपस्तंभाला समोर ठेवून. आई म्हटले की प्रेम, जबाबदारी, संस्कार, खंबीरपणा अशा अनेक गोष्टी आल्याच. पण ती जेव्हा उत्तम वाचक असते, नाटक-सिनेमा या कलांचा आस्वादी आनंद इतरांत भिनवते, तेव्हा मुलांच्या ठायी कलेच्या कारंज्याचे तलाव निर्माण होणारच. आज आपण जे आहोत, त्याचे श्रेय आईकडे जाते ही कृतज्ञतेची आंतरिक ओली भावना लेखक जपतात, तेव्हा त्या माऊलीचे कलासक्त मन किती मोठे असेल याची कल्पना येते.

'रणांगण' या कादंबरीने मराठी वाचकाला झपाटून टाकले, याला एक काळ गेला. तरीही तिचे गारुड आजही कायम आहे. या कादंबरीने आपल्याला कसे झपाटून टाकले, याचे वर्णन लेखकाने केले आहे. या कादंबरीतील सौंदर्यस्थळे कोणती आहेत, त्यांना अधारेखित केले आहे. परंतु इतकेच नाही, लेखक स्वतः त्या व्यक्तिरेखांच्या भावनांशी पूर्णपणे समरस होऊन हॅर्टाला 'माझ्या लाडक्या पोरी' अशी आर्त साद घालतात. या कादंबरीविषयी लिहिताना लेखक लिहितात, 'तेव्हा समुद्राचे रणांगण झाले होते. आज जगण्याच्या अंगणात समुद्राने रणांगण मांडू नये म्हणून मी वेळीच माझ्या वर्तमानाला जागे करणे गरजेचे आहे.' 'लस्ट फॉर लालबाग' या कादंबरीविषयी तितक्यात तन्मयतेने लिहिले आहे. लेख आणि रसग्रहण असे अकरा ललितलेख पहिल्या भागात आहेत. लेखकाची सजग संवेदना आणि भारावलेपण यांचा आनंदमय अनुभव हे लेख देतात.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दहा कथा आहेत. कथा ही जशी घटनाप्रधान असते तशी ती व्यक्तिप्रधानही असते. लेखक यांच्याकडे या दोन्ही नजरेने पाहतात. त्यामुळे घटना, त्याभोवतीचे वातावरण इतक्या चपखलपणे उभे करतात, की आपण एखादी चलचित्रपटकृती पाहत आहोत, असे वाटत राहते. या सगळ्याच कथा भावणाऱ्या आहेत. यातली 'लख्ख चांदण्यामधला जख्ख म्हातारा' ही कथा खिळवून ठेवणारी आहे. 'सुखदेव ' या व्यक्तिरेखेभोवती गुंफलेली ही कथा जगण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर जाताना वाचकालाही सोबत घट्ट बिलगून बसते. गावाहून स्वप्ने घेऊन शहरात आलेला सुखदेव गुत्ते,बार, कंडोम यांच्यात कुजत गेला. तो शेवटी स्वतःविषयी सांगतो, 'बाबा, तू म्हातारा न हुता मेलास आनि मी मातुर तुला आठवत आठवत म्हातारा झालो.'

'भांगा' या कथेतले 'याल तर हसाल, न याल तर फसाऽल' या वाक्याने सगळी कथा व्यापून टाकलेली आहे. यातल्या प्रत्येकाच्या वागण्याच्या, बोलण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. त्यांच्या जगण्याच्या कल्पना वेगळ्या आहेत. ते सारे लेखकाने अतिशय ताकदीने उभे केल्याने कथेला वेगळे परिमाण लाभले. इतरही कथांमध्ये असेच वेगवेगळेपण ठासून भरले आहे, ज्यातून त्यांची परिणामकारकता उठून दिसते. तसे लेखकाचे कसदारपणही लक्षात येते.

लेखकाकडे विषयाकडे चहूबाजूंनी पाहण्याची कला आहे. मन संवेदनशील आहे. विषय सजीव करताना त्याची परिणामकारकता कशी पक्की होईल, याची हुन्नर अंगी ठासलेली आहे. त्यामुळे त्यांचा लेख असो, समीक्षा असो, गीत किंवा कथा असो, परिपूर्ण आनंदी समाधानाचा अनुभव देतात.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ शीर्षकाशी नाते सांगणारे आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## ग्रंथपान

**पुस्तकचोर**
**विनता कुलकर्णी**



### चोरी, युद्ध, शब्द

'पुस्तकचोर' हा ऑस्ट्रेलियन लेखक मार्कस झुसॅक यांनी लिहिलेल्या 'द बुक थीफ' या कादंबरीचा अनुवाद आहे. न्यूयार्क टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीत हे पुस्तक पाचशेहून अधिक आठवडे आघाडीवर होते. त्याचे जगातल्या तीस भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. अशा पुस्तकाचा मराठीत अनुवाद केला आहे तो अमेरिकास्थित विनता कुलकर्णी यांनी. त्या अमेरिकेत विद्यापीठात प्राध्यापक असून विपुल असे लेखन त्यांनी केलेले आहे.

पुस्तकचोर या कादंबरीची नायिका आहे लीझल मेमिंगर, दहा ते चौदा वर्षे वयाची. ती म्युनिकपासून जरा लांब असलेल्या 'मोल्किंग' या गावी दत्तक पालक हुबरमान या कुटुंबाकडे येते, आई असूनही अनाथ म्हणून. हे कुटुंबही गरीब, कसेबसे उदरनिर्वाह करणारे. त्यामुळे त्यांची वस्तीही गरीब असलेल्या हिमेल भागातली. लीझलला वाचता येत नाही अशा काळात तिला एक बर्फात पडलेले पुस्तक सापडले, तिच्या मृत भावाचे दफन करण्याच्या प्रसंगी, 'थडग्यासाठी खोदकाम करणाऱ्याचे माहितीपुस्तक'. तेव्हापासून पुस्तकाच्या वेडाने ती झपाटली जाते. शाळेत प्रगती यथातथा असून देखील तिचे पुस्तकाचे वेड वाढतच जाते, इतके की ती त्यासाठी मेयरच्या घरातून पुस्तकांची चोरी करू लागते. तशी मोजकीच पुस्तके चोरलेली आहेत. परंतु त्यांचे वेगळेपण, त्यांचे कथानक यांचे धागेदोरे हे कादंबरीच्या खोडाभोवती गुंफलेले आहेत, एकरूप झालेले आहेत.

या कादंबरीचा काळ आहे तो १९३९ ते १९४२. हिटलर आणि दुसऱ्या महायुद्धाचा. ज्यूंचा विरोध आणि त्यांची छळछावण्यांकडे रवानगी, युद्ध, बॉम्बहल्ले, या पार्श्वभूमीवर ही कादंबरी उभी आहे. लीझलचे पालक म्हणजे रोझा व हान्स हुबरमान. गरीबीशी सामना करीत जगणारे. रोझा लोकांचे कपडे धुणे, इस्त्री करणे ही कामे करते. युद्धामुळे पुढे ते काम बंद पडते. हान्स एक रंगकाम करणारा. ऑकर्डियन वाजवणारा. जेमतेम कमाई असलेला. त्याचा मुलगा आणि मुलगी वेगळे राहतात. मुलगा फ्यूररचा समर्थक, युद्धावर जातो. हान्स स्वतः फ्यूररच्या पक्षाचा कार्यकर्ता नाही. त्याला तो आवडतही नाही. तरी देखील तो त्या पक्षाचे सभासदस्यत्व मिळावे म्हणून अर्ज करतो. त्यामुळेच त्याच्यावर विद्रोही म्हणून कारवाई होत नाही. हिटलर ज्यूंचा द्वेषी आहे, हे माहीत असूनही तो मॅक्स नावाच्या ज्यू तरुणाला स्वतः घरात आश्रय देतो, सर्व धोका पत्करून.

कादंबरी लीझलच्या भावविश्वाला समृद्ध करीत पुढे जाते. तिचे वय लक्षात घेता कुटुंबाची असलेली बेताची परिस्थिती, शाळा, मित्र, खेळ, चोऱ्या, आजूबाजूचा परिसर, या परिघात ती कशी वावरते, याचे वर्णन कादंबरीत बालसुलभ तरलतेने येते. परंतु दुसरी बाजू आहे ती तिच्या मानसिकतेची. ही बाजू अतिशय समर्थपणे पुढे येते. समजूतदारपणा आहेच परंतु अपमानाच्या गोष्टी समोर येतात तेव्हा ती कुठेही तडजोड करीत नाही. त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे सरसावते. मारामारी करणारे मित्र असू देत, नाहीतर धुण्यासाठी कपडे देणारी मेयरची पत्नी असू देत. युद्धकाळात बॉम्बहल्ल्याच्या वेळी तळघरात जमलेल्यांना पुस्तक वाचून दाखवते. तिचे भावनिक विश्व लहान असले तरी ते विशाल आहे. स्वतः कृश प्रकृतीची असलेली ती हलाखीने कृश झालेल्या आजारी मॅक्सची काळजी घेते. दोघांनाही एकमेकांचा लळा लागतो. परिस्थिती खूप अवघड होते तेव्हा तो हुबरमनचे तळघर सोडून जातो. पुढे छळछावणीकडे जाणाऱ्या ज्यूंच्या कळपात तो रस्त्यातून जाताना दिसतो तेव्हा गर्दीतही लीझल त्याला ओळखते, त्याला भेटण्यासाठी आत शिरते, पोलिसांचा मार खाऊनही पुन्हा-पुन्हा आत शिरते.

या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या प्रत्येकीचा ठसठशीतपणा नजरेत भरणारा आहे. उत्कंठा सतत वाढत जावी, अशा प्रसंगांची केलेली गुंफण वाचकाला खिळवून ठेवण्यात कमालीची यशस्वी ठरली आहे. प्रखर ज्यूविरोध सर्वत्र असताना मॅक्सला घरात आश्रय देणे, मित्र रुडीने चुंबनांची केलेली मागणी, पक्ष सदस्यत्वासाठी हान्सने केलेला अर्ज, युद्धावर रवानगी, या घटना कादंबरीशी खिळवून ठेवतात. उत्कट बिंदू येतो जेव्हा लीझल मृत रुडीचे चुंबन घेण्यासाठी वाकते तेव्हा.

कादंबरीची रचना काहीशी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. कथन निवेदन पद्धतीचा अवलंब असून तिचा निवेदक आहे साक्षात यमराज. वाचकांशी संवाद करीत तो कथानक पुढे घेऊन जातो. कधी स्वतःविषयी सांगत जातो. मूळ लेखकाने लिहिलेली साहित्यकृती ही वातावरण, पार्श्वभूमी, व्यक्तिरेखा यामुळे परदेशी असल्याची खात्री देते. ती तशीच ठेवण्यातही औचित्य आहे, वाचकांच्या सोयीसाठी, कथानकाची मागणी म्हणून! परंतु विनता कुलकर्णी यांनी हा अनुवाद केला आहे, असे न वाटता ती मूळ मराठीतील साहित्यकृती आहे, असेच वाटावे इतकी अस्सलपणे अनुवादित झालेली आहे. हे असे अस्सलपण लेखिकेकडे असलेल्या प्रतिभेच्या हुकमतीची साक्ष ठरते. कुठेही मूळ कथानकाला धक्का न लावता जे सादर केलेले आहे, त्याला तोड नाही. भाषेचा डौल उत्तमपणे सांभाळलेला, तो अनुवादाचे स्मरण झाकोळून टाकणारा आहे. कथानकाला असलेली वेगळी शैली कुणालाही भुरळ घालणारी असून, तिच्यात कुठेही अन्य भाषिक शब्दांना स्थान मिळालेले नाही. जर्मन भाषेच्या शब्दांची अपरिहार्यता आहेच, परंतु ती शब्दार्थ रूपात दिल्याने आणि कथानकाशी नक्षीकामाइतकी बेमालूम कोरलेली असल्याने, कथानक आणखी वरच्या उंचीवर पोहोचते. यातला जाणवणारा विशेष असा की, लेखिकेचे वास्तव्य परदेशात असूनही त्यांच्या मराठीच्या अस्सलपणाला कुठे धक्का लागलेला नाही.

अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठ सजवलेले आहे ते दोन रंगात, लाल आणि काळा. लाल रंग दाखवतो रक्तरंजित पार्श्वभूमी, जी हिटलरच्या कारवायांनी रंगलेली आणि काळाकुट्ट रंग अंधार दाटलेल्या आयुष्याचा. यात उचललेले देह, सायकलवरून केलेल्या फेऱ्या, ॲकॉर्डिनचे सूर आणि अंधारलेल्या आयुष्याचे चार शब्द, यांच्या प्रतिमा. या सगळ्याच्या मध्ये आहे पुस्तक. अंगावर शहारा आणणारे मुखपृष्ठ पुस्तक वाचून झाल्यानंतरही प्रभावाचा गडदपणा अधिकच गहिरा करत जाते, खोल जखमेसारखे!

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३६० रु.**

## ग्रंथपान

### जगाला वेठीला धरणारे काळेपहाड

'घातसूत्र' हे आघातसूत्र आहे. एकतर वाचायला घ्यावे तर भार न पेलणारा. विषय असे की, एकापाठोपाठ एकेक धक्के देणारे, विचाराच्या, कल्पनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारे. कुठे आहोत आपण, कुठल्या जगात वावरतो आहोत, याचा पुन्हा-पुन्हा विचार करायला लावणारे पुस्तक. हे कपोलकल्पित तर नव्हे, दुसऱ्या ग्रहावरील तर या घटना नाहीत, अशा विचित्र प्रश्नांच्या खोल दरीत भिरकावून देणारे हे पुस्तक. आणि वाचून थकल्यावर एवढाच अनुभव येतो, एक निःशब्द काळोखी शांत पोकळीचे आवर्तन आपल्या भावेती भिरभिरत आहे आणि तिच्यात बधीर झाल्यासारखे निश्चल आडवे झालेले आहोत, ऑपरेशन टेबलावर पडल्यासारखे.

इंग्लंड ते न्यूयॉर्क या प्रवासाला निघालेली महाकाय टायटॅनिकने चौदा एप्रिल एकोणीसशे बाराला चौदाशे प्रवाशांसह समुद्रात समाधी घेतली, ही घटना जगातला कुणीही विसरू शकत नाही. वरवर अपघात वाटणारी ही घटना, खरेच अपघाताच्या कसोटीवर घासून पाहिली तर, तिच्या उत्तराचे होकायंत्र आश्चर्यकारकरित्या नकारार्थीकडे टोक वळवते. हे कसे शक्य आहे, असा भाबडा प्रश्न कुणाच्याही मनात येऊ शकतो. परंतु फेडरल बँकेला होणारा विरोध, नुकसान भरपाईचा विमा, नवीन जहाजाच्या बांधणीचा अवाढव्य खर्च, अशा वास्तववादी संदर्भांना पाहिल्यानंतर हे भाबडेपण देखील टायटॅनिकसारखे लाटांच्या तडाख्यात सापडल्याशिवाय राहात नाही. मुळात बुडाली ती 'टायटॅनिक' नसून 'ऑलिम्पिक' होती, असे संदर्भासह पुढे येते तेव्हा सारे आकाश गरगरा भोवती फिरायला लागते. तीच गोष्ट ९/११ ची. सगळ्यांच्या नजरेला वर्ल्ड टॉवरच्या दोन उत्तुंग इमारती कोसळताना दिसल्या. आणि सगळी संशयाची क्षेपणास्त्रे लादेनकडे रोखली गेली. परंतु हल्लेखोरांत एकाही अरबाचा समावेश नाही. ऐंशी देशाचे साधारण पाचशे विदेशी नागरिक यात मारले गेले, यात ज्यू नागरिकांचा समावेश नाही. असे तब्बल तीस पुरावे लेखकाने सादर केलेले आहेत, संशय आणि वास्तवाचा पट उलगडून दाखवण्यासाठी!

सीआयए हे गुप्तहेर खाते आहे, हे मूळ उद्देश हरवलेले खाते आहे. लादेन हा एके काळचा सीआयएचा हस्तक. एन्रॉन एक भ्रामक वास्तव, इराण-इराक, सद्दाम-अयातुल्ला, यांच्या भोवतीचे राजकारण, तेलावर मालकी प्रस्थापित करण्याचे डाव, जहाज व्यवसायाची साखळी, आर्थिक व्यवहाराच्या नाड्या आवळणारे वॉलस्ट्रीट, जगाच्या कारभारावर नियंत्रण मिळवणारी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, फेडरल बँक, अशा कितीतरी घटनांची ही मालिका आहे.

या सगळ्या घातसूत्रांचे खेळिये आहेत रॉथशिल्डस, जे.पी. मॉर्गन, रॉकफेलर, किसिंजर, बुश, सारखे मोजके हाताच्या बोटांच्या संख्येपलीकडे जाणार नाहीत इतकेच लोक. परंतु त्यांनी जणू जग वेठीला धरले आहे. सत्तेसाठी थंड डोक्याने, थंड रक्त ठेवून, धूर्तपणे, कुटिलपणे, वाटेल ते करायची तयारी असलेले हे खेळिये. सत्ता ही सामर्थ्यातून येते. सामर्थ्य समृद्धीतून येते. समृद्धी सोने, तेल, जहाज, वॉलस्ट्रीट आणि हवेतून येणारा पैसा, यातून येते. हे सूत्र समोर ठेवून कुटिलपणे ही सगळी क्षेत्रे या मंडळींनी यशस्वीपणे आपल्या ताब्यात ठेवलेली आहेत. जगात ज्या राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक घटना घडत आहेत, त्यापाठी धागे पकडून असलेले हात या मंडळींचे आहेत. हिटलर, मुसोलिनी, रशिया, ब्रिटन, जपान यासारख्यांना मदत करून युद्ध भडकते ठेवण्यात यशस्वी खेळी खेळली गेली. युद्ध असेल तर युद्ध शस्त्रास्त्रे अधिक लागतात. यातून शस्त्रास्त्रांचा मोठा व्यापार करता येतो. प्रचंड नफा कमवता येतो, हे त्यापाठचे आणखी एक सूत्र. आणि अशा अनेक सूत्रांत एक गोंडस सूत्र आहे 'वन वर्ल्ड!'

विषयांचा आवाका सामान्य वाचकाच्या आवाक्या बाहेरचा. त्यातले संदर्भ विश्वास ठेवायला शंभरदा हलवून सोडणारे, अविश्वासाला काळोखाच्या पिंजऱ्यात कोंडून ठेवायला लावणारे. काळाची व्याप्ती सनावळ्यांसह आहे, कर्ते करविते कोण आहेत, त्यांची जंत्री आहे, त्यांचे फोटो दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर जिथून संदर्भ घेतले त्यांची भलीमोठी यादीच सोबतीला आहे. तरीही अविश्वास ठेवणार? पुस्तकाचा आकार, वजन यापलीकडचे आकारमान आणि वजन असलेले षड्यंत्र ही पृथ्वी नावाचा ग्रह सांभाळतो कसे, याचेच नवल वाटावे. एवढी अफाट माहिती संकलित करणे म्हणजे कोळशाच्या खाणी उकरण्यासारखे आहे हो हे काम. कुठलाही शब्द संदर्भाच्या कोंदणाबाहेरचा नाही. हे सारे स्मरणात ठेवायचे, त्यांची संगती जुळवायची, त्यांची कालानुक्रमे मांडणी करायची, कुठलाही संदर्भ दुसरीकडे जाता कामा नये, निसटता कामा नये, त्यांच्यात उणीव राहता कामा नये, जे द्यायचे ते परफेक्ट, पूर्ण, समाधान देईल इतके परिपूर्ण. हे येरागबाळ्याचे काम नव्हे. जे घडले ते अपघाताने वा नैसर्गिकपणे नाही, याचा कर्ताकरविता वेगळाच आहे, अशा ज्याची खात्री झाली, अशा दीपक करंजीकरांचा हा ऐवज वाचकांना नुसता अंतर्मुख करणार नाही, प्रत्येक घडणाऱ्या घटनेमागे एक घातसूत्र आहे अशी नवी दृष्टी देईल, असा विश्वास वाटतो.

करंजीकरांची भाषा प्रगल्भ आहे. ती बोजड नाही. आंतरराष्ट्रीय विषय असले तरी इंग्रजीचे कुठेही स्तोम नाही. जे सांगायचे आहे, त्याला अधिकाधिक स्पष्ट आणि सहज आकलन होईल याची दक्षता घेण्यातले त्यांचे कसब वाखाणावे तितके थोडे म्हणावे लागेल. या लेखनाला नुसते संशोधनच नाही, तर त्याला सूत्रात्मक चिंतनाची जोड आहे. 'घटनाक्रम', 'सूत्रधार' आणि 'संरचना' अशा तीन भागात पुस्तकाची मांडणी विभागली आहे. जागतिक घडामोडींचे चिकित्सक अभ्यासक आणि पत्रकार कुमार केतकर, कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या साक्षेपी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेल्या आहेत. त्यांनी केलेले मूल्यमापन म्हणजे करंजीकरांच्या प्रतिभेला दिलेली शाबासकीची मोहोर म्हणता येईल.

सतीश भावसार यांनी अतिशय सुरेख मुखपृष्ठ सजवले आहे. पृथ्वीलाच कठपुतळीसारखे खेळवणारे खेळिये येथे आहेत, हे त्यांनी मार्मिकपणे दाखवलेले आहे.

**घातसूत्र**
**दीपक करंजीकर**




**मूल्य ८०० रु. सवलतीत ५०० रु.**

# ग्रंथपान

**चार सख्य चोवीस**
**संपदा जोगळेकर-कुळकर्णी**
**हर्षदा बोरकर, सोनाली लोहार,**
**निर्मोही फडके**



**अभिव्यक्तीची मेखला**

कथा साहित्यात अनेक अभिनव असे प्रयोग केले जातात. ज्यातून काही वेगळे अभिजात हाती येते, त्याला वाचकांची उंदड पसंती लाभते, तेव्हा तो प्रयोग यशस्वी झाला असे समजले जाते. असाच एक प्रयोग म्हणजे 'चार सख्य चोवीस' हा कथासंग्रह. हा प्रयोग केला आहे चार लेखिकांनी मिळून. खरे तर हे आश्चर्यच म्हणायला हवे. आपापली स्वतंत्र चूल न मांडता, स्वतःचे श्रेष्ठत्व राखून न ठेवता, ईर्षा-स्पर्धा या जळमटांना थारा न देता एकत्र आल्या सख्यत्वाने, हिरिरीने. एक कथासूत्र समोर ठेवले. ज्याचा आरंभ समान आहे. मात्र कथा पुढे पूर्णत्वास न्यायची ती प्रत्येकीने आपापल्या कल्पकतेनुसार. कल्पकता यासाठी की ज्यात कल्पना, कौशल्य आणि प्रतिभेचा कस दिसून येईल. त्यासाठी एक मानसशास्त्रज्ञ आणि एक कृत्तिका अशा दोन व्यक्तिरेखांची योजना केलेली आहे. मानसशास्त्रीय उपचारासाठी आलेली कृत्तिका चार रूपात समोर येते. म्हणजे अनेक वाटा फुटलेल्या रस्त्याच्या मुखाशी आणून सोडले आहे, पुढचा मार्ग प्रत्येकीने स्वतंत्रपणे शोधायचा आहे, इच्छितस्थळी पोहोचणारा. छान असा हा प्रायोगिक प्रयत्न आहे, रंगभूमीवर शोभून दिसावा असा. 'आणखी एक नारायण निकम' या नाटकाची, 'राशोमान' नावाच्या चित्रपटाची आठवण यावी, असा हा प्रयोग आहे, कुतूहल निर्माण करणारा, लेखिकांच्या कल्पकतेची साक्ष देणारा. वाचून झाल्यावर समाधान देणारा आणि वेगळे काही खूप दिवसांनी वाचनात आले, याचा आनंद देणारा.

नेहमी गोड चॉकलेट देणारा गोड काका व्यवहारिक पातळीवर येतो तेव्हा त्याने दिलेले चॉकलेट गोडपणाला पारखे ठरते. ही हुरहुर. एकेकाळी वैभवाच्या सिंहानावर विराजमान झालेल्या वत्सलाबाई त्यावरून पायउतार होतात त्या सुनेमुळे नव्हे, स्वतःच्या अपेक्षांच्या ओझ्यामुळे. म्हातारपणातले बालपण मतलबापुरते असू नये, याचे डोळसपण. दोनवेळेस सिझरियन पोटावर झालेले असताना कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन वसुधानेच करावे, का? हा अलगदपणे उसवलेला टाका. एकटेपणाचे शल्य स्तोत्र -भजनांनी साफ होत नाही,ती सांदिकोपऱ्यातल्या आठवणींसारखी तिथेच राहतात, हे अचलाचे मनोगत. चूक कुणाची याची उत्तरे न सापडणारी, रेहाना शेख आणि सुभाषिणी दातार यांच्यातले सख्य, प्रेम आणि चेहऱ्यावरचा हिजाब. वाट्याला येणारे दुसरेपणाचे ओझे. अशा विविध अंगांना कवेत घेणारा हा कथासंग्रह आहे. अशा स्वतंत्र वीस कथा या संग्रहात आहेत. तर शेवटच्या भागात एकाच कथासूत्रावर आधारलेल्या चार कथा आहेत, चौघींच्या चार.

संपदा जोगळेकर, या अभिनयाची उत्तम जाण असलेल्या अभिनेत्री म्हणून परिचित आहेत तशा त्या कल्पक आणि प्रयोगशील दिग्दर्शिका आणि लेखिका म्हणून देखील परिचित आहेत. सध्या रंगभूमीवर गाजत असलेले 'चि.सौ.का. रंगभूमी' हे नाटक याची साक्ष देते. हर्षदा बोरकर या लेखिका आणि नृत्य-नाट्य दिग्दर्शिका म्हणून सर्वज्ञात आहेत तशाच उत्तम निवेदिका म्हणूनही ख्याती पावलेल्या आहेत. भाषा-साहित्य यांच्या अभ्यासक आणि संशोधक, संपादक निर्मोही फडके या व्याख्यात्या म्हणूनही नावाजलेल्या आहेत. सोनाली लोहार स्तंभलेखिका, ऑडिऑलॉजिस्ट अँड स्पिच लँग्वेज पॅथॉलाजिस्ट आहेत. अशा या चारचौघी, आपापल्या क्षेत्रात नावलौकिक संपन्न असलेल्या लेखिकांचा हा अभिनव कथासंग्रह त्यांच्याइतकाच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची झळाळी घेऊन आलेला आहे. त्यांची प्रत्येकीची भाषाशैली, लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांची प्रगल्भ जाणीव, यातून लेखनाला कलात्मक उठाव देण्याची सहजता, वेगवेगळी आणि स्वतंत्र तंत्रांची परिणामकारकता यातून ठळकपणे दिसून येते. कथांचा बाज हा लघुकथेचा आहे, परंतु त्यांच्या आशयाचा आवाका मोठा असून थेट वाचकाला भिडणारा आहे. त्यांचे भावविश्व अनोखे आहे. मनाच्या तळाचा शोध हे या कथासंग्रहाचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याला गढूळ उथळपणापासून अलिप्त ठेवून नितळपणाचा स्पर्श आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, त्याची निश्चित अशी जाण ठेवून नेमकेपणाने ते मोजक्या शब्दात व्यक्त केलेले आहे. कथाबीजाचे हळुवारपणे बहरत जाणे ही सहज वाटणारी प्रक्रिया आनंददायी आणि प्रसन्न वाटते ती त्यात असलेल्या संवादीपणामुळे. काही कथा आत्मनिवेदनात्मक आहेत तर काही त्रयस्थ, तर काही फ्लॅशबॅकपद्धतीने. कथेचा शेवट हा महत्त्वाचा भाग असतो. तो मनाशी रुंजी घालत राहणारा असेल फुलाच्या गंधासारखा, तर ती कथा वाचल्याचा आनंद वाचक जपून ठेवतो. अशी कथा सशक्त असल्याची ग्वाही ठरते. या संग्रहातील या कथा त्या कसोटीवर सशक्त तर आहेतच, परंतु त्या लेखिकांच्या कसदार लेखनभविष्याचीही ग्वाही देतात.

शब्दमाध्यम आणि दृश्यमाध्यम यांच्यावर सारखीच सर्वमान्य हुकूमत असलेले चंद्रकांत कुलकर्णी यांची 'चारचौघींचा सृजनसोहळा!' या शीर्षकाखाली असलेली प्रस्तावना मुद्दाम वाचावी अशी आहे. लेखिकांनीही आपली सृजनशील भूमिका मनोगतात मांडली आहे.

या पुस्तकाचे अतुल जोशी यांनी सजवलेले मुखपृष्ठ अतिशय देखणे झालेले आहे. कुठेही रंगाचा बडेजाव नसूनही आकर्षक आणि कथासूत्राशी सुसंगत ठरले आहे. आत प्रत्येक कथेला पूजा रायबागी यांनी आशयसंपन्न अर्कचित्रासारखी फ्रेम देऊन उठावदारपणे सजवले आहे. त्यामुळे रेषा आणि शब्द यांची एक छानशी मैफील सजल्याचा अनुभव येतो.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



'चार सख्य चोवीस' या पुस्तक प्रकाशनसमयी लेखिका संपदा जोगळेकर-कुळकर्णी, निर्मोही फडके, सचिन खेडेकर, शिक्षणमंत्री विनोद तावडे, चंद्रकांत कुलकर्णी, सोनाली लोहार, हर्षदा बोरकर, डॉ. लतिका भानुशाली आणि सुदेश हिंगलासपूरकर




'अनवट निवडक गोखले' या पुस्तक प्रकाशनसमयी लेखिका नीला उपाध्ये, गणेश मतकरी, रत्नाकर मतकरी, डॉ. धनाजी गुरव, किरण येले, डॉ. सुरेखा सबनीस आणि डॉ. लतिका भानुशाली



'Trangible Justice' या पुस्तक प्रकाशनसमयी धनंजय गांगल लेखिका रोशन दळवी निवृत्त न्यायाधीश सुजाता मनोहर, डॉ. मिलिंद साठे आणि नितीन ठक्कर



डॉ. लतिका भानुशाली, सुदेश हिंगलासपूरकर, आशिष शेलार, डॉ. लक्ष्मी वास, डॉ. सरोज संघवी, डॉ. व्ही.टी. इंगळहळीकर, डॉ. रवीशंकर, डॉ. प्रफुल देसाई, डॉ द्वारकादास बाहेती. डॉ. गेहडू , डॉ. फाल्गुनी शाह



अर्जुन जगधने लिखित 'नैतिक-अनैतिक' या पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, वंदना महाजन, प्रतिमा जोशी, नीरजा, लेखक अर्जुन जगधने, मुक्ता दांभोळकर आणि सुबोध मोरे

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.